कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट

डॉ.सुहास पेठे

।। श्री ।।

कर्तव्याची
सश्रद्ध पाऊलवाट

(स्वतःच्या कर्तव्यांचे निर्णय घेताना उपयोगी पडणाऱ्या
एका मार्गाचे सुबोध व्यावहारिक विवेचन)

❐

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी.

* कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट

पुस्तकरूपाने प्रकाशित तिसरी आवृत्ती : जुलै २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

विस्तारित दुसऱ्या आवृत्तीचे प्रास्ताविक

डिसेंबर, २००७ मध्ये पाऊलवाटेचा अत्यंत संक्षिप्त परिचय करून देणारी पुस्तिका प्रसिद्ध झाली. माणसाच्या व्यवहारात, निर्णय ही अगदी प्राथमिक गरजेची गोष्ट असल्यामुळं ,कोणत्याही विचारी माणसाला त्यासंबंधी काही मार्ग-आधार गरजेचा असतो. मला स्वतःला विवेक, विचार, शास्त्र - असे अनेक मार्ग चालताना ,आपल्या श्रद्धेच्या सगुण-निर्गुण स्थानासमोर चिठ्ठी ठेवून कर्तव्यांचे निर्णय घेण्याच्या मार्गाचा परिचय झाला. त्याचं स्वरूप अर्थातच साधं होतं. तो मार्ग चालताना येणाऱ्या अडीअडचणी, प्रयोग करताना त्याला अधिक शास्त्रीयता येत गेली. तो अधिक अचूकपणे चालल्यावर त्याची विलक्षण उपयुक्तता माझ्या अनुभवाला आली.

हा मार्ग व्यक्तिगत असला तरी, तो कुणालाही सहजपणे चालता येण्यासारखा आणि उपयोगी आहे, हेही माझ्या लक्षात आलं. नंतर ज्यांचा संपर्क आला, त्यांना अडचणींच्या वेळी, इतर मार्ग मिळत नसताना, मदत होत असल्यास व्हावी म्हणून, या मार्गाची कल्पना त्यांना दिली. त्या मार्गानं त्यांनीही प्रयोग करून, त्याच्या उपयुक्ततेचा अनुभव घेतला. अशी मंडळी असंख्य होती. फक्त त्यांना मला हे व्यक्तिशः सांगणं शेवटी वेळेच्या दृष्टीनं अवघड होत चाललं, म्हणून टिपणरूपानं ही पहिली आवृत्ती निघाली होती.

गेल्या सहा वर्षांत या मार्गाचे अक्षरशः अगणित प्रयोग संपर्कात आलेल्या असंख्य व्यक्तींनी केले. त्यांची यशस्विता, शंका, खुलासे - यांचा विचार करून,आता हा मार्ग विस्तृत शास्त्रीय स्वरूपात मांडण्याची गरज निर्माण झाली. वेळेअभावी ते काम लांबलं होतं. ते श्रीकृपेनं आज घडत आहे. माझे व इतरांचे अगणित अनुभव एकत्रित केले तर, खंडशः प्रसिद्ध होतील, एवढे आहेत. ते श्रींच्या इच्छेनुसार घडेलही. आजतरी परिशिष्टात मी अत्यंत थोडक्यात माझे आधारभूत अनुभव खात्रीसाठी दिले आहेत.

विचारी, कर्तव्यशील, श्रद्धावंत आणि जिज्ञासू साधकांना - आदर व शुभेच्छापूर्वक ही सेवा अर्पण करीत आहे.....

श्रींची जयंती : २२ फेब्रुवारी, २०१३

- सुहास पेठे

कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले : कर्तव्यांच्या वाटचालीची गरज ..७

- मनुष्यजन्माचं चीज /७
- कर्तव्यनिश्चिती /८
- निर्णयाचे अगणित प्रसंग /९
    - काही दैनंदिन प्रश्न /१०
    - काही विशिष्ट कालखंडातले प्रश्न /१२
    - काही विशिष्ट ध्येयाला धरून असलेले प्रश्न /१३
- निर्णयाचे आजचे मार्ग /१५
- आजच्या मार्गांतल्या अडचणी /१७

प्रकरण दुसरे : पाऊलवाटेचा प्राथमिक परिचय .. २३

- पाऊलवाट म्हणण्याचा उद्देश /२३
- सश्रद्ध म्हणण्याचा उद्देश /२४
- मार्गाचा परिचय /२६
- यात अपेक्षित श्रद्धा /२८
- मार्गाच्या नावीन्याचा विचार /२९

- हा मार्ग कुणासाठी आहे ? /३१
- मार्ग केव्हा वापरावा ? /३३
- चिठ्ठी ठेवण्याची पद्धत /३४
    - पद्धतीचा तपशील /३४
- पद्धतीबद्दल आणखी थोडं /४४

प्रकरण तिसरे : वाटचालीवर अधिक प्रकाश ..४७

- मूलभूत गोष्टींची खात्री /४७
- सामूहिक प्रश्न /४८
- विचारण्यातली सावधानता /५१
- उपासनेशी, मार्गाशी अपरिचितांसाठी /५७
- अन्य पर्यायांचा खुलासा /५९
- उत्तरांच्या अर्थांचा खुलासा /६१
- अपवादभूत परिस्थितीतला वापर /६५

प्रकरण चौथे : पाऊलवाटेचा समारोप ..७३

- समारोपापूर्वी /७३
- महत्त्वाची सावधगिरी /७३
- सोपेपणा पण कसोटीही /७४

- बिनखर्चाचा पण अनमोल मार्ग /७६
- वेळेची बचत /७७
- प्रक्रियेचा तात्त्विक आधार /८०
- मानसशास्त्रीय बाजू व लाभ /८१
- व्यक्तित्वविकास /८२
- व्यक्तित्वाचा अधिक उच्च विकास /८३
- निःसंकोचपणाचा लाभ /८६
- स्वास्थ्याचा मार्ग /८७
- पारमार्थिक आधार /८८

*** परिशिष्ट : मोजके स्वानुभव ***

- निवृत्तीपूर्वी /९२
- निवृत्तीनंतर /९८

१. नामाचं प्रमाण /९८

२. उपासनेची इतर अंगं /१००

३. आरोग्याविषयी थोडक्यात /१०२

४. मुलांच्या करिअर /१०५

५. पैशाचं स्थान /१०५

६. वास्तव्याचं स्थान / १०६

१. कर्तव्यांच्या वाटचालीची गरज

● **मनुष्यजन्माचं चीज :** प्रत्येक माणसाला विचार करण्याची शक्ती निसर्गानं दिली आहे. त्याच्या आयुष्याला त्याच्यात्याच्या कल्पनेप्रमाणं दिशा देण्यासाठी आणि त्याची ध्येयं साध्य करण्यासाठी, त्याला या विचाराच्या शक्तीचा विलक्षण उपयोग होऊ शकतो. असं विचारी जीवन घडवणं ही, सामान्य-असामान्य अशा सर्व माणसांकडून निसर्गानं अपेक्षा बाळगली तर, ती रास्तच म्हणावी लागेल. तीच अपेक्षा साऱ्या मानवजातीच्या कल्याणासाठीसुद्धा गरजेची आहे. आयुष्यं ही सामान्य पातळीवरची असोत किंवा कुठल्याही पातळीवरची असोत, त्यांत असं विचारी जीवन जगणारे लोक आपल्या जीवनाचं सार्थक करू शकतात, समाजाला काही देऊ शकतात, निसर्गालाही काही देऊ शकतात.

विचारी जीवनामुळं मनुष्यजीवनाच्या या अत्यंत दुर्लभ देणगीची थोडी तरी परतफेड घडू शकते. तशीच ती आपल्या जीवनातही घडावी, असं कुणालाही वाटणं साहजिकच आहे. याउलट अविचारी जीवन स्वतःचा आणि समाजाचा विनाश करतं, इतकंच काय जन्मदात्या निसर्गाचा अपराध करतं आणि परमेश्वराचाही ! त्यामुळं विचारी जीवन घडवण्याची गरज ही सर्वकाळी, सर्व समाजांत, सर्व देशांत पुरातन काळापासून ओळखली गेली

आहे, त्यासाठी वेगवेगळे प्रयत्नही केले गेले आहेत.

● **कर्तव्यनिश्चिती :** हे जीवन घडवताना करावी लागतात ती कर्मं! ती जितकी उत्तम, अचूक असतील तितकी ही जीवनं सफल होतील, हे काही वेगळं सांगायला नको. आता, ही कर्मं उत्तम किंवा अचूक होण्यासाठी, ती करण्यापूर्वी प्रत्येकाला गरज असते ती, आपल्या कर्माला निश्चितपणा देण्याची. या कर्माच्या निश्चितपणाला आपण आपलं आपलं कर्तव्य असं म्हणतो. ज्यानंत्यानं, ज्याचंत्याचं कर्तव्य योग्य केलं तर, व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनसुद्धा सुरळीत, शांत व प्रगत राहतं.

प्रत्येकानं आपापलं रहदारीसंबंधित कर्तव्य योग्य केलं की, जशी रस्त्यावरची रहदारी सुरळीतपणे सुरू राहते, इतकंच नव्हे तर, प्रत्येकाला आपापलं जाण्याचं ठिकाण गाठता येतं. इतरांनाही आपापलं असंच ठिकाण गाठताना कुठल्या अडचणी निर्माण होत नाहीत. गोंधळ, अपघात टळतात तसंच नियंत्रणाची गरजही कमी होते. अर्थात, या छोट्या उदाहरणापुरतं हे लक्षात येऊ शकेल की, हे सुरळीत चालण्यासाठी मुळात रस्त्यावर येणाऱ्या प्रत्येक पादचाऱ्याला किंवा वाहनधारकाला वाहतुकीच्या नियमांची आणि त्याच्या स्वतःच्या बाबतीतल्या कर्तव्यांची निश्चित रूपरेषा दिलेली असते, ती कळून त्यानं जर ती आचरली तर, हा रहदारीतला सुरळीतपणा टिकू शकतो.

पण माणसाच्या वाट्याला येणाऱ्या आयुष्यात इतक्या प्रकारची कर्तव्यं येतात आणि गुंतागुंतीचे प्रसंग येतात की, त्याला अशी निश्चित रूपरेषा देणं हे व्यवहारातसुद्धा खूप कठीण आहे. ही कर्तव्यांची निश्चितता यावी म्हणून, कायदेकानू - धर्मशास्त्रं - समाजशास्त्रं अशी अनेक शास्त्रं या

रूपरेषा माणसाला देण्याचे प्रयत्न करीत असतात. तरीसुद्धा सतत बदलणाऱ्या माणसाच्या जीवनामुळं, बाह्य जगात होणाऱ्या घडामोडींमुळं, हरघडी होत जाणाऱ्या सामाजिक बदलांमुळं माणसाचा व्यवहार इतका गुंतागुंतीचा होत असतो की, त्यात कुणाला एखादा वैयक्तिक कर्तव्याचा निर्णय घेणं, अशी शास्त्रं असूनसुद्धा कठीण जातं. मग त्याचे निर्णय अनेकदा कुठल्यातरी अनुकरणातून, कधी भावनिकतेतून, कधी अपुऱ्या अविकसित विचारातून घडतात. अर्थातच, त्याचे परिणाम हे जसे योग्य व आदर्श असायला हवे तसे होत नाहीत. त्याचबरोबर त्याचे परिणाम व त्यातून होणारी हानी त्याला स्वतःला आणि संबंधित माणसांना तसंच संस्था, संघटना - यांना भोगाव्या लागतात. त्यामुळं हा कर्तव्याच्या निश्चितीचा प्रश्न अवघड तर आहेच पण समाधानकारकपणे सोडवणंसुद्धा तितकंच निकडीचं आहे.

● **निर्णयाचे अगणित प्रसंग :** मी काय करावं किंवा या विशिष्ट प्रसंगात किंवा विशिष्ट वेळी मी काय केलेलं योग्य आणि हिताचं ठरेल, यासंबंधी निश्चित विचार झाल्याशिवाय माणसाचं कृतीचं पाऊल पुढं पडत नाही. म्हणजे हा कर्तव्याचा विचार नीट करता आल्याशिवाय कृती योग्य किंवा हिताच्या होणार नाहीत. विचारी माणसांना लहानपणापासून अगदी वृद्धत्वापर्यंत निर्णयाच्या अगणित प्रसंगांना सामोरं जावं लागतं.

अर्थात हे आधीच लक्षात घेऊ की, प्रश्नांना असं निश्चित स्वरूपाचं वर्गीकरण नसलं तरी, वयानुसार - उदाहरणार्थ, लहान मुलांचे प्रश्न, युवकांचे प्रश्न, नोकरदारांचे - व्यावसायिकांचे प्रश्न, निवृत्तांचे प्रश्न इत्यादी. अनेकदा असे प्रश्न कौटुंबिक स्वरूपाचे, सामाजिक स्वरूपाचे असे असू शकतात.

काही प्रश्न हे विशिष्ट ध्येयांना धरून असतात. उदाहरणार्थ, व्यावसायिक प्रगती - तडजोडी - पारमार्थिक ध्येयं - प्रगती - साधनं - त्यांचे प्रकार - प्रमाण यांच्या निवडी इत्यादी बाबतींतले असू शकतात.

आपण सद्यःस्थितीत सामान्य वाटणारे पण दैनंदिन जीवनात पडणारे, काही प्रसंगांत कधीतरी पडणारे, तर काही विशिष्ट काळांत पडणारे असे प्रातिनिधिक प्रश्न पाहू.

- काही दैनंदिन प्रश्न.

विद्यार्थ्यांच्या बाबतीत -

१.

आजच्या दिवसातला किती वेळ मी अभ्यासाला देण्याची गरज आहे ?

२.

मी आज खेळायला जावं की जाऊ नये ?

३.

अभ्यासाची खरी अडचण असल्यास घरातल्या एखाद्या कामाला मी नाही म्हणणं योग्य होईल काय ?

४.

आज मी टीव्ही बघावा का ? किती वेळ ? कोणते कार्यक्रम पहावेत ? नेट किंवा फेसबुक अशा माध्यमांचा मी आज वापर करावा की नाही ? किती काळ करावा?

५.

माझं व्यायामाचं प्रमाण काय असावं ?

६.

मी मित्रांना/मैत्रिणींना आज किती वेळ द्यावा ? इत्यादी.

युवकांच्या बाबतीत -

वरच्या संबंधित प्रश्नांव्यतिरिक्त त्यांचे इतर काही प्रश्न असू शकतात. उदा.

१.

कॉलेजला - क्लासला उपस्थिती किती असावी ?

२.

कुटुंबातल्या काही कामांना किती वेळ द्यावा ?

३.

स्वावलंबी होण्यासाठी एखादं टायपिंग-कॉम्प्युटरसारख्या विषयातलं प्रशिक्षण घ्यावं का ?

४.

युवकांच्या संघटना - गट - काही मिटिंग अशा गोष्टींना आज वेळ द्यावा की नको ? किती द्यावा ? इत्यादी.

पालकांच्या बाबतीत -

१.

घरातल्या एकमेकांच्या कामांत आज किती मदत करावी ?

२.

किती मदतीची अपेक्षा बाळगावी ?

३.

आपणहोऊन एकमेकांसाठी - मुलांसाठी कसा, किती वेळ द्यावा? त्या गोष्टीचा आपल्या इतर कामांशी मेळ कसा घालावा ? खेळ-टीव्ही-नेट मोबाईल इत्यादी गोष्टींसाठी आपण किती वेळ व खर्च करावा ?

४.

याच गोष्टींबद्दल मुलांना नक्की काय सांगावं ? मुलांना संगतीबद्दल काय सल्ला द्यावा ? मुलांना चुकीच्या वागण्याबद्दल त्यांना कोणत्या वयात, काय सांगावं - शिक्षा करावी का ?

इत्यादी.

- काही विशिष्ट कालखंडातले प्रश्न.

१.

मुलांना कुठल्या माध्यमात शिकायला घालावं ?

२.

शिक्षणाची साइड निवडताना कुठल्या मुलाला कुठल्या साइडला जायला सांगावं ?

३.

डोनेशन देऊन एखाद्या साइडला प्रवेश घ्यावा की नाही ?

४.

विशिष्ट फ्लॅट, बंगला घ्यावा की नाही ?

५.

दुचाकी, चारचाकी घ्यावी की नाही ? कधी घ्यावी ?

६.

आयुष्याचे जोडीदार ठरवताना कशाचा विचार करावा ? कशाला महत्त्व द्यावं ?

७.

आजारपणाच्या एखाद्या शस्त्रक्रियेबद्दल मिळालेल्या सल्ल्यात दुमत असेल तर कोणता निर्णय घ्यावा ?

८.

आपल्याशी संबंध न ठेवणाऱ्या एखाद्या नातेवाईकाच्या-व्यक्तीच्या प्रसंगात मदतीला जावं की नाही? किंवा लग्नकार्याला बोलावल्यास जावं की नाही?

९.

नोकरीतले बदल पुढे आल्यास ते स्वीकारावे की नाही ?

१०.

भविष्याच्या दृष्टीनं कुठल्या गावी आपण स्थायिक व्हावं ?

११.

पत्रिका-भविष्य इत्यादींवरून मिळालेल्या सल्ल्याच्या बाबतीत काय करावं?

१२.

आपापल्या नोकरीच्या ठिकाणी असलेल्या संघटनांत, त्यांच्या कामांत कितपत भाग घ्यावा ? त्यातील पदं, जबाबदाऱ्या इत्यादी गोष्टी कोणत्या प्रमाणात कितपत स्वीकाराव्या?

१३.

आपापल्या प्रांतातल्या सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा स्वरूपाच्या संघटनांच्या बाबतीत आपली भूमिका काय असावी ? त्यांच्या कार्यात भाग घ्यावा की न घ्यावा ? इत्यादी.

◆ काही विशिष्ट ध्येयाला धरून असलेले प्रश्न.

१.

परिस्थितीनुसार, बाजारातील मागण्यांच्या बदलांनुसार आपल्या व्यवसायात काही बदल करावे का ? ते किती प्रमाणात करावे ?

२.

व्यावसायिक स्पर्धेत कितपत इच्छा बाळगाव्या ? त्यानुसार कराव्या

लागणाऱ्या तडजोडी किती प्रमाणात कराव्यात ?

३.

अधिकाधिक फायद्याच्या आशेला कितपत स्थान असावं ? त्यासाठी कामगार किंवा यंत्रणा यांना किती प्रमाणात राबवावं ? फायद्यासाठी इतर करतात म्हणून भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करावा की नाही? न केल्यास होणाऱ्या इतरांच्या टीकेला काय उत्तरं द्यावीत ?

४.

आध्यात्मिक ध्येयं नक्की काय असावीत ? त्यासाठी प्रापंचिक तडजोडी कुठं, किती प्रमाणात कराव्यात, त्यांची खरोखरच गरज आहे का ? गुरूंची गरज आहे का ? ती कशी ओळखावी ? गुरू कुणाला समजावं ? आपल्या साधनाचं - उदाहरणार्थ जपाचं - प्रमाण किती असावं ? आध्यात्मिक प्रगतीसाठी कौटुंबिक संघर्ष करावे लागल्यास त्यांचं स्थान -प्रमाण कसं ठरवावं ? संघर्षामुळं इतरांना होणाऱ्या त्रासाचा दोष - आपल्याला लागतो का ? लागत असल्यास काय करावं ?

वर दिलेल्या काही प्रश्नांची झलक पाहिली तर, आपल्या लक्षात येईल की, आयुष्यात रोजच काय, आयुष्यभर असंख्य प्रश्नांना आपल्याला सामोरं जावं लागतं. त्याबाबतीत विचार करावा लागतो. निर्णय घ्यावा लागतो. त्या निर्णयावर आपलं आणि अनेकांचं स्वास्थ्य अवलंबून असतं. सगळ्या संबंधित माणसांना त्याचे बरे-वाईट परिणाम सोसावे लागणार असतात. इतक्या अगणित प्रश्नांना जर माणसाला आयुष्यभर सामोरं जायचं असेल तर, खरं म्हणजे त्याला ते सोडवण्यासाठी कोणते कोणते उपाय करावेत, याची माहिती त्याला आपल्या आयुष्यात किती लवकर असण्याची गरज आहे ! वस्तुस्थितीत तर चित्र बरंचसं उलट दिसेल. हे आयुष्याचे खरे प्रश्न आणि त्यांची उत्तरं सोडवण्याच्या रीती, यांचं शिक्षण मिळण्याच्या आयुष्याच्या

पूर्वार्धात, सर्वसामान्यपणे माणूस इतिहास, भूगोल, रसायनशास्त्र, गणित, विज्ञान, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, खगोलशास्त्र, संगणकशास्त्र, माहिती आणि तंत्रज्ञान - अशा असंख्य विषयांच्या घोकंपट्टीत, मार्कांच्या शर्यतीत, जास्तीत जास्त पैसा देणारी नोकरी मिळवण्याच्या अविश्रांत खटपटीत पूर्ण अडकलेला असतो. एकदा नोकरीत किंवा वाट्याला येईल त्या प्रपंचउद्योगात माणूस गुंतला की, त्याला जरी असले प्रश्न महत्त्वाचे असले तरी, त्या प्रश्नांवर लागणारा विचार करायला किंवा उत्तरांचे पर्याय शोधायला सवड नसते, उमेद नसते. मग सुचेल तो निर्णय तो स्वतःही घेतो, इतरांनाही देऊन टाकतो. मग परिणामी ड्रायव्हर नसलेली गाडी वारा - चाकं नेतील त्या दिशेनं जावी आणि कुठंतरी अडकावी-धडकावी तशी असंख्य आयुष्यं कुठंही जाताना आपण पाहतो.

यावरून निदान एवढं तरी आपण समजून घेऊ शकू की, एवढ्या अगणित प्रश्नांना शांतपणे आणि जास्तीत जास्त अचूक निर्णय घेण्याची, घ्यायला शिकण्याची आणि निदान कुठल्याही व्यक्तिगत किंवा कौटुंबिक किंवा सामाजिक प्रश्नात - परिस्थितीत आपलं कर्तव्य तरी निश्चित करण्याची आणि त्यानुसार वागण्याची आपल्याला आत्यंतिक गरज आहे.

याबद्दल एवढ्यासाठीच सावधान राहायचं की, अशी कर्तव्य निश्चित करण्याची कुठली कल्पना नसलेल्या लोकांची संख्या जास्त असली की, असं आपलं कर्तव्य ज्या त्या बाबतीत निश्चित व बरोबर करण्याची हळूहळू कोणाला गरजच उरत नाही आणि तेच बरोबर आहे, असं वाटू लागतं. अशा वेळी व्यक्ती - कुटुंब - समाज ध्येयहीन बनतो आणि अवनतही होतो.

● **निर्णयाचे आजचे मार्ग :** आधी म्हटल्याप्रमाणं अशा अगणित प्रसंगांना आपण दररोज सामोरं जात

असलो तरी, त्यांत आपलं कर्तव्य ठरवणं गरजेचं आहे, याची कल्पना सर्वांनाच नसते, असं नाही. काही लोक जरूर आपापल्या कर्तव्याचा विचार करतात, त्यानुसार निर्णय घेतात. काही अर्थातच याबद्दल सावध नसल्यामुळं त्याक्षणी सुचेल तो मार्ग पत्करून पुढं जातात. आज अशा तऱ्हेच्या निर्णयाचे थोडक्यात खालील मार्ग अवलंबले जातात, असं दिसेल.

१.

त्या त्या प्रश्नाचा आपण जास्तीत जास्त किंवा सर्व बाजूंनी विचार करून योग्य निर्णयापर्यंत येणं. आपलं कर्तव्य ठरवणं.

२.

त्या त्या विषयातल्या जाणकार माणसाचा सल्ला घेऊन आपलं कर्तव्य ठरवणं.

३.

मूळ प्रश्न शक्यतोवर काही काळ प्रलंबित-पेंडिंग ठेवून परिस्थितीनं किंवा परिस्थिती बदलल्यानं त्यातून काही मार्ग आपोआपच निघतो आहे का, ते पाहाणं आणि त्यानुसार निर्णय घेणं.

४.

नात्यानं, मित्रत्वानं, संपर्कानं, शेजारी म्हणून कुणी जवळचं असेल, तो सांगेल त्यानुसार करणं.

५.

अलीकडं काही प्रश्नांच्यासंबंधी मार्गदर्शक पुस्तकं असतात-उदाहरणार्थ मित्र-मित्र, पालक-पाल्य, शैक्षणिक साइडच्या निवडी इत्यादी विषय. त्या पुस्तकांनुसार विचार करून त्याप्रमाणं निर्णय घेणं.

६.

काही प्रश्नांच्याबद्दल पूर्वापार शास्त्रमार्ग किंवा धर्मनिर्णय आहेत. ते काय

सांगतात त्याचा शोध घेऊन त्याच्याशी सुसंगत निर्णय घेणं.

७.

संबंधित प्रश्न आणि त्याबद्दलचे आपल्या मनातले साधक-बाधक विचार रात्री डोक्यात ठेवून सकाळी जाग येताक्षणी येणाऱ्या पहिल्या विचाराप्रमाणं किंवा उत्तराप्रमाणं निर्णय घेणं.

८.

सकाळी प्रथम भेटणाऱ्या व्यक्तीसमोर आपला प्रश्न मांडून त्याच्या शब्दानुसार वागणं.

९.

प्रश्नासंबंधीच्या विचारातला 'मी' बाजूला ठेवून निर्णय घेणं. म्हणजे हाच प्रश्न क्षणभर दुसऱ्याचा आहे असं समजून, त्याला आपण काय सांगितलं असतं, तो निर्णय आपण घेणं.

१०.

छाप-काटा करणं.

११.

आपला प्रश्न अनेक विश्वासू व जाणकार व्यक्तींना सांगून त्यांच्या बहुमतातून येईल त्यानुसार निर्णय घेणं.

१२.

आपले कुणी सद्‌गुरू देहरूपानं असतील तर, ते सांगतील त्यानुसार निर्णय घेणं. इत्यादी.

● **आजच्या मार्गांतल्या अडचणी :** आत्ता सांगितल्याप्रमाणं अशा अनेक मार्गांचा अवलंब विचारी माणसं करीत

असतात. तरीही, त्यांत अचूक वा अधिक योग्य निर्णयाला येण्याच्या बाबतीत खालील अडचणी येतात, असं दिसेल.

१.

आपली स्वतःची विचार करण्याची कुवत कमी पडणं.

२.

त्या त्या विषयांतली तज्ज्ञ किंवा जाणकार व्यक्ती त्यावेळी उपलब्ध नसणं.

३.

काही वेळा निर्णय प्रलंबित ठेवणं शक्य नसतं. उदाहरणार्थ - एखादी शस्त्रक्रिया करणं - न करणं, कॉलेज-गाव या ठिकाणी प्रवेशाचे निर्णय ताबडतोब द्यावे लागणं इ.

४.

काही वेळा प्रश्न प्रलंबित ठेवूनही परिस्थितीत काहीच ठळक फरक न पडल्यानं परिस्थितीकडून कुठलं उत्तर न मिळणं.

५.

काही वेळा प्रश्न प्रलंबित ठेवून तो आणखीच बिकट होऊन, आपणच अधिक अडचणीत येणं आणि त्यामुळं त्वरित निर्णय घेण्याची तीव्रता अधिकच वाढणं.

६.

जवळची व सांगू शकणारी कुणी हितबुद्धीची व्यक्ती नसणं.

७.

काही वेळा प्रश्नांचं स्वरूप खासगी किंवा अडचणीचं असल्यास जवळच्या व्यक्ती असूनही ते सांगण्यास राजी नसणं.

८.

सांगणारं कुणी भेटलं तरी, त्याच्या आपल्या हितबुद्धीविषयी आपल्यालाच

आतून खात्री न वाटणं.

९.

शास्त्रमार्ग सांगणारी पुस्तकं असली तरी, त्यांत नेमकी आपली परिस्थिती किंवा प्रश्न यांवरची उत्तरं न मिळणं.

१०.

सकाळी उठल्या उठल्या मनात पाठोपाठ अनेक विचार येऊन जातात. कदाचित आपण काही वेळेला रात्री ठरवलेला निर्णय लक्षात राहात नाही, त्याची उशीरा आठवण होते. त्यामुळं या अनेक विचारांतला त्यासंबंधी पहिला विचार कुठला, ते ठरवता न येणं.

११.

'मी' बाजूला ठेवून किंवा दुसऱ्याचा प्रश्न निर्णय घेण्याइतपत चित्त शांत किंवा शुद्ध नसणं किंवा तशी कुवत नसणं.

१२.

सकाळी पहिली भेटणारी व्यक्ती आपल्या प्रश्नाच्या संदर्भात अगदीच असंबद्ध स्वरूपाची असणं आणि त्यामुळं त्याला विचारण्याचा पर्याय अडचणीचा होणं.

१३.

आपल्या बाबतीत गुरुस्थानी कुणी व्यक्ती आहे, असं न वाटणं.

१४.

अशी कुणी व्यक्ती असली तरी, ती विचारण्यासाठी देहानं उपलब्ध न होणं.

१५.

समजा उपलब्ध झाली व त्यांनी काही निर्णय सांगितला तरी, निःशंकपणानं मनानं त्याचा स्वीकार करणं कठीण जाणं. इत्यादी.

अशा अनेक अडचणी आधी दिलेल्या मार्गांतही उद्‌भवतात.

त्यामुळं विचारी व्यक्ती असूनसुद्धा त्याला निर्णय घेताना अडचणी येतात, त्यातून निर्णय घेतला तरी, खात्री वाटत नाही. अनेकदा निर्णय प्रत्यक्ष अंमलात आणताना मन द्विधा होतं, कचरतं. काही वेळा निर्णय मनाविरुद्ध, कठोर असल्यास तो बदलावा की काय, असं वाटतं. काही वेळा आपण चांगल्यासाठी निर्णय घेतला असला तरी, तो अंमलात आणायला लागल्यावर आपल्याला अपेक्षित नसलेले वेगवेगळे परिणाम दिसायला लागले तरी पुन्हा मन द्विधा होतं. काही वेळा निर्णयाचा अंमल करताना, कुणी येऊन अशा निर्णयांबद्दल उलटसुलट चर्चा केली किंवा वेगळीवेगळी मतं दिली तरीही, मनःस्थिती दोलायमान होते.

म्हणून निर्णयांचे आधी सांगितलेले अनेक पर्याय असले तरी, त्यांचा अंमल करताना एकाग्रता किंवा निश्चितता राहत नाहीत आणि त्यामुळं निर्णय अंमलात आणताना ते मनापासून न झाल्यानं स्वास्थ्यही नाही आणि निश्चित निर्णयाची फळंही नाहीत, अशी काहीशी अवघडलेली अवस्था निर्माण होते, हा अनुभव असंख्य लोकांना येत असतो.

यात जाताजाता एक गोष्ट अनेकदा लक्षात येते की, वयानं, अनुभवानं ज्येष्ठ असलेल्या मंडळींनी घेतलेले निर्णयसुद्धा प्रत्यक्षात पुढं परिस्थितीत बरोबर किंवा हिताचे ठरताना आपल्याला आढळत नाहीत. त्यामुळं आपलं कर्तव्य नक्की काय, हे एवढा विचार करूनही निश्चितपणानं सांगता येणं, हे मोठमोठ्या जाणकार, ज्ञानी, प्रतिभावंत - अशा माणसांनाही जाणवणारं कोडं ठरतं. या पार्श्वभूमीवर सामान्य माणसाला कर्तव्य ठरवणं किती अवघड जात असेल, याची कल्पनाच केलेली बरी.

बरं व्यक्ती लहान असो, मोठी असो, सामान्य असो, असामान्य असो - योग्य निर्णय घेणं, हे त्याला टळत नाही. उलट चांगल्यात चांगला किंवा हिताचा निर्णय घेणं ही सर्वांचीच एक आत्यंतिक गरज आहे. यात

दुमत नाही. यासाठी विवेक, शास्त्राभ्यास, प्रगल्भ वैचारिक तयारी, वाचन - इतरांच्या अनुभवातून शिकण्याची सखोल तयारी - असे अनेक राजमार्ग रूढ असतीलही. पण सामान्य माणसाच्या ठिकाणी तरी, ते सारे चालण्याची कुवत, शक्यता, अनुकूलता या बरेचदा नसतात. परिस्थितीला मात्र त्याला मोठमोठ्या माणसांसारखंच सामोरं जावं लागतं. कदाचित देश, समाज - अशा मोठ्या पातळीवर त्याच्या निर्णयांचे मोठे परिणाम होत नसतीलही पण त्यांचं व्यक्तिगत आयुष्य, कौटुंबिक स्वास्थ्य, पर्यायानं जवळपासच्या समाजाचं स्वास्थ्य - शांती, या गोष्टींवर अशा सामान्य माणसाच्या निर्णयाचे परिणाम खचितच होतात. म्हणून त्याच्यासाठी उपयोगी पडणारा एक मार्ग म्हणून 'कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट' पुढं मांडण्याचा व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

या मार्गाची नीट माहिती घेऊन, सश्रद्धपणे आणि विचारपूर्वक हा मार्ग अवलंबल्यास सामान्य माणसाची तरी, एक मोठी सोय होऊ शकते, याची मला अनुभवानं खात्री वाटते. बुद्धिनिष्ठ, विचारवंत, अनुभवी - अशा कुठल्याही माणसांना हा मार्ग तितकाच उपलब्ध आहे आणि हितकरही आहे. फक्त तो स्वीकारणं त्यांच्या हाती आहे. कारण त्यासाठी लागणारी निष्ठा, श्रद्धा या मोकळेपणानं ठेवणं, हेही त्यांच्याच हाती आहे.

एवढं नक्की की, वरवर पाहाता हा मार्ग थोडा ढोबळ, सोपा किंवा सामान्य माणसांचा वाटला तरी, त्याचा बुद्धिनिष्ठपणे अभ्यास केला, प्रत्यक्ष अनुभव घेतला तर, हा मार्ग वाटताना साधा वाटला तरी, तो सूक्ष्म आहे, परिणामकारक आहे, वैचारिक खल करून शेवटी द्विधा अवस्थेत नेणाऱ्या बुद्धिवादी मार्गापेक्षा थेट हिताच्या निर्णयाला चटकन येण्याचा आहे.

कदाचित खूप काळ विचार करून, जो निश्चित निर्णय अनेकदा गवसू शकत नाही, परिस्थितीतलं आपलं कर्तव्य ठरत नाही, अलीकडच्या

भाषेतलं खर्चीक काउन्सेलिंग - करून घेऊनही हिताचा निर्णय गवसत नाही. अनेकदा सामाजिक प्रवाहाबरोबर जाऊन निर्णयापोटी लाखो रुपयांच्या खर्चात पडूनही सामान्य मनुष्याची अडचण सुटत नाही. त्याला जर हा मार्ग थोड्याशा प्रयत्नांत समजून घेता आला, श्रद्धेनं चालता आला तर, वर म्हटलेले धोके, नुकसान, परिस्थिती टळते, इतकंच नव्हे तर, आपलं कर्तव्य निश्चित स्वरूपात कळल्यामुळं, त्याची अंमलबजावणी करताना येणारी अनिश्चितता-द्विधा मनःस्थिती - असले अडथळे टळतात आणि निर्णय निश्चित असल्यामुळं अमलात आणताना लागणारं मनोधैर्य आणि एकाग्रता या गोष्टी वाढतात. परिणामी, आपल्यापुरती तरी आपली कर्तव्यं पुरी होऊन कर्मांना येणारी फळं शांत चित्तानं स्वीकारता येतात. इतकंच नाही तर, अखेर कर्तव्यपूर्तीचा आनंद आपल्या आयुष्यात नांदतो.

हे विचार केले तर, असं लक्षात येईल की, सामान्य माणसाला आपलं आयुष्य समाधानी करण्याचा आणि आपल्या आयुष्यातली आपल्या कर्तव्यांची पूर्ती करण्याचा हा हितकर्ता चिंतामणी या रूपानं हाती येऊ शकतो.

आता या मार्गाचा परिचय पुढल्या प्रकरणांतून सोप्या शब्दांत करून घेऊया. त्यातल्या सामान्यपणे येणाऱ्या शंकांची उत्तरं पाहूया. आधारादाखल जिज्ञासूंसाठी परिशिष्टात दिलेल्या मोजक्या स्वानुभवांचाही विचार करू.

२. पाऊलवाटेचा प्राथमिक परिचय

● **पाऊलवाट म्हणण्याचा उद्देश :** आपण पहिल्या प्रकरणात शास्त्रमार्ग, विवेक, विचार, धर्म, न्यायव्यवस्था - अशा स्वरूपाचे राजमार्ग पाहिले. त्यांत येणाऱ्या अडचणीही पाहिल्या. या मार्गांना राजमार्ग म्हणण्याचं कारण ते मार्ग सर्वसाधारणपणे समूहासाठी, समाजासाठी, देशासाठी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कर्तव्यांसाठी निर्माण केले जातात. ते मार्ग सांगतात ते, कर्तव्यं कोणती याचेच सांगतात. तेही अनुभवसिद्ध असतात. अनेकवेळा शतकानुशतकं घडलेल्या इतिहासाला धरून काढलेले मार्ग असतात. पण साधारणतः ते जे मार्ग सांगतात किंवा जी कर्तव्यं सांगतात, ती सामूहिक स्वरूपाची, सार्वत्रिकपणे अंमलात आणण्यासाठी असतात. त्यानुसार चालणं हे योग्य आहे, हे उघड आहे.

फक्त या बाबतीत अनेकदा असं घडतं की, आपले प्रश्न हे आपल्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक बाबतींतले असतात किंवा काही वेळा सामान्य कायदेकानूंच्या कक्षेत न येणारे म्हणजे उदाहरणार्थ, व्यक्तिगत उद्धार, जिवाची मुक्ती - अशा स्वरूपाचे असतात. ते प्रश्न सोडवताना आपण करायचं कर्तव्य आपल्याला आपल्या छोट्या, वैयक्तिक पातळीवर ठरवावं लागतं. त्यासाठी काही वेळा या राजमार्गांनी दाखवलेल्या दिशा उपयोगी

पडत असल्या तरी, त्या साऱ्या या व्यक्तिगत प्रश्नांच्या बाबतीत आपल्याला मार्ग देतातच, असं नाही. त्याचबरोबर अनेकदा असे राजमार्ग काही कर्तव्यांच्या बाबतीत ती व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार ज्या त्या व्यक्तीवर ते निर्णय सोपवतात. त्यामुळं निर्णयही त्या व्यक्तीपुरते त्याला घ्यावे लागतात. त्यामुळं त्याला लागणाऱ्या कर्तव्याचा निर्णय हा मोठ्या राजमार्गाचा विषय न राहाता त्याच्या-त्याच्यापुरती कर्तव्याची छोटी वाट - पाऊलवाट - ठरते. मात्र एखाद्या राजमार्गाला कर्तव्याचा जो दर्जा आणि जी जास्तीत जास्त हितकारकता गरजेची असते, ती अशा छोट्या मार्गालाही गरजेची असते. म्हणून या पाऊलवाटेला 'कर्तव्याची पाऊलवाट' असं म्हटलं आहे.

● **सश्रद्ध म्हणण्याचा उद्देश :** सामान्य व्यवहारामध्ये माणसाला एका किमान विश्वासाची गरज असते. हा विश्वास तो मूलतः गृहीत धरतो. काही वेळा त्याला शंका वाटली तर, अनुभवाची खात्री करून मग तो विश्वास ठेवतो. पण त्याचा व्यवहार विश्वासाशिवाय चालत नाही.त्यातही आपल्या असं लक्षात येईल की, या विश्वासातसुद्धा माणसाच्या एका किमान चांगुलपणावर विश्वास ठेवल्याशिवाय त्याचा कुठला व्यवहार पुरा होणार नाही. अशा वेळी प्रत्येक वेळी शंका, खात्री, अनुभव - या सगळ्या गोष्टी करणं शक्यही नसतं आणि त्याची तशी गरजही नसते. पण जर एखादा मनुष्य सतत संशयशीलच असेल तर, त्याचा व्यवहार, त्याचं म्हणणं बरोबर असलं तरी, या चांगुलपणावरच्या विश्वासाच्या अभावी अडखळेल, थांबेल किंवा ठप्प होईल आणि यात त्याचंच नुकसान होईल.

एक अगदी साधं उदाहरण पाहू. आपण साध्या किराणा दुकानात गेलो आहोत. आपण व दुकानदार एकमेकांना परिचित नाही. एखादी साधी

दहा रुपयांची वस्तू आपण घेणार आहोत. त्यानं ती वस्तू काउंटरवर ठेवली, आपल्या खिशातली नोट आपण आपल्या हातात धरली आहे. यातल्या कोणाही माणसाला दुसरा आपलं काम करील की नाही, याबद्दल अविश्वास असेल तर, त्याच्या हातात वस्तू राहील, आपल्या हातात नोट राहील. वस्तू आधी द्यावी मग आपण नोट देऊ, यावर त्यानं विश्वास ठेवायचा आणि आपण नोट आधी देऊ आणि वस्तू तो नंतर देईल, यावर आपण विश्वास ठेवायचा. हा विश्वासाचाच मार्ग यशस्वी होऊ शकेल. दोघांनाही जर अविश्वास असेल तर, त्याला आधी वस्तू देता येणार नाही आणि आपल्याला आधी नोट देता येणार नाही. म्हणजेच थोडक्यात जर संशय राहील, विश्वास नसेल तर, हा साधा व्यवहारसुद्धा कधीच पुरा होऊ शकणार नाही.

एखादा बुद्धिवादी, काटेकोर मनुष्य असंही म्हणू शकेल की, एका हातानं त्यानं वस्तू द्यावी आणि त्याचवेळी दुसऱ्या हातानं आपण दिलेली नोट घ्यावी. म्हणजे विश्वासाचा प्रश्नच येणार नाही. पण यातही पुन्हा संशय कायमच असला तर, जो सबळ असेल तो एक कृती करील, पण दुसरी कृती त्याच्या बळावर तो टाळू शकेल. आपण एका हातानं वस्तू घेतली आणि दुसऱ्या हातानं बळावर पुढं केलेली नोट मागं घेतली आणि पोबारा केला काय किंवा आपण पुढं केलेली नोट त्यानं चटकन हातात घेतली आणि त्याच्या बळावर पुढं केलेली वस्तू मागं घेऊन, ड्रॉवरमध्ये टाकून दिली आणि मी तुम्हाला वस्तू आधीच दिली आहे, असं म्हटलं काय - दोन्ही मार्गांनी एकाच वेळी या कृती करायच्या ठरवूनही, विश्वासाच्या अभावी आणि संशयाच्या वृत्तीमुळं, माणसाचे साधेसाधे व्यवहार होणंसुद्धा शक्य होणार नाही.

हा सारा एक तार्किक विचार झाला. पण आपला प्रत्यक्ष अनुभव असं सांगेल की, अशा वेळा सहसा येत नाहीत. त्याला कारण माणसाच्या

ठिकाणी मूलतः एक चांगुलपणा आणि विश्वासार्हता जन्मतः असते. 'तिचं अधिक परिणत स्वरूप म्हणजे श्रद्धा होय'. आपल्या ठिकाणी असलेला चांगुलपणा, विश्वासार्हता ही जशी एका शक्तीनं आपल्याला दिलेली आहे तशीच ती त्यालाही दिलेली आहे, याची आणि ते देणारी कुणी अनाम विश्वशक्ती आहे आणि तिच्या नियंत्रणात हे सारे व्यवहार आहेत, याची खात्री असणं म्हणजे ही 'श्रद्धा' होय.

याचा विचार केला तर, आपल्या लक्षात येईल की, आपल्याकडं अत्यंत पुरातन काळापासून 'मनुष्य हा जन्मतः सश्रद्ध असतो' आणि त्यामुळंच त्याच्या जीवनात शांती आणि त्याअर्थानं परमेश्वर नांदू शकतो, याची आपल्याला खात्री दिलेली आहे. मनुष्य लोभ, मोह, विकार - अशा अनेक गोष्टींच्या आहारी जाऊन ही श्रद्धा गमावून व्यवहारात फायद्यात जाऊ पहातो, वरचढ होऊ पाहातो, तेव्हा तो आपली ही देवदत्त विश्वासार्हता, सश्रद्धता गमावतो. परिणामी, काही काळ तो फायद्यात दिसला तरी, तो अंतिमतः अशांत, असुरक्षित होऊन अखेरीस समाधान गमावून बसतो.

हे ज्या विचारी माणसांना पटेल त्यांना विश्वासाकडून श्रद्धेकडे जाणाऱ्या या मार्गाच्या बाबतीत कुठलीच अडचण येणार नाही. या मार्गाला - पाऊलवाटेला - सश्रद्ध म्हणण्याचं कारण हेच की, 'ती वाट माणसातली ही या अनाम शक्तीवरची, तिच्या हितबुद्धीवरची, आपल्याला आपलं त्या त्या वेळी असलेलं योग्य ते कर्तव्य सांगण्याच्या शक्तीवरची, त्यासाठी लागणाऱ्या आपल्या आणि त्या शक्तीच्या अतूट संपर्कावरची श्रद्धा' गृहीत धरते.

म्हणून ही वाट 'कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट' आहे.

● **मार्गाचा परिचय :** आपल्या कर्तव्याचा निर्णय घेण्याचे जे अनेक

पर्याय आपण यापूर्वी पाहिले, त्यांतल्या अडचणी पाहिल्या, त्यासंबंधातला एक मार्ग म्हणून या पाऊलवाटेनं स्वतःच्या कर्तव्याचा आपल्याला निर्णय करता येतो. आपण ज्यावेळेला अशा निर्णयांच्या बाबतीत द्विधा असतो, निर्णय घेण्याचे आधी उल्लेख केलेले इतर पर्याय आपल्याला उपलब्ध नसतात किंवा खात्रीचे वाटत नाहीत, त्यावेळी आपलं कर्तव्य काय हे जितक्या श्रद्धेनं आपण एखाद्या ज्येष्ठ हितकर्त्या व्यक्तीला विचारावं तितक्याच किंवा त्याहीपेक्षा सश्रद्धपणे आपलं कर्तव्य या अनाम विश्वशक्तीला- ईश्वराला - आपल्या श्रद्धास्थानी असलेल्या गुरूंना चिठ्ठीच्या मार्गानं विचारणं, त्यांचं उत्तर समजून घेणं आणि त्यानुसार वाटचाल करणं, हे या पाऊलवाटेचं थोडक्यात सार आहे.

आपण आपलं कर्तव्य ठरवताना निश्चित निर्णय घेऊ शकत नाही, याचाच अर्थ आपल्या बुद्धीची एक मर्यादा आलेली असते. आपल्यासमोर अनेक पर्याय असतात. प्रश्न फक्त त्या पर्यायांतल्या कुठल्या पर्यायाची निवड करावी, हा असतो. हा आपला मूळ प्रश्न सोडवताना उपयोगी पडणारा हा मार्ग आहे. आपल्याला सुचणारे पर्याय वेगवेगळ्या चिठ्ठ्यांवर लिहून त्या चिठ्ठ्या आपल्या श्रद्धास्थानासमोर ठेवून त्यांतून आपल्या वाट्याला येणारी चिठ्ठी व त्यामधील पर्याय हा आपलं त्यावेळेचं योग्य कर्तव्य दाखवीत असतो. ही यातली सश्रद्ध धारणा आहे. आपल्याला अशा प्रकारचे निर्णय कदाचित अनेकदा घ्यावे लागतील, काही वेळा त्याच प्रश्नाच्या संदर्भात बदललेल्या परिस्थितीच्या बाबतीत पुन्हासुद्धा निर्णय घ्यावे लागू शकतील - अशा अनेक मुद्यांचा विचार करता, यासाठी निश्चित स्वरूपाची अशी या मार्गाची थोडी शास्त्रशुद्ध रचना करावी लागते. तिचा ऊहापोह पुढं केला आहे.

● **यात अपेक्षित श्रद्धा :** यापूर्वी श्रद्धेचा केलेला विचार लक्षात घेऊन इथं अपेक्षित असलेली श्रद्धा स्पष्ट करू. उपलब्ध मानवी बुद्धीनं सुचणारे निर्णय करण्याचे सर्व विवेकपूर्ण छोटेमोठे मार्ग खुंटल्यानंतर कोणतातरी मार्ग अविचारानं किंवा नाइलाजानं किंवा कुणाच्या दडपणामुळं निवडून काही कृती करण्याऐवजी - स्वतःच्या निर्णयशक्तीची मर्यादा मान्य करणं, वेळी काही बाबतींत आपली निर्णय घेण्याची क्षमता नाही, हे ओळखणं व मोकळेपणानं मनाशी आनंदानं मान्य करणं - ही या श्रद्धेतली पहिली पायरी आहे. निर्णय अशा एखाद्या विषयातला किंवा परिस्थितीबद्दलचा आहे की, ज्याचं मला आज तरी अज्ञान आहे, हे मान्य करणं आणि त्याचबरोबर मला जरी ते अज्ञान असेल तरी, कुठल्यातरी असीम शक्तीला, उदाहरणार्थ ईश्वराला-गुरूंना तरी ते निर्णयाचं ज्ञान किंवा सामर्थ्य असू शकेल, याची कल्पना आणि खात्री असणं, ही या श्रद्धेतली दुसरी पायरी. ही ईश्वरी शक्ती सत्य तर आहेच, पण ती पूर्ण तटस्थ आणि अंतिमतः सर्वांचं कल्याण इच्छिणारी आहे, तिची मदत कुणालाही उपलब्ध आहे याची खात्री असणं, ही या श्रद्धेतली तिसरी पायरी आहे. त्या शक्तीला प्रार्थना केल्यास ती शक्ती अंतिम असल्यामुळं मला निर्णय देण्यासाठी ती या चिठ्ठीच्या माध्यमातूनसुद्धा तितक्याच समर्थपणे काम करू शकते आणि माझ्या कर्तव्याचा मला निर्णय देऊ शकते, हा दृढ विश्वास - एवढी श्रद्धा इथं अपेक्षित आहे.

या श्रद्धेचं अधिक सूक्ष्म स्वरूप हे आहे की, प्रार्थना केल्यानंतर पर्यायांच्या चिठ्ठीतल्या शांतपणे डोळे मिटून उचललेल्या चिठ्ठीतून मिळणारा मार्ग, हा माझ्या कर्तव्याचा माझ्यापुरता ईश्वरानं दिलेला निकाल आहे, याची खात्री असणं, ही जशी श्रद्धेची एक बाजू आहे तशीच त्यात आलेल्या निर्णयानुसार निःशंकपणे आपण कृती करणं आणि त्यावेळी - नंतर येणाऱ्या

परिस्थितीला तितक्याच शांतपणे सामोरं जात राहाणं, ही श्रद्धेची अत्यंत महत्त्वाची अशी दुसरी बाजू आहे. या निःशंक कृतींमुळं या श्रद्धेला खरं पूर्णत्व येतं.

● **मार्गाच्या नावीन्याचा विचार :** कदाचित प्रथम याविषयी वाचणाऱ्यांना हा मार्ग नवीन किंवा अंधनिवडीचा (ब्लाइंड चॉईसचा) वाटण्याची एक शक्यता आहे. परंतु यात मार्गाची चिठ्ठी निवडताना लौकिकदृष्ट्या डोळे मिटले असले तरी, त्यामुळं आपण निवडीच्या बाबतीत अंध होत नाही. निर्णयाच्या चिठ्ठीची निवड व्यक्तिनिरपेक्ष रहावी किंवा आपल्याकडून चुकूनही अपेक्षित चिठ्ठी उचलली जाऊ नये,याची काळजी घेण्यासाठी सावध असावं, ही त्यामागं भूमिका असल्यानं हा मार्ग उलट एरवी कठीण जाणारी तटस्थता जपण्याचा सोपा मार्ग आहे, हे लक्षात येईल. त्याचबरोबर आपल्या 'मी'ला बाजूला ठेवून म्हणजेच माझे स्वतःचे संस्कार, इच्छा, लोभ, अपेक्षा - अशा कुठल्या गोष्टींनी आपल्या कर्तव्य निवडण्यात होणाऱ्या चुका टाळण्यासाठी, उलट हा मार्ग अंध नसून अधिक डोळस पण सोपा आहे, हेही आपल्या लक्षात येईल.

म्हणूनच हे लक्षात घेणं गरजेचं आहे की, हा मार्ग त्या अर्थानं नवीन नाही. काळाच्या दृष्टीनं, श्रद्धेच्या दृष्टीनं हा मार्ग पुरातन आहे. सामान्य माणसांचीच नव्हे तर, अनेक सत्पुरुषांचीही कर्तव्य ठरवताना गुरूंची किंवा ईश्वराची इच्छा - निर्णय समजून घेण्यासाठी अशी चिठ्ठी ठेवायची पद्धत होती. याच्या खात्रीदाखल एक उदाहरण म्हणून पूज्य टेंब्येस्वामींचे शिष्य श्री खानोलकर महाराज यांचं चरित्र पाहावं. ते ठेवीत असलेल्या काही नमुन्याच्या चिठ्ठ्यांचे फोटोही त्यांच्या चरित्रात दिले आहेत. अगदी अलीकडं

या मार्गाचा अवलंब करणाऱ्या व श्री रमण महर्षींशी निगडित असलेल्या व्यक्तींनी इंग्लिशमध्ये या मार्गासंबंधी एक पुस्तकही लिहिलं आहे. त्याविषयीचा अनुकूल अभिप्राय महर्षींच्या आश्रमातून निघणाऱ्या त्रैमासिकात आला आहे.

अगदी आजच्या काळाचा विचार केला तरी, कर्तव्याची पाऊलवाट या शब्दांनी हा मार्ग आज आपण समोर पाहात असलो आणि तो नवीन वाटत असला तरी, अनेक प्रकारे वेगळ्या पद्धतीनं तो आपल्याला पूर्वीपासून परिचित आहे. इतकंच नव्हे तर, तो आपण आज अनेक बाबतींत निर्णय घेताना कितीतरी प्रमाणात व्यक्तिशः, सामुदायिक बाबतींत, इतकंच काय आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा तो अवलंबत असतो, याची आपल्याला विचार केल्यावरच कल्पना येईल. उदाहरणार्थ, व्यवहारात अनेक प्रश्न अनिर्णित अवस्थेवर येतात - प्लॉट्स्चं वाटप, फ्लॅट्स्ची ॲलॉटमेंट, जागांचं आरक्षण - वापर, क्रीडाक्षेत्रातल्या निवडी-फेऱ्यांचा क्रम, विविध संस्थांतल्या पदांच्या जबाबदाऱ्या, अनेक राष्ट्रीय प्रश्न अशा बाबतींत चर्चेनं एकमत होणं किंवा काही वेळी बहुमतानंही निर्णय घेणं अवघड झाल्यास चिठ्ठ्या टाकून निर्णय घेतले जातात, हे आपण पाहिलं असेल. या चिठ्ठ्या टाकताना, कुणाचे पूर्वग्रह, कुणावर संभाव्य अन्याय, कुणाला अवाजवी फायदा - अशा गोष्टी टाळण्यासाठी जी निरपेक्षता लागते, ती टिकावी म्हणून, हा चिठ्ठीचा मार्ग स्वीकारला जातो, हे सर्वांना माहीत आहे. त्या अर्थानं, तो अंधश्रद्धेचा मानला जात नाही. तसंच तो सर्वमान्यही आहे, वापरातही आहे, राहीलही.

हे करताना, मनुष्यस्वभावाच्या ज्या मूळ मर्यादा, अडचणी आहेत त्यांचा परिहार या चिठ्ठीच्या मार्गानं होईल, ही श्रद्धाच या मार्गाचा अवलंब करण्याच्या मागे आहे, हे आपल्या लक्षात येईल. त्यामुळं त्या अर्थानंही हा मार्ग नवीन नाही. परिचित आहे, रास्त आहे. इथं त्याचं मांडलेलं स्वरूप हे

व्यक्तिगत निर्णयांच्या पातळीवरचं अधिक परिणत व अनुभवसिद्ध स्वरूप आहे - हा यातला फारतर नावीन्याचा भाग असू शकेल. अन्यथा आपण हा मार्ग चालताना एक पुरातन सर्वमान्य आणि सश्रद्ध पद्धतीचाच अधिक शास्त्रीय, तर्कशुद्ध अवलंब करीत आहोत.

● **हा मार्ग कुणासाठी आहे ? :** हा मार्ग सर्वांना खुला आहे, हे त्याचं वैशिष्ट्य आहे. तो चालण्यासाठी खालील किमान गोष्टी मात्र गरजेच्या आहेत.

१.

माझं बरोबर आहे, माझ्या मनाप्रमाणं मी वागणार - अशी वृत्ती नसावी. या विषयात मला जे वाटतं त्यापेक्षा वेगळा मार्ग माझ्याहष्टीनं हिताचा असू शकतो. तो समजून घेण्याची नम्रतेची वृत्ती असावी.

२.

माझ्या मनाप्रमाणं करण्यापेक्षा माझ्या हातून बरोबर आणि हिताचं होण्याची गरज जास्त आहे, याची मनःपूर्वक खात्री असावी.

३.

आपल्याला निर्णयांचे वाटणारे पर्याय काढण्याइतपत विचार करण्याची तयारी व क्षमता असावी. नसल्यास ते शिकून घेण्याची तरी तयारी असावी.

४.

निर्णयाला पर्याय सुचत नाहीत, असं अनेकांना प्रथमतः वाटतं. पण जेव्हा आपण द्विधा असतो तेव्हाच या मार्गाचा प्रश्न उद्‌भवलेला असतो. म्हणून हे लक्षात घ्यावं की, द्विधा होणं याचाच अर्थ किमान दोन पर्याय तरी आपल्याकडं असणं किंवा निदान एखादी गोष्ट करावी की, न करावी इतपत तरी दोन पर्याय आपल्याकडं असतातच. याचाच अर्थ असाही झाला की, एखादी

गोष्ट करण्यासाठी थांबण्याचा तिसरा पर्यायही आपल्याकडं असतोच. याचबरोबर या पुस्तकात पुढं दिल्याप्रमाणं या मार्गाला जास्तीत जास्त पूर्णता येण्यासाठी दिलेला आणि सर्वांना उपलब्ध असलेला 'अन्य पर्याय' हा मार्गही आपल्याला उपलब्ध असतोच. त्यामुळं या मार्गानं चालण्यासाठी मोठ्या बुद्धिमत्तेपेक्षासुद्धा हे सारं समजून घेण्याची गरज आहे. ती तयारी असलेल्या सर्वांसाठी हा मार्ग आहे.

५.

पूर्वी म्हटल्याप्रमाणं आपल्याकडं देवदत्त श्रद्धा आहे. ती जागी ठेवून कुठल्याही सगुण किंवा निर्गुण सत्तेवर ती ठेवण्याची तयारी असणं आणि प्रार्थना केल्यास ती सत्ता आपल्याला आपल्या हिताचा निर्णय नक्की देईल, याची खात्री ज्यांना वाटते त्यांच्यासाठी हा मार्ग आहे.

सारांशानं हा मार्ग कोणत्याही समजूतदार, विचारी माणसासाठी उपलब्ध आहे. इथल्या पुढील स्पष्टीकरणावरून लक्षात येईलच की, हा श्रद्धेचा मार्ग थेट गुरू किंवा उपास्य दैवतच काय विश्वशक्तीशी माणसाचा असलेला संपर्क या कारणासाठी प्रस्थापित करणारा असल्यामुळं व्यवहारात इतर अनेक ठिकाणी लागणाऱ्या कुणा मध्यस्थाचीसुद्धा या मार्गात जरूर नसते. निर्णय देण्यासाठी ईश्वराला सगळे जीव सारखेच आहेत. त्यात माणसांना वाटतं तसं कुणी जवळचं लांबचं नसतं. त्यामुळं मध्यस्थाशिवाय तर कुणालाही हे उत्तर मिळतंच पण, कुणामार्फत जाण्याची- कुणामार्फत चिठ्ठी ठेवण्याचीसुद्धा गरज यात नाही. मानवी व्यवहारांची सवय झाल्यामुळं अधिक चांगला साधक, देवाजवळचा पुजारी अशांकडून चिठ्ठी ठेवली तर, त्याचं उत्तर अधिक बरोबर येईल, असं माणसाला उगीचच वाटण्याची शक्यता असते. म्हणून हा खुलासा मुद्दाम केला आहे. उत्तर हे विचारणाऱ्याच्या प्रामाणिक श्रद्धेला आणि आपलं कर्तव्य योग्य करण्याच्या सात्त्विक तळमळीला

मिळणारं उत्तर असल्यामुळं, ते कुणालाही मिळू शकतं.

या साऱ्याचा विचार करता हा मार्ग अत्यंत सोपा, सुलभ आणि सर्वांसाठी आहे, हे लक्षात येऊ शकेल.

● **मार्ग केव्हा वापरावा ? :** हा मार्ग ज्या कर्तव्यांच्या बाबतींत निर्णय घेणं अवघड होतं, इतक्या मोठ्या स्वरूपाच्या बाबतींतच शक्यतो वापरावा. उदाहरणार्थ - गंभीर स्वरूपाचे प्रापंचिक प्रश्न किंवा विशेषतः पारमार्थिक उन्नतीच्या संदर्भातले प्रश्न इ.

यांत एक स्पष्ट करणं आवश्यक आहे की, कोणती बाब महत्त्वाची आहे किंवा मोठी आहे, हे ठरवणं तसं कठीण आहे. त्यांत मतभेद असू शकतात. कारण काही बाबी दिसायला छोट्या वाटल्या तरी, त्याचे परिणाम दूरगामी असू शकतात. तर काही बाबी वाटताना लहान असल्या तरी काही विशिष्ट परिस्थितीत त्यांना जास्त महत्त्व आलेलं असू शकतं. उदाहरणार्थ, एखाद्या मोठ्या आजाराच्या पथ्यपाण्यात एखाद्या विशिष्ट भाजी किंवा चहातल्या साखरेसारख्या छोट्या विषयाशीसुद्धा तो निर्णय निगडित असून महत्त्वाचा ठरतो आणि त्याबद्दल विचारायला लागू शकतं. म्हणून आपापल्या बाबतींत ती ती गोष्ट विचारण्याएवढी महत्त्वाची आहे की नाही आणि त्याबद्दल आपली मनःस्थिती खरोखरच निर्णयात्मक होऊ शकत नाही ना, याचा विचार करून मग या मार्गाचा वापर करावा.

हे लक्षात घेतलं तर, दुसऱ्या एखाद्या व्यक्तीनं आपल्याला किरकोळ वाटणाऱ्या प्रश्नाच्या बाबतीत चिठ्ठीचा मार्ग वापरला असं कळलं तर, त्यावर टीका करणं टाळावं. कारण ती बाब आपल्याला विचारण्याएवढी महत्त्वाची वाटत नसली तरी, त्याच्या मनःस्थितीनुसार त्याला ती वाटू शकते आणि

ती बाब व्यक्तिगत असल्यामुळं ते महत्त्व ठरवणं आणि हा मार्ग वापरणं - न वापरणं, हे त्या त्या व्यक्तीनं ठरवणंच योग्य आहे, याची जाणीव आपल्याला होऊ शकेल.

प्रत्येक लहानसहान गोष्टीत हा मार्ग वापरू नये, वापरणं व्यवहारानंही अवघड आहे, हे उघडच आहे. तरीसुद्धा एखाद्या व्यक्तीची प्रत्येक गोष्ट ही पूर्णपणे गुरूंच्या इच्छेनुसार करण्याची प्रामाणिक इच्छा असेल आणि ती व्यक्ती त्यानुसार प्रत्यक्ष वागतही असेल तर, अशी व्यक्ती लहानसहान गोष्टसुद्धा आपल्या गुरूंना, देवाला चिठ्ठी ठेवून, विचारून करू शकते. फक्त त्यासाठी लागणारी एकनिष्ठा आणि पूर्ण बालसुलभ वृत्ती-श्रद्धा यांची गरज असते, याची जाणीव ठेवावी. मग हा मार्ग वापरावा.

● **चिठ्ठी ठेवण्याची पद्धत :** याबद्दल आपण पूर्वी म्हटल्याप्रमाणं, आपल्याला वाटणाऱ्या कर्तव्यांच्या पर्यायांच्या चिठ्ठ्या करून, त्या गुरूंसमोर-उपास्य देवतांसमोर ठेवण्याचा मूळ मार्ग असला तरी, असे वारंवार येणारे प्रसंग आणि विचारण्यात आवश्यक असलेला सोपेपणा येण्यासाठी खालील पद्धत चिठ्ठ्या ठेवण्यासाठी वापरावी.

◆ पद्धतीचा तपशील : हा मार्ग व्यवहारामध्ये अनेकांना पूर्ण अपरिचित आहे, असं गृहीत धरून चिठ्ठी ठेवण्याची तपशीलवार पद्धत पुढं दिली आहे. ही पद्धत एक सर्वसाधारण पद्धत आहे. तिच्यात बदल करण्याचे येणारे प्रसंग आणि त्यांचा खुलासा पुढं केला आहे.

१.

चिठ्ठीच्या पद्धतीनं निर्णय घेण्यासाठी एक स्वतंत्र डायरी किंवा वही ठेवावी.

२.

आपल्यासमोर निर्णयांचे किमान तीनपासून साधारणपणे जास्तीत जास्त आठ ते दहा पर्याय येऊ शकतात. ते दर्शवणाऱ्या छोट्या आकाराच्या कोऱ्या पानाच्या, समान आकाराच्या दहा चिठ्ठ्या कराव्यात. प्रत्येक चिठ्ठीवर शक्यतो एक शुभसूचक चिन्ह - श्री, ॐ, स्वस्तिक इत्यादी - वर लिहावं व खाली चिठ्ठीचा क्रमांक लिहावा. हे प्रातिनिधिकपणे असं दर्शवतं की, 'श्रीं'नी आपल्याला कर्तव्य म्हणून खाली दिलेल्या क्रमांकाचा पर्याय सुचवला आहे. या चिठ्ठ्यांना त्यात लिहिलेला पर्यायाचा क्रमांक दिसणार नाही अशा पद्धतीनं चौकोनी घड्या घातलेल्या असाव्यात.

३.

सुरुवातीला श्रीकार लिहून आजची तारीख वहीत नोंद करावी. त्याखाली आपण ज्या परिस्थितीत द्विधा झालो आहोत ती परिस्थिती या वहीत प्रथम निवेदन म्हणून लिहून काढावी. त्याखाली आपल्याला या परिस्थितीत सुचणारे कर्तव्यांचे पर्याय लिहून काढावेत. हे पर्याय काढताना मुळातच आपल्याला वाटणारे पर्याय तर लिहावेतच. पण त्याच्याबरोबर आपल्या मनाविरुद्ध वाटणारे पण सुचू शकणारे अशा निर्णयांचे पर्यायही असावेत. कारण परिस्थितीमध्ये आपल्या स्वतःचे संस्कार आणि आपल्याला कराव्याशा वाटणाऱ्या गोष्टींचे प्रभाव या निर्णयावर पडू नयेत म्हणून अशा मनाविरुद्ध वाटणाऱ्या पर्यायांची नोंद करण्याची गरज असते. आपल्याला जरी आपल्याला हव्या असलेल्या पर्यायांतला निर्णय मिळावा, असं वाटत असलं तरी, ते जर आपल्या हिताचं नसेल तर, आपल्या गुरूंना ते दाखवून देण्याची संधी केवळ आपण ठेवलेल्या या अन्य पर्यायांतून मिळत असते, यासाठी अशा पर्यायांची गरज असते.

४.

आपल्याला काही वेळा परिस्थितीत एखादी गोष्ट करावी किंवा करू नये,

असे दोनच पर्याय असल्याचं वाटतं. सकृतदर्शनी ते बरोबरही असू शकतं, पण आपल्याला या मार्गाचा अधिक अचूक वापर करणं आवश्यक वाटत असेल तर, दोनच पर्याय वाटत असतानाही 'अन्य पर्याय' असा तिसरा पर्याय ठेवावा. परिस्थितीत होय, नाही, करावं, करू नये - असे पर्याय असू शकतात. पण काही वेळा याही पलीकडं काही गोष्टी असू शकतात. आपण दोनच पर्याय ठेवल्यास अशा काही आपल्या कल्पनेपलीकडल्या पण आवश्यक असलेल्या पर्यायांची निवड करण्याची संधी दोनच पर्याय ठेवल्यास गुरूंना मिळू शकत नाही. म्हणून या तिसऱ्या पर्यायाची गरज आहे.

ज्यावेळी परिस्थितीला दोनपेक्षा जास्त पर्याय आपल्यालाच सुचत असतात, त्यावेळी ते आपण देत असतोच. तरीही या मार्गाला पूर्णता आणण्यासाठी या अन्य पर्यायाचा वापर अवश्य करावा. कारण आपण काढलेल्या पर्यायांना शेवटी आपल्या बुद्धीची आणि अनुभवांची मर्यादा येत असते. वस्तुस्थिती किंवा भविष्याच्या दृष्टीनं आपलं कर्तव्य योग्य होण्यासाठी, कदाचित त्यापलीकडची एखादी कर्तव्याची दिशा बरेच वेळा असते. ती सुचवण्यासाठी ईश्वरी शक्तीला हा पर्याय ठेवल्यास तशी वेगळी दिशा दाखवण्याची संधी मिळू शकते. या अन्य पर्यायामुळं विवेकी माणसाच्या निर्णयावरसुद्धा नकळत पडणाऱ्या पूर्वग्रह, अनुभव यांसारख्या प्रभावांचा दुष्परिणाम या आपल्या चिठ्ठीच्या पद्धतीत टाळता येतो.

५.

वर दिलेली वही, तारीख व निवेदन यांची गरज व उपयुक्तता अशी आहे की, अनेकदा काही काळ गेल्यावर तोच प्रश्न उद्‌भवतो. त्यापूर्वी आपण नेमके कोणते पर्याय ठेवले होते, त्यावेळच्या परिस्थितीचं आपलं आकलन काय होतं - याचा बोध त्यावेळचं निवेदन वाचलं की, आपल्याला नंतरही होऊ शकतो. अनेकदा आपण कोणते प्रश्न विचारले होते, कोणते पर्याय दिले

होते तेही आठवत नाहीत. काही वेळा तर एखादा प्रश्न आपण पूर्वी विचारला होता की नाही, हेही काही काळानंतर आठवत नाही. शिवाय विशिष्ट दिवशी असलेली परिस्थिती आपल्याला सर्व तपशीलासह नंतर आठवत नाही. अनेकदा त्याच त्याच गोष्टी परत अकारणच विचारल्या जाण्याची शक्यता असते. हे सर्व दोष दूर होण्यासाठी तारीख, त्या दिवशीचं आपलं परिस्थितीचं आकलन दाखवणारं निवेदन, त्या परिस्थितीत आपल्याला त्यावेळी सुचणारे पर्याय, शिवाय आपल्या पर्यायांना त्यावेळी गुरूंनी दिलेलं उत्तर - या साऱ्यांची ही नोंद करण्याची पद्धत अत्यंत उपयोगी ठरते.

६.

या सर्व पद्धतीत निर्णयासाठी आपण ज्या शक्तीसमोर अत्यंत श्रद्धेनं निवेदन, पर्यायांच्या चिठ्ठ्या ठेवीत असतो, त्या शक्तीचा उल्लेख - सोपेपणा आणण्यासाठी व पुनरुक्ती टाळण्यासाठी - गुरू -असा केला आहे. त्या शब्दानं केवळ कुणी विशिष्ट गुरू असंच अभिप्रेत नसून आपल्याला ज्यांच्यावर श्रद्धा आहे, अशी कोणतीही प्रतिमा, ईश्वरी शक्ती, मूर्ती, निर्गुण-सगुण पादुका,समाधीचे फोटो - असं विश्वशक्तीचं आपल्याला अभिप्रेत असलेलं कोणतंही श्रद्धाप्रतीक असा अर्थ अभिप्रेत आहे.

७.

आपलं निवेदन, पर्याय यांची नोंद झाली की, वहीचं संबंधित पान आपल्या गुरूंसमोर उघडून ठेवून त्यावर आपण जेवढे पर्याय काढले आहेत तेवढ्या क्रमांकांच्या चिठ्ठ्या त्या पानावर ठेवाव्या. त्यानंतर आपण ज्या श्रद्धास्थानाला उद्देशून किंवा आवाहन करून आपल्या कर्तव्याचा निर्णय मागतो आहोत, त्यांचं स्मरण नामानं, प्रार्थनेनं, श्लोकानं इ. करावं. त्यांतला सर्वांत सोपा अनुभवसिद्ध व सर्वसाधारण मार्ग म्हणजे नाम आणि प्रार्थना - हा होय. भगवंत त्याच्या नामानं किंवा स्मरणानं कुठंही त्याक्षणी उपस्थित

असतो व त्या अर्थानं जिवंत असतो, निर्णय द्यायला समर्थ असतो. म्हणून निवेदन समोर ठेवल्यावर शक्यतो नामाची एक माळ करावी. या श्रद्धेनं आणि स्मरणानं ते आपण असू त्या ठिकाणी साकार होतात.

८.

त्यानंतर त्यांना प्रार्थना करावी की, 'निवेदनात मांडलेल्या परिस्थितीबद्दल माझ्या कर्तव्याचा निर्णय, माझ्या बुद्धीनं होत नाही आणि तो योग्य असावा, अशी मात्र मला मनापासून तळमळ आहे. तरी, समोर ठेवलेल्या या चिठ्ठीद्वारे आपण मला माझ्या कर्तव्याबाबत आपला निर्णय द्यावा. त्यानं इतरांचंही कल्याण व्हावं. तो आपला निर्णय आहे, याची मला आज वाटणारी खात्री माझ्या मनाशी कायम टिकावी. त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची शक्ती व बुद्धी आपण कृपया मला द्यावी. आपल्या निर्णयानं माझं कर्तव्य योग्य होणार आहे. त्यामुळं तो अमलात आणताना कष्ट पडले, ती गोष्ट मनाविरुद्ध असली, त्यापोटी काही दुःख, इतरांच्या प्रतिक्रिया मला सहन कराव्या लागल्या तरी, ते सारं मी आपण दिलेलं कर्तव्य करण्याच्या भावनेनं आनंदानं सोसेन. या निर्णयाचे कोणतेही लौकिक परिणाम झाले तरी, तेही मी आनंदानं स्वीकारीन. ही आज मला असलेली बुद्धी कृपा करून कायम टिकण्याची शक्ती मला द्यावी.'

या प्रार्थनेत प्रांजळपणा, आपली श्रद्धा, कर्तव्य योग्य करण्याची तयारी, सर्वांच्या कल्याणाची इच्छा, श्रद्धेवर अढळ राहून लौकिक कष्ट, त्रास सहन करण्याची तयारी - अशा आवश्यक गोष्टी प्रतिबिंबित होतात. त्यामुळं पुढं निर्णय स्वीकारणं व त्याचा अंमल करणं याला लागणारं बळ सहजपणे मिळतं. जे कायद्याच्या निर्णयानंसुद्धा साधणार नाही ते स्वतःच्या या श्रद्धापूर्ण प्रार्थनेनं साधतं, असा अनुभव आहे. आता या प्रार्थनेतले शब्द हे प्रातिनिधिक असून, ते तसेच्या तसे दरवेळेला उच्चारण्याची आवश्यकता

आहे, असं नाही. त्यामध्ये येऊन जाणारे सर्व भाव येतील, अशा पद्धतीनं आपण ती मौनपणे आपापल्या पद्धतीनं केली, तरी चालेल. या प्रार्थनेमुळं स्मरणामुळं आधी उपस्थित झालेल्या श्री गुरूंना आपल्या हिताचा निर्णय चिठ्ठीद्वारे देण्याची आनंददायक मुभा मिळत असते.

९.

नंतर स्वतः डोळे मिटून समोर ठेवलेल्या चिठ्ठीतील हाताला येणारी चिठ्ठी उचलावी. प्रार्थना करून त्यांचा निर्णय म्हणून ती स्वीकारावी. मग त्यावर लिहिलेला क्रमांक पहावा. त्या क्रमांकाला वहीत लिहिलेला आपला पर्याय पहावा. त्या पर्यायासमोर गोल करून त्यात बरोबर (✓)ची खूण करावी. या खुणेमुळं पुढं कधीही कोणता पर्याय त्यांनी दिला होता, याची खात्री करण्याची वेळ आल्यास त्यावेळी ही खूण उपयोगी पडते. हा निर्णय दिल्याबद्दल श्री गुरूंचे कृतज्ञतापूर्वक आभार मानावे. शक्य असल्यास थोडं नामस्मरण करावं. आपल्याला त्यांचा निर्णय या मार्गानं मिळाल्यानंतर त्यांनी तो निर्णय आपलं त्या परिस्थितीतलं त्यांना अभिप्रेत असलेलं आणि आपल्या तसंच इतर संबंधितांच्या कल्याणाचं ठरणारं आपलं कर्तव्य करायला निश्चिंत मनानं लागावं.

१०.

या ठिकाणी आणखी एक खुलासा करण्याची गरज आहे. वर दिलेल्या सर्व पद्धतीप्रमाणं आपण आपल्या गुरूंकडून कुठला तरी येणारा एक निर्णय चिठ्ठीद्वारा घेत असतो. आपल्याला सुचलेल्या पर्यायांव्यतिरिक्त त्यांना काही सांगायचं असल्यास आपण अन्य पर्यायाची तरतूद केली आहे. त्यातून जशी उत्तराची अधिक तर्कशुद्ध मुभा निर्माण होते तशीच आणखी एक परिस्थिती यात उद्‌भवू शकते. म्हणजे असं की, आपण समजा एखाद्या परिस्थितीत चार पर्याय ठेवले. पाचवा अन्य पर्यायही ठेवला. चिठ्ठी

उचलताना एकच उचलायची असल्यामुळं त्यातून समजा क्रमांक एकची चिठ्ठी आली तर, तेच त्यांचं उत्तर समजून आपण कामाला लागणार. यात एक त्रुटी राहू शकते. ती अशी की, त्यांना आपण दिलेल्या पहिल्या चार पर्यायांपैकी एकाऐवजी जास्त पर्याय कर्तव्य म्हणून द्यायचे असल्यास ते देता येण्याची सोय कशी करावी, असा प्रश्न येऊ शकतो. त्यावरचे मार्ग असे.

एक - आपण लिहिलेल्या प्रत्येक पर्यायासमोर दोन कॉलम करून त्यावर होय, नाही असे पर्याय लिहावेत. आपल्या पद्धतीप्रमाणं प्रार्थना झाल्यानंतर प्रत्येक पर्यायासंबंधी होय किंवा नाही, अशी चिठ्ठी उचलावी. म्हणजे त्यातल्या दोन किंवा अधिक पर्यायांना त्यांना होय म्हणायचं असेल तर, ते म्हणता येऊन, आपल्याला त्यांची अधिक पूर्ण इच्छा कळू शकते.

उदाहरणार्थ : समजा एखादा विद्यार्थी आहे. परीक्षेतल्या सहा विषयांतल्या दोन विषयांची त्याची तयारी उत्तम आहे. इतर चार विषयांत अधिक भर कोणत्या विषयाच्या अभ्यासावर द्यावा, याबद्दल द्विधा मनःस्थिती आहे. म्हणून प्रश्न विचारायला गेल्यास सर्वसाधारण पद्धतीप्रमाणं चार विषयांचे पर्याय ठेवले जातील. पाचवा अन्य पर्याय होईल. उत्तरामध्ये समजा त्यांपैकी पहिल्या विषयाचा पर्याय आला तर, तेच उत्तर पूर्ण समजून विद्यार्थी अभ्यासावर भर देईल. समजा गुरूंना असं म्हणायचं असेल की, या पहिल्या विषयाबरोबरच अजून दुसऱ्या किंवा चौथ्या विषयाचासुद्धा अधिक अभ्यास करण्याची गरज आहे तर, ते त्यांना या पद्धतीत म्हणता येत नाही. म्हणून प्रत्येक विषयासमोर भर देणं अभिप्रेत आहे-नाही, असे पर्याय देत प्रत्येक विषयाबद्दल चिठ्ठी उचलत गेल्यास गुरूंना अभिप्रेत असे दोन-तीन विषयसुद्धा आपल्याला कळू शकतील आणि प्रयत्नांना योग्य दिशा देता येईल. तशीच शंका वाटल्यास ज्या विषयांबद्दल आपल्याला खात्री वाटून आपण विचारलं

नाही तेही विषय यात समाविष्ट करून, या पद्धतीनं त्यांबद्दल खात्री करून घेता येईल. कारण अनेकदा असं होतं की, खात्री असलेल्या विषयांतसुद्धा अनपेक्षित प्रश्न येऊ शकतो किंवा आपण समजत असलेली तयारी पुरेशी नसू शकते. म्हणून याबाबतीत येऊ शकणारी अडचण या पद्धतीनं सोडवावी.

दोन - आपल्याला आपण सुचवलेल्या पर्यायांतून येणाऱ्या एका उत्तराव्यतिरिक्त अजून उत्तर असण्याची शक्यता आहे, असं वाटल्यास आपला मूळ प्रश्न विचारून झाल्यावर पुन्हा चिठ्ठी ठेवून मी दिलेल्या पर्यायांतील आणखी काही पर्याय आपल्याला द्यायचा आहे का, असं विचारावं आणि मग त्याला होकार आल्यास पुन्हा आपल्याला वाटणारे पर्याय स्वतंत्रपणे ठेवून उत्तरं समजून घ्यावी.

वरील विद्यार्थ्याच्या उदाहरणाच्या बाबतीतसुद्धा या दुसऱ्या पद्धतीनं जाऊन तो प्रश्न सोडवता येऊ शकेल.अधिक पर्यायांचे निर्णय मिळून आपले प्रयत्न योग्य तऱ्हेनं होतील.

हे विद्यार्थ्याचं उदाहरण फक्त येऊ शकणारी परिस्थिती समजून घेण्यासाठी आहे. मुळात विद्यार्थ्यानं सर्व विषयांचा पूर्ण अभ्यास करावा, हे गृहीतच आहे. पण आजारपणं, आधी मागं पडलेला अभ्यास - त्यामुळं कमी राहिलेला वेळ - अशा बाबतींत उरलेल्या वेळाचं नियोजन पास होण्यासाठी नेमक्या दिशेनं करण्याची गरज लागू शकते. मग अशा तऱ्हेनं विचारण्याची वेळ येते. प्रत्यक्षात अशा वेळा मोठ्या माणसांच्यावर अनेक विषयांतल्या कर्तव्यांचे प्रश्न येतात त्यावेळीसुद्धा वरील परिस्थिती उद्‌भवते, एकापेक्षा जास्त पर्याय देण्याची गुरूंना गरज असते, त्यावेळी त्याबाबतीत वर दिलेल्या मार्गानं जाऊन निर्णय घेता येतो.

११.

काही वेळा आपल्यासमोर अनेक कर्तव्यं असतात. ती आपापल्या परीनं

बरोबर व महत्त्वाची असतात. तशी कुठली गोष्ट करण्याविषयी आपण द्विधा नसतो. फक्त आपल्याकडं उपलब्ध असलेला वेळ, शक्ती - ही मर्यादित असतील तर, कुठली गोष्ट आधी करावी याबाबतीत मात्र आपण द्विधा असू शकतो. त्याचबरोबर काही वेळा यांतल्या काही गोष्टी रोजच करायच्या असतात. पण रोजच्या आपल्या इतर कामांच्या ताणाचा विचार करता, त्या गोष्टी करायला द्यायचं प्राधान्य आपल्या लक्षात येत नाही. त्याचा परिणाम आपल्याला असा दिसत असतो की, आपल्या मनानं आपण गोष्टींचं प्राधान्य ठरवीत गेल्यास, काही गोष्टींना अगदी कमी वेळ उरण्याची शक्यता आहे तर, काहींच्या बाबतीत त्या गोष्टी अजिबात राहाण्याचीच शक्यता आहे. त्यामुळं हे ठरवताना त्याबाबतीत आपण द्विधा असतो.

अशा प्रसंगीसुद्धा या पाऊलवाटेनं जाऊन आपल्याला आपल्या कामांचा कोणता प्राधान्यक्रम अधिक योग्य ठरेल, हे ठरवता येणं शक्य आहे. ते ठरवलं गेल्यामुळं आपल्या शक्तीचा, वेळेचा योग्य त्या क्रमानं वापर होऊन, आपण अधिक कर्तव्यशील जीवन जगून आपला उद्धारही साधू शकतो.

याबाबतीत चिठ्ठी उचलण्याच्या पद्धतीत थोडा फरक करून आपण आपल्या कर्तव्यांच्या प्राधान्यक्रमाच्या बाबतीतला निर्णय गुरूंकडून घेऊ शकतो. त्यात असं करता येतं की, आपल्याला वाटणारी आपली कर्तव्यं आपण क्रमानं उतरून काढावी. तेवढ्या क्रमांकांच्या चिठ्ठ्या ठेवाव्यात आणि प्रार्थनेमध्ये असा बदल करावा की, यानंतर आपण ज्या क्रमानं चिठ्ठी द्याल, त्या क्रमानं मी ती कर्तव्यं करीत जाणं उचित होणार आहे, सर्वांच्या कल्याणाचं होणार आहे, अशी माझी धारणा आहे. तरी, त्या मार्गानं आपण कृपया मला योग्य असलेला निर्णय, त्या मार्गानं द्यावा.

या प्रार्थनेनंतर येणाऱ्या चिठ्ठीत जो क्रमांक असेल, ते आपलं

प्राधान्यानं पहिलं कर्तव्य आहे, असं समजावं. उदाहरणार्थ : क्रमांक चार आल्यास, आपण लिहिलेल्यातलं चौथं कर्तव्य आपण प्रथम करावं. त्यानंतरच्या उचललेल्या चिठ्ठीत क्रमांक सात आल्यास, ते कर्तव्य आपण दुसऱ्या क्रमानं करावं इ. अशी त्यांची इच्छा आहे.

कर्तव्यांच्या बाबतीत असे प्रश्न अनेकवेळा उद्‌भवू शकतात. यात प्रापंचिक कामं, पारमार्थिक साधनं, काही सामाजिक गोष्टी - अशा अनेक कर्तव्यांच्या बाबतीत प्राधान्यक्रमाबद्दल आपण द्विधा होऊ शकतो. उदाहरणार्थः नातेवाईकांच्या एखाद्या कार्यक्रमाला जाणं, आपल्या हौसिंग सोसायटीच्या मीटिंगला हजर राहाणं, आपला दैनंदिन व्यायाम करणं, मित्रांना वेळ देणं, वृत्तपत्र वाचणं, पारायण करणं, जप करणं, ध्यानाला बसणं, दर्शनाला जाणं, घरच्यांना वेळ देणं, एकाच दिवशी दोन-तीन कार्यक्रम-समारंभ-उपक्रम आल्यास त्यात कशाला वेळ द्यावा हे ठरवणं - इत्यादी. अशा बाबतीत आपण आपल्या मनानं निर्णय घेऊन काही प्राधान्य ठरवलं आणि त्यानुसार कृती केली तर, त्यात आपल्याला अपेक्षित गोष्टी न साधता उलट आपलाच प्राधान्यक्रम चुकला असून, आपण केलेल्या गोष्टींऐवजी दुसऱ्या गोष्टी आधी करण्याची गरज होती, असं आपल्या नंतर लक्षात येतं. अर्थातच कर्तव्यांच्या बाबतीत हे निर्णय चुकल्यानं होणाऱ्या परिणामांना आपल्याला सामोरं जावं लागतं.

हे करताना आपल्या मनानं ठरवण्यापेक्षा काही वेळा या परिस्थितीत प्राधान्यक्रम विचारून जर गोष्टी केल्या तर, त्या गोष्टी कर्तव्यरूप ठरून त्याच्या त्रासापासून तर आपण मुक्त राहू शकतोच पण त्याचबरोबर अनेकदा ते प्राधान्यक्रम पुढं कालांतरानं बरोबर होते, असं लक्षात येतं. त्याचबरोबर आपल्याला अकारणच वाटणारी प्रतिक्रियांची, चुकण्याची भीती बरोबर नसून आपण अशा तऱ्हेनं विचारून केलेला निर्णयच संबंधित माणसांना

अपेक्षित होता किंवा तो बरोबर ठरला, असं लक्षात येईल.

● **पद्धतीबद्दल आणखी थोडं :** वर दिलेली पद्धत ही चिठ्ठी ठेवण्याची एक सर्वसाधारण पद्धत आहे. प्रत्येकाच्या परिस्थितींनुसार, अडीअडचणींनुसार त्यात अनेकदा काही शंका उपस्थित होतात. काही बदल करावे लागतात. त्यातल्या काही शंकांचा, बदलांचा खुलासा पुढीलप्रमाणं :

१.

वर दिलेली पद्धत ही जास्तीत जास्त आदर्श पद्धत असली तरी, ती पूर्ण करायला थोडा वेळ लागतो. काही वेळा निर्णय घेण्यासाठी वेळ कमी असतो, अशा वेळी काय करावं - अशा स्वरूपाच्या शंका अनेकांना येतात. त्यासंबंधी असं सांगता येतं की, वेळ कमी असल्यास आपली परिस्थिती मनानं निवेदन करता येते. पर्याय एखाद्या छोट्याशा कागदावर टिपून ठेवता येतात. आयत्या वेळी आपण असू त्या जागी क्रमांकांच्या तात्पुरत्या छोट्याशा चिठ्ठ्याही करता येतात. माळेवर शक्य नसेल तर, मनानं थोडा वेळ नाम घेऊन, प्रार्थना करून चिठ्ठी उचलली तरी चालेल. अगदी क्वचित प्रसंगी अशा गडबडीच्या वेळेला किंवा एरवीही उत्तराला 'होय-नाही', 'करावं-करू नये' - असे दोनच पर्याय असू शकतात. त्यावेळी बाहेर असताना, गडबडीत असताना साध्या नाण्याच्या किंवा एखाद्या कागदाच्या तुकड्याच्या साहाय्यानंसुद्धा वरील प्रकारानं उत्तर विचारलं तरी चालतं. निर्णयही बरोबर येतो.

वरीलप्रमाणं काही करावं लागल्यास मात्र, नंतर आपण असे निर्णय विचारण्याची जी मूळ वही ठेवली असेल त्यात आपल्या सवडीनं शक्यतो लगेच नंतर त्याची वरीलप्रमाणं निवेदन, पर्याय इत्यादी नोंद मागाहून करावी. म्हणजे ती वेळही सांभाळली जाईल आणि या सगळ्याचा पुढं होणारा

उपयोगही आपल्याला होईल.

२.

हे सारे निर्णय घ्यायला - विचारायला आपण घरी आपल्या उपास्य दैवतासमोर असूच असंही नाही. कदाचित हे निर्णय ऑफिसमध्ये, आपापल्या व्यवसायाच्या ठिकाणी, प्रवासात इत्यादी अनेक ठिकाणीसुद्धा घ्यावे लागू शकतात. ते त्या त्या ठिकाणी घेतले तरी चालतात. त्यावेळी आपल्यासमोर जरी गुरूंची प्रतिमा किंवा प्रतीक नसेल तरी, आपलं स्मरण त्याला पुरेसं ठरू शकतं व आपल्याला आपल्या श्रद्धेमुळं योग्य निर्णय त्वरित मिळू शकतो. मात्र घरी परतल्यावर प्रार्थना करून या साऱ्या नोंदी मूळ पद्धतीप्रमाणं पुऱ्या कराव्यात.

३.

ही पद्धत कुठल्या धर्म, पंथ, जात, देश, भाषा - अशा कुठल्याही मानवी भेदांच्या पलीकडं आहे. त्यामुळं तिचा वापर करायला विशिष्ट धर्मातलं दैवत, विशिष्ट प्रकारचे गुरू, निवेदन करायला विशिष्ट भाषा - अशा कुठल्या गोष्टींचं बंधन नाही. प्रत्येक जीव ईश्वराला तितकाच जवळचा आहे आणि तो जर श्रद्धेनं आणि प्रांजळपणे योग्य कर्तव्य करण्याची तळमळ बाळगतो आहे तर, त्याला कृपाळूपणे मिळणारा निर्णय शक्ती, बुद्धी - मदत सर्व, सर्वांच्या बाबतीत तितकंच सारखं असतं,याची खात्री बाळगावी. त्यामुळं अर्थातच कुठल्या देवासमोर कुठल्या धर्मातल्या व्यक्तीनं निवेदन ठेवलं, तसंच ते निवेदन मराठी, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन की आणखी कुठल्या भाषेतलं आहे, याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आपलं मनोगत आणि तळमळ ही जिथं थेट पोचतात तिथं याबद्दलच्या शंका बाळगण्याचं कारण नाही.

४.

या पद्धतीनं येणारा निर्णय हा भगवंताचा - गुरूंचा - विश्वशक्तीचा कसा

मानावा, या शंकेचा खुलासा असा की, अशा पद्धतीनं होणाऱ्या निर्णयात 'मी' नाही. त्यांना निर्णय देण्याची पूर्ण मुभा आहे. म्हणून येणारा निर्णय त्यांचा मानावा. शिवाय 'मी'नं पर्याय काढण्यात 'माझ्या'वरचे संभाव्य प्रभाव, पूर्वग्रह, अपेक्षा, मर्यादा, अज्ञान - अशा असंख्य अडचणींचा परिहार करण्यासाठी त्यात 'अन्य पर्याय' ठेवण्याचीही तरतूद केली आहे. त्यामुळंच कोणताही निर्णय देण्याची मुभा तर त्यांना आहेच, पण त्याचबरोबर त्याक्षणी कोणताही निर्णय देण्याची त्यांना गरज वाटत नसेल, तशी वेळ आली नसेल तर, तो निर्णय न देण्याची मुभाही त्यांना आहे. त्यामुळंही निर्णयांच्या बाबतीत येऊ शकणाऱ्या अडचणींचा परिहार झाल्यामुळं येणारा निर्णय त्यांचा मानण्यात तार्किकदृष्ट्या कुठली अडचण नाही.

यात दुसरी पूरक बाजू अशी की, मुळातच हा मार्ग श्रद्धेचा आहे. आपण ज्यांना विचारतो ती श्रद्धास्थानं देहमर्यादांनी बद्ध नाहीत. माणसासारखी शक्ती, सामर्थ्य असल्या गोष्टींनीही बद्ध नाहीत. त्यांची शक्ती आणि ज्ञान यांनाही विषय, काळ यांच्या मर्यादा नाहीत. त्यामुळं ती श्रद्धास्थानं कोणाच्याही प्रार्थनेला, कुठल्याही विषयाच्या बाबतीत आणि आजच नव्हे तर, भविष्यातही कल्याणाचं ठरणारं उत्तर चिठ्ठीच्याच काय कुठल्याही मार्गानं द्यायला समर्थ आहेत. म्हणून श्रद्धेच्या दृष्टीनंही चिठ्ठीच्या या पद्धतीतून येणारा निर्णय त्यांचा मानण्यात अडचण नाही.

सारांशानं या पद्धतीनं येणारा निर्णय 'त्यांचा' मानायला भावना आणि तर्क अशा कुठल्याही दृष्टींनी अडचण नाही.

३. वाटचालीवर अधिक प्रकाश

● **मूलभूत गोष्टींची खात्री :** आपण आधी पाहिल्याप्रमाणं या पाऊलवाटेनं जाण्यापूर्वी खालील मूलभूत गोष्टींची खात्री करून घ्यावी.

१.

आपला प्रश्न व्यक्तिगत कर्तव्यांविषयीच आहे ना ?

२.

त्याचा येणारा निर्णय अमलात आणण्याची आपली पूर्ण तयारी आहे ना ?

३.

आपला प्रश्न फक्त कर्तव्यात्मक आहे ना ? तो भविष्यात्मक नाही ना ?
उदाहरणार्थ : मी कोणता अभ्यासक्रम निवडावा, हा कर्तव्यात्मक प्रश्न आहे पण मी पास होईन की नाही, हा भविष्यात्मक प्रश्न आहे. अशा प्रश्नांसाठी हा मार्ग नाही.

४.

आपण प्रश्न विचारतो तो आपल्या परिस्थितीला सयुक्तिक आहे का ?
उदाहरणार्थ : शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच वर्ष संपल्यानंतर मी कुठल्या विद्याशाखेला जाऊ, असा प्रश्न विचारणं परिस्थितीत सयुक्तिक नाही. कारण तो प्रश्न विचारण्याची वेळ अजून आलेली नाही. शिवाय वर्षानंतरच्या

परिस्थितीत त्या प्रश्नाचं स्वरूपही बदलू शकतं.

५.

ज्यांच्यासमोर आपण हा प्रश्न ठेवीत आहोत त्यांच्या कल्याणबुद्धीवर आणि सामर्थ्यावर आपला मनोमन विश्वास आहे ना ?

६.

प्रश्न विचारण्याची दिलेली पद्धत समजून घेऊन, त्यानुसार आपण प्रश्न विचारतो आहोत ना ?

● **सामूहिक प्रश्न :** मूलतः हा मार्ग पाऊलवाटेचा आहे, याचाच अर्थ तो व्यक्तिगत प्रश्नांना व त्याच्या निर्णयांना खऱ्या अर्थानं लागू आहे. त्यामुळं सामूहिक प्रश्नांच्या बाबतीत त्याचा एकत्रित अवलंब करताना, जरा अधिक विचार करून करावा. एखाद्या प्रश्नाबद्दल, विशेषतः कौटुंबिक प्रश्नाबद्दल, दोन-तीन व्यक्ती संबंधित असल्या तरीसुद्धा हा मार्ग वापरता येऊ शकेल. त्याचा निर्णय नेहमीप्रमाणंच योग्य येईल. पण वर दिलेली जी पथ्यं व्यक्तिशः प्रश्न विचारताना पाळावी लागतात, तीच या सर्व व्यक्तींनी पाळली तर, हा मार्ग वापरता येईल आणि उपयोगीही ठरेल. उदाहरणार्थ :

१.

सर्वांचा विचार याच मार्गानं जाण्याचा असणं आवश्यक आहे.

२.

कदाचित घरातल्या उपासना प्रत्येकाच्या वेगळ्या असतील किंवा कुणाची अशा सगुण श्रद्धास्थानावर श्रद्धा नसून ती निर्गुण विश्वशक्तीवर असेल आणि तरीही असा प्रश्न ज्या श्रद्धास्थानासमोर ठेवला जाईल, त्याच्या येणाऱ्या उत्तरावर इतरांइतकाच विश्वास ठेवणं आणि त्यानुसार सर्वांनी एकत्रितपणे

तो अमलात आणण्यात सहभागी होणं - याची तयारी असण्याची गरज आहे.

३.

त्यातही इतर सर्व उपस्थित नसतील तर सामूहिक प्रश्नांच्या बाबतीत कुणी एकानं किंवा उपस्थित असलेल्यांनी प्रश्न ठेवला आणि उत्तर घेतलं तरी ते उपस्थित नसलेल्याला चाललं पाहिजे व मान्य असलं पाहिजे. अन्यथा सर्वजण उपस्थित नसताना अशा सामूहिक प्रश्नाबद्दल न विचारणं योग्य होईल. सर्व उपस्थित असल्यानंतर विचार-विनिमय होणं,पर्यायांत सर्वांनी आपापल्या दृष्टीनं भर घालणं, उपासना-प्रार्थना एकत्रितपणे करणं,येणारा निर्णय सर्वांसमोर एकदम येणं-या गोष्टी पुऱ्या होत असतील तर,सामूहिक प्रश्नाबद्दल हा मार्ग वापरायला हरकत नाही.

४.

एक नक्की की, सामूहिक प्रश्नाबाबत सर्वांची इच्छा व या मार्गानं जाण्याची तयारी असल्याशिवाय हा मार्ग सामूहिक प्रश्नांच्या बाबतीत अवलंबू नये.

५.

या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट करणं आवश्यक वाटतं की, सर्व माणसांचे स्वभाव जसे सारखे नसतात तशाच त्यांच्या प्रतिक्रिया देण्याच्या पद्धतीही सारख्या नसतात. त्याचबरोबर काही व्यक्ती निर्णयांच्या बाबतीतही कमकुवत असतात. या सगळ्याचा विचार केला तर, सामुदायिक रित्या एकत्र येताना सर्वांची या मार्गानं जाण्याची जी चर्चा होते आणि त्याप्रमाणं करावं असं ठरत असतं, त्यावेळी अशा व्यक्तींचा विचार आपणच लक्षात घ्यावा, निदान एकत्र येण्याचा आणि या मार्गानं जाण्याचा निर्णय त्यांच्या भिडस्त स्वभावामुळं, अबोलपणामुळं किंवा निर्णयशक्तीच्या कमकुवतपणामुळं - त्यांच्यावर लादला जात नाही ना, याची खात्री करून मगच सामूहिक प्रश्नांच्या बाबतीत या

मार्गाचा एकत्रितपणे अवलंब करायला हरकत नाही.

काही प्रश्न हे सामूहिक स्वरूपाचे असतात. पण त्यांत भाग घेणं किंवा न घेणं याचं स्वातंत्र्य प्रत्येकाला असतं. उदाहरणार्थ : तिघाचौघा भावंडांनी एखाद्या हक्कासाठी न्यायालयात जाण्याचा निर्णय. त्यात जर आपल्याला आपण भाग घ्यावा की नाही, याचं स्वातंत्र्य असेल तर, त्या बाबतीत आपण आपल्यापुरता निर्णय घेण्यासाठी या मार्गाचा वापर करू शकतो. काही सामूहिक प्रश्न कौटुंबिक किंवा विशिष्ट गटापुरते असतात. त्याचे आपण भागही असतो. पण त्यांच्या निर्णयांच्या बाबतीत तटस्थ राहण्याचं किंवा भाग घेण्याचं स्वातंत्र्य आपल्याला असतं. ते स्वातंत्र्य वापरताना प्रश्न सामूहिक स्वरूपाचा असला तरी, आपलं स्वातंत्र्य वापरावं की नाही हे ठरवण्यासाठी या मार्गाचा वापर करणं शक्य आहे. एखाद्या गोष्टीबद्दलचा वाद-विवाद, भांडण हे दोघा किंवा काही व्यक्तींचं असू शकतं. त्याअर्थानं हा प्रश्न सामूहिक वाटतो. त्यात प्रत्येकाचं नफा-नुकसानही अडकलेलं असू शकतं. पण त्या नफा-नुकसानीची आपली तयारी असेल तर, त्या वादात - भांडणात भाग घेण्या - न घेण्याचं स्वातंत्र्य आपल्याला असतं. अशा बाबतीतही सामुदायिक असूनही एका मर्यादेत ही प्रक्रिया आपल्याला उपयोगी पडू शकते.

या पाऊलवाटेची उपयुक्तता व्यक्तिगत पातळीवर सर्वांत अधिक असली तरी, सामूहिक पातळीवर त्याचा वापर करू नये, असं काही बंधन नाही. फक्त अनेकदा असं असतं की, याचा जो श्रद्धेचा पाया आहे, अंमलबजावणीची खात्री आहे, ती सार्वत्रिक बाबतींत असणं कठीण असतं. तसंच काही ठिकाणी हे काम प्रक्रिया म्हणून बहुमतानं चालवण्याची पद्धत असते. अशांसारख्या ठिकाणी या वाटेनं न जाणं चांगलं. मात्र एखाद्या समूहात - भले तो कुटुंबातल्या दोन-तीन व्यक्तींचा असो,मित्रांतल्या गटाचा

असो किंवा त्याही मोठ्या पातळीवरच्या समूहाचा असो - त्या सर्व समूहांत जर श्रद्धेचा एकत्रितपणा, मार्गाची खात्री, चालण्याची तयारी - अशा गोष्टी असल्यास तिथंही हा मार्ग चालणं शक्य आहे.

● **विचारण्यातली सावधानता :** प्रश्न विचारताना त्या प्रश्नासंबंधीची वेळ, परिस्थिती, युक्त - अयुक्तता - अशा अनेक गोष्टीही तारतम्यानं विचारात घ्याव्यात. उदाहरणार्थ :

१.

आपलं परीक्षेतलं गुणपत्रक आपली जी कुवत आणि कल दाखवीत असतं त्याचा विचार न करता उगीचच एखाद्या साइडला जाऊ का किंवा एखादा कोर्स करू का - असं विचारता येईल. त्याचं काही उत्तरही आपण ठेवलेल्या पर्यायांप्रमाणं येऊ शकेल. पण हा प्रश्नच मुळात आपली अपरिपक्वता दर्शवतो.

२.

वर म्हटल्याप्रमाणं आपली कुवत नसताना एखाद्या विशिष्ट दर्जाची कुवत लागणाऱ्या साइडला जाण्याचा प्रश्न विचारण्यापूर्वी आपलं हे तारतम्य कमी पडतं की, त्या बाजूला जाणंच मुळात युक्त नाही. त्यातून कुठल्या मार्गानं जाता येत असेल तर, पालकांच्यावर त्याचा येणारा आर्थिक ताण आपण विचारात घेतलेला नाही. पुढच्या संभाव्य अपयशामुळं येणारी निराशा आपण विचारात घेतली नाही. तिला तोंड देण्याचं आपल्याकडं पूर्वनियोजन नाही. इत्यादी. त्यातही निदान असं विचारताना, जर आपण अन्य पर्याय ठेवला असेल तर, आपल्या गुरूंना त्या बाजूला जाण्यात आपल्याला थांबवता तरी येईल. मग निदान तसा तरी मार्ग अवलंबावा.

३.

काही प्रश्न विचारणं हे औचित्याचंच नसतं. प्रश्नच विचारायचा झाला तर, चोरी 'अ' कडं करू की 'ब'कडं हासुद्धा विचारता येईल. एवढेच पर्याय असतील तर, त्याचं उत्तरही त्यांना 'अ'कडं किंवा 'ब'कडं यांतलं देणं भाग आहे. पण मुळातच ही गोष्ट उचित नसल्यानं असे प्रश्न विचारू नयेत.

अधिक सोपं उदाहरण पाहायचं झालं तर, विद्यार्थ्यानं मी अभ्यास करावा, न करावा, अन्य पर्याय - असं विचारणं हे औचित्याचं नाही. कारण, विद्यार्थी म्हणून ते त्याचं मुळातच कर्तव्य आहे. अशा वेळी अन्य पर्याय देऊन गुरू आपल्याला पुन्हा मूळ मुद्याला आणू शकतात. करावा, असं सांगूनही जाणीव देऊ शकतात पण मुळात या मार्गाचा वापर करून, आपला आणि त्यांचा वेळ घालवणं, हेच औचित्याचं नाही. हे लक्षात घेऊन आपण विचारताना तारतम्य बाळगावं.

४.

प्रश्न विचारताना पर्याय काढण्यासाठी वेळ न देता सुचेल ते एक-दोन पर्याय देऊन विचारण्याची गडबड करू नये. त्यामुळं विनाकारणच 'अन्य पर्याय' येत राहून आपला आणि गुरूंचा वेळ जातो.

५.

पूर्वी विचारलेले प्रश्न अनवधानानं आपण परत विचारीत नाही ना, याची खात्री करून घ्यावी आणि आपला आणि गुरूंचा त्रास वाचवावा. यासाठी नोंदवही ठेवणं व ती चाळून मग प्रश्न विचारणं उपयोगी पडेल.

६.

त्याच गोष्टीबद्दल पुन्हा प्रश्न विचारण्यापूर्वी - आपण आधी हा प्रश्न विचारला त्यावेळी त्याचं उत्तर काय होतं, त्याचा अंमल आपल्याकडून पूर्णपणे झाला का, याचा आढावा घेतल्याशिवाय पुन्हा तोच प्रश्न विचारणं बरोबर नाही.

७ .

त्याच गोष्टीबद्दल पुन्हा प्रश्न विचारण्याची वेळ येऊ शकते. त्याची उत्तरंही पुन्हा वेगळी मिळू शकतात. पण त्यासाठी तशी कारणं लागतात.उदाहरणार्थः वस्तुस्थिती बदलते, मिळालेल्या निर्णयाला सार्वत्रिक विरोध होतो, त्यातून विचारण्यातली चूक लक्षात येते, कदाचित सामुदायिक प्रश्नांच्या संदर्भात आपण निर्णय घ्यायला गेलेले असतो, प्रश्नाशी संबंधित अशी नवी माहिती समोर येते, आपण पूर्वी विचारलेल्यापेक्षा अन्य पर्याय समोर येतात, इत्यादी.

८.

वर दिलेल्या कारणांसाठी पुन्हा प्रश्न विचारावा लागला तर, ते क्षम्यही आहे आणि उचितही आहे. पण पुन्हा विचारण्यामागचा उद्देश कधीही उत्तराची किंवा या पद्धतीची परीक्षा पाहाण्याचा नसावा. तर या बदललेल्या कारणामुळं निर्माण झालेल्या नव्या परिस्थितीतलं आपलं कर्तव्य पुन्हा ठरवण्याचा असावा.

९.

एखाद्या घरामध्ये दोन श्रद्धास्थानांची उपासना असेल तर, प्रश्न ठेवण्यापूर्वी या मार्गाबद्दल एकमत असलं तरी, प्रश्न कोणत्या श्रद्धास्थानासमोर ठेवावा, याचा विचार आधीच करावा.

उदाहरणार्थ : घरात एकाची कुठल्या महाराजांची उपासना आहे आणि दुसऱ्याची कुठल्या इतर गुरूंची-स्वामींची उपासना आहे तर, प्रश्न कोणासमोर ठेवायचा, हे आधी एकमतानं ठरवावं. मग येईल ते उत्तर सर्वांना बंधनकारक व कल्याणाचं आहे, हे लक्षात ठेवावं. म्हणजे एका महाराजांच्यासमोर ठेवून विचारल्यावर आलेलं उत्तर दुसऱ्याला आपल्या मनासारखं वाटलं नाही तर, आता माझ्या महाराजांसमोर ते ठेवून बघूया - असा अपरिपक्वपणा करू नये. कारण मूलतः उत्तर देणारी शक्ती एकच असते, याची खात्री असणं म्हणजेच श्रद्धा आहे आणि त्यात कमी पडण्याचं

हे लक्षण ठरेल. त्यासाठी कुणाहीसमोर चिठ्ठी ठेवली आणि सर्वांनी आपापल्या उपास्य दैवतांना-गुरूंना प्रार्थना करून, उत्तरासाठी मार्गदर्शन देण्याची विनंती केली, तरी चालू शकते आणि त्यात प्रत्येकाचं मनोमन समाधानही होतं.

१०.

हा मार्ग मुळात आपलं कर्तव्य आपल्याच जागी बसून गुरूंना किंवा भगवंताला विचारून ठरवण्याचा सोपा व खात्रीशीर मार्ग आहे. असं असताना, पर्याय ठेवताना, समजा आपले गुरू देहानं हयात असतील - परगावी असतील तरीही याचं उत्तर त्यांनाच विचारावं, असा पर्याय शक्यतो ठेवू नये. ते इथंही ठेवलेल्या पर्यायांतून आपल्याला या मार्गानं उत्तर देऊ शकतात, यावर आपला विश्वास नाही, असा भाव येतो. त्याचबरोबर या मार्गानं चालण्याची आपली पूर्ण तयारी नाही, हे व्यक्त होतं, हे लक्षात ठेवावं. त्याचबरोबर या मार्गातला श्रद्धेचा थेटपणा, सोपेपणाही गमावला जातो.

११.

ही पाऊलवाट हा एक निर्णयांचा मार्ग आहे. तो पुरातन, अनुभवसिद्धही आहे. तो कळून घेतला तरी, त्यानुसार चालण्याचं स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. थोडा विचार केल्यावर लक्षात येतं की, यातून येणारा निर्णय हा ईश्वरी निर्णय आहे. तो आपल्याला न पटो किंवा चालता न येवो - तो सत्य असतो. तो स्वीकारण्याची क्षमता असावी लागते. ज्यावेळी हा निर्णय येतो त्यावेळी तो कल्याणाचा असतोच पण तो अमलात आणायला लागणारी क्षमताही आपल्यात असते, नसली तर ती निर्माण करण्याची काळजी परमेश्वर घेणार असतोच. पण याची खात्री लागते.

ती खात्री नसली आणि हा मार्ग नाही चालला तरी, अर्थातच चालू शकतं. पण हे आपण आपल्या मनाशी ओळखून असावं की, आपल्याला या मार्गानं येणाऱ्या उत्तरानं चालता येईल, याची खात्री नाही. म्हणून तो

आपण चालत नाही. त्यानं काही बिघडणार नाही. हे सांगायचं अशासाठी की, वर सांगितलेली वैयक्तिक अक्षमता हे खरं कारण असताना, त्याचबरोबर ती माझ्या ठिकाणी येऊ शकेल याची खात्री नसताना - काही लोक ते सारं मान्य करणं अवघड जात असल्यामुळं, या मार्गावर माझा विश्वास नाही, त्यात त्रुटी आहेत इ. कुठल्यातरी मार्गानं त्यावर टीका करून आपल्या मूळ अडचणीवर पांघरूण घालू पाहातात. तेवढं मात्र करू नये. यानं आपण तर मार्ग चालतच नाही पण इतरांचा मात्र अकारण बुद्धिभेद होतो. तो दोष आपल्यावर येणं तरी टाळावं.

मार्गाच्या बाबतीत मतभेद असला तरी, तो वर दिलेल्या आज्ञापालनाच्या बाबतीतला नसावा किंवा ते न जमणं सावरून घेण्याचा नसावा. तो मतभेद मार्गाच्या शास्त्रीयतेबद्दल, तर्कशुद्धतेबद्दल, श्रद्धेबद्दल - असा प्रामाणिक मतभेद जरूर असावा आणि त्यासाठी हा मार्ग आपण चालत नाही, असं म्हणावं.

१२.

या मार्गानं जाण्याची आपली तयारी असली, त्यानुसार योग्य पद्धतीनं आपण निर्णय घेतला असला तरी, तो आपल्या स्वतःपुरता आपल्या तटस्थ अशा विवेकबुद्धीचाच निर्णय असतो. त्या निर्णयानुसार वागताना काही बाबतींत आपला इतरांशी संबंध येऊ शकतो. तिथं व्यवहाराचाही प्रश्न उद्भवतो आणि इतरांची मतं - अडचणी यांचाही संबंध येऊ शकतो, हे कृपया लक्षात घ्यावं. या पाऊलवाटेनं जाताना सुरुवातीलाच जे म्हटलं आहे की, त्यात येणाऱ्या निर्णयानुसार श्रद्धेनं वाटचाल करण्याची आपली तयारी असावी, त्याचा अर्थ इतर कुणाची, आपल्या व्यवहारांच्या चौकटीत तरी, कुठली पर्वा करू नये, असा नाही. हे सांगण्याची गरज अशासाठी आहे की, काही वेळा इतरांना आपण आपला निर्णय अमलात आणल्यामुळं काही खरोखरच्याच

अडचणीही उत्पन्न होऊ शकतात. त्याबाबतीत या मार्गावरच्या श्रद्धेच्या नादात काहींकडून, महाराजांनी मला असं करायला सांगितलं आहे, मी ते करणार - असा थोडा निश्चय व्यक्त केला जाण्याची शक्यता असते. त्यामुळं संबंधित इतर व्यक्तींचा रोष ओढवून घेतला जाईल, त्यांची महाराजांवर असलेली श्रद्धासुद्धा कदाचित कमी होईल. शिवाय त्यांच्या खऱ्या अडचणीमुळं त्यांना त्रासही होईल.

हे सारं लक्षात घेतलं तर, या अमलात आणण्याला निश्चयात्मकतेपेक्षा थोडं हेकटपणाचं स्वरूप येईल, शिवाय त्याला अव्यवहार्यपणाही म्हटलं जाईल. ज्या गोष्टी अर्थातच आपल्या तरी गुरूंना फारशा आवडणाऱ्या नाहीत, हे आपण समजू शकू. म्हणून अशा वेळी चिठ्ठीनं आलेल्या उत्तराचा 'शस्त्रा'सारखा वापर करू नये. त्या उत्तराला थोडी व्यवहार्य मुरड घातली आणि मूळ उत्तरातला अभिप्रेत गाभा किंवा दिशा सांभाळली तर, ते अधिक योग्य आज्ञापालन व कर्तव्य ठरेल,हे लक्षात घ्यावं.

उदाहरणार्थ :आपण गुरूंना विचारून एखादी दैनंदिन उपासना-जपाचं प्रमाण ठरवलं असेल तर ते पाळणं हे पारमार्थिक कर्तव्य झालं. ते आपल्या दृष्टीनं हिताचंही असणार. पण सकाळी उठल्यावर घरात कुणाला बरं नसेल, लहान मुलांना शाळेत सोडायला जावं लागणार असेल किंवा संध्याकाळी - रात्री आपल्याला घरच्यांसाठी किंवा त्यांच्याबद्दलच्या कर्तव्यांसाठी वेळ द्यायला लागणार असेल तर, त्यावेळी सकाळी उठून मला आज्ञा आहे म्हणून मी जप केल्याशिवाय अशी घरातली कामं करणार नाही किंवा संध्याकाळी मुलांना, घरातल्यांना आवश्यक असलेल्या कर्तव्याचा वेळ देणार नाही - अशा भूमिका घेणं यात मूळ जप सांभाळला गेला, त्यातलं कर्तव्यपालनही झालं तरी, व्यवहाराला आवश्यक असलेली तडजोड - कौशल्य यांत आपण कमी पडून, त्यापोटी आपल्याला अकारण दोष

लागणार, हे लक्षात ठेवावं.

पाऊलवाटेनं आलेले निर्णय अमलात आणतानासुद्धा त्यासाठी लागणाऱ्या व्यावहारिक तडजोडी, कौशल्य - यांचा वापर करणं हे कर्तव्यपालनाला आवश्यक आणि पूरकही आहे.

● **उपासनेशी, मार्गाशी अपरिचितांसाठी :** काही व्यक्ती कुठल्याच पंथ, उपासनेशी निगडित नसतील. पूर्वीचं त्यांचं कुठलं श्रद्धास्थानही नसेल. या मार्गाची त्यांना पूर्वकल्पनाही नसेल. त्यांना आता या मार्गाची माहिती झाली, तो पटला आणि त्यानुसार करण्याची तयारी झाली तर, पूर्वीची कुठली उपासना नसल्यामुळं तो प्रश्न कुणासमोर ठेवावा, याचा संभ्रम होऊ शकतो. यासाठी हा विचार करावा की, हा मार्ग मुळातच श्रद्धेचा आहे. ती कुणावर आहे, हा मुद्दा गौण आहे. आपण व्यवहारात जसं ज्याच्या अनुभवाबद्दल, ज्ञानाबद्दल, हितबुद्धीबद्दल खात्री वाटते त्यालाच एखादा सल्ला किंवा प्रश्न विचारतो. थोड्याफार फरकानं तीच प्रक्रिया इथं चिठ्ठीच्या मार्गानं आपण करीत असतो. फरक एवढाच की, तो सल्ला प्रत्यक्ष त्या व्यक्तीकडून घेता येतो, तो विचारात घेण्याचा उपयोग असला तरी, तसं आपल्यावर बंधन नसतं. न ऐकल्यास थोडा व्यावहारिक वाईटपणा येऊ शकतो, एवढंच.

पण यात खरा फरक हा आहे की, कुठल्याही ज्येष्ठ, अनुभवी व्यक्तीलासुद्धा ज्या मानवी मर्यादा असतात त्यांच्यापलीकडं राहणाऱ्या शक्तीला आता आपण हा प्रश्न विचारतो. त्यांच्या हितबुद्धीवर पूर्वग्रह, अनुभव - यांचं कुठलं सावट नसतं. म्हणून अशा नवीन व्यक्तींनी आपलं आपलं श्रद्धास्थान ठरवावं आणि मग त्यांच्यासमोर हा प्रश्न ठेवावा. ते

श्रद्धास्थान भले कुठली व्यक्ती असेल, कुणी गुरू असतील, कुणी श्रीमाउलींसारखे पुरातन संत असतील किंवा कुणी दैवत असेल. कदाचित, एखाद्याच्या बाबतीत त्यांच्याच घराण्यातल्या एखाद्या जुन्या पिढीतल्या व्यक्तीवरही त्याची श्रद्धा असू शकते. ती व्यक्ती हयात नसेल तरीही, ते श्रद्धास्थान मानून त्या व्यक्तीच्या प्रतिमेसमोरही प्रश्न ठेवून प्रार्थना केल्यास त्यांच्यामार्फत विश्वशक्ती त्याचं उत्तर देऊ शकते.

ज्यांची काही पूर्वीची उपासना आहे पण त्यांना हा मार्ग नवीन कळला आणि त्याचा वापर करावा असं वाटलं, तरीही त्यांनी तो अवश्य करावा, पण हे लक्षात ठेवावं की, या मार्गानं उत्तर देणारी यंत्रणा ही काही कुणी उत्तरं देणारी कोरडी व्यवहारी यंत्रणा नव्हे. आपल्या उपास्यावर किंवा सद्गुरूंवर नुसतीच श्रद्धा असण्यापेक्षाही त्यांनी उपदेश केलेली उपासना करण्याचाही आपला त्यांचा ऋणानुबंध असावा. अशी उपासनापूर्वक आयुष्याची वाटचाल करताना एखाद्या बिकट किंवा अनिर्णित अवस्थेतल्या प्रसंगी त्या त्या दैवताला किंवा सद्गुरूंना पूर्वीचे सर्व ऋणानुबंध, कृपा स्मरून आपल्या मदतीला याक्षणी येण्याची केलेली ती प्रार्थना आहे, याची जाणीव असावी.

उपासनेची नवीन सुरुवात करणाऱ्यांनीही पूर्वी केली नसली तरी, आज चिठ्ठी ठेवून विचारण्याच्या निमित्तानं कुठल्या दैवताला आज प्रार्थना केली असली आणि त्यावर श्रद्धा ठेवली असली तरी, त्यानिमित्तानं हा जोडला गेलेला श्रद्धेचा संबंध, पुढं तरी, उपासनेनं-नामानं नित्य टिकवण्याचा प्रयत्न करावा. नाहीतर अडचणीच्या वेळेला चिठ्ठी ठेवण्यापुरता त्या त्या दैवताचा संबंध आणि एरवी मात्र त्यांच्या उपदेशाचं आचरण किंवा त्यांना अभिप्रेत असलेली उपासना - याचा आपला काही संबंध नाही, असं मात्र होऊ देऊ नये. या पद्धतीनं जाण्यात आपल्याच आयुष्याचं कल्याण होत

असतं. म्हणून यानिमित्तानं आलेला संबंध असो किंवा पूर्वी उपासना करणाऱ्यांचा या मार्गानं आलेला संबंध असो - तो श्रद्धेचा संबंध तितक्याच मनापासून तितका आणि तेवढा ठेवू इच्छिणाऱ्यांनीच या पाऊलवाटेनं जाणं उचित आहे. हा मार्ग स्वतःचं कर्तव्य ठरवण्यासाठी असल्यामुळं याचा वापर इतरांना सल्ला देण्यासाठी किंवा भविष्यात्मक स्वरूपात करू नये.

● **अन्य पर्यायांचा खुलासा :** पर्याय ठेवण्याच्या बाबतीत खुलासा केल्यानुसार आपल्याला न सुचलेला एखादा पर्याय देणं गुरूंना सोपं व्हावं म्हणून हा 'अन्य पर्याय' आपल्या पर्यायांबरोबर शक्यतो ठेवावा. मात्र असा अन्य पर्याय आल्यावर काय करावं, हे सुचत नाही किंवा काही वेळा इतर पर्याय सुचत नाहीत. तर काही वेळा या अन्य पर्यायात त्यांना काय म्हणायचं आहे, याचा अर्थ कळत नाही. त्यासंबंधी खुलासा पाहू.

१.

अन्य पर्याय पहावा, असा जेव्हा निर्णय येतो, त्यावेळी त्याचे अनेक अर्थ असतात. दिलेले पर्याय पुरेसे नाहीत, हा त्याचा प्राथमिक अर्थ असतो. अगदी सोपं उदाहरण पाहायचं झाल्यास-मी काही कामासाठी मुंबईला जावं, पुण्याला जावं, अन्य पर्याय पहावा - असं जर विचारलं आणि ते काम कोल्हापूरला होणार असेल तर ते गुरूंनी आपल्याला कसं सुचवावं, हा प्रश्न सोडवण्यासाठी त्यावेळी 'अन्य पर्याय पहावा', हे उत्तर येतं. ते येण्याचा फायदा आपल्यालाच होणार असतो. पण त्याक्षणी मात्र काय करावं हे कळत नाही.

२.

अशावेळी एक लक्षात ठेवावं की, अन्य पर्याय येतो त्यावेळी आपल्यालाच

वरच्या उदाहरणात म्हटल्याप्रमाणं कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक, सांगली - असे काही पर्याय सुचत आहेत का, हे पाहावं. सुचल्यास ते विचारावे. कदाचित त्यांची आज्ञा या पर्यायांपलीकडंही असली तर, पुन्हा हे विचारल्यावरही अन्य पर्याय येऊ शकतो. असं झाल्यास त्याचा अर्थ आपण थोडं थांबावं, असा होतो. या थांबलेल्या काळात आपल्याला अजून काही माहिती मिळते, अधिक पर्याय सुचतात - असा अर्थ होतो. त्यामुळं असा पर्याय आल्यास थोडं थांबणं आणि अधिक विचार करणं, हे उपयोगी ठरतं.

३.

अनेकदा आपण विचारलेला प्रश्न किंवा त्याची आपल्याला असलेली निकड किंवा योग्य वाटणारी वेळ-इत्यादी गोष्टी चुकीच्या असतात.ते सुचवण्यासाठीसुद्धा हा अन्य पर्याय येतो. उदाहरणार्थ : आपल्याला काही आजार झालेला असेल. त्याच्या तपासणीचे रिपोर्ट आलेले असतील. त्यावर आपल्याला आपल्या डॉक्टरांनी काही पर्याय सुचवले असतील. ते आपण या मार्गानं गुरूंसमोर ठेवले असतील. त्यावेळी अन्य पर्याय आला तर, निदान एखाद-दोन दिवस थांबणं योग्य ठरतं. प्रकृतीत काही फरक पडतो, पुन्हा काही तपासण्या होऊन रोगनिदान बदलतं, स्वाभाविकपणे डॉक्टरांकडून आता वेगळे पर्याय सुचवले जातात. ते समोर ठेवल्यास त्यांतलं योग्य उत्तरही येतं. याचाच अर्थ आपण प्रश्न विचारण्याची ती वेळ अजून आली नव्हती. म्हणून त्यांनी अन्य पर्याय देऊन आपल्याला नवी परिस्थिती समोर आणली आणि आपल्याला खऱ्या मार्गाकडं - कर्तव्याकडं नेलं, हे दिसून येईल.

४.

काही वेळा अन्य पर्याय आला आणि आपल्याला इतर काही पर्याय सुचत नसतील तर आपण थांबतो. आठवडाभर तो प्रश्न तसाच राहातो. पुढं असं

लक्षात येतं की, परिस्थितीमध्ये असा काही बदल घडून आलेला आहे की, आता हा प्रश्नच मुळात उरला नाही. स्वाभाविकपणे तो विचारणं आणि निर्णय घेणं-याचीही आवश्यकता राहिली नाही.उदा.नोकरीत एखाद्यावेळेस आपल्याला बदलीसाठी एक-दोन गावांची विचारणा होते. आपण संभ्रमात असतो. आपण ते पर्याय गुरूंसमोर ठेवतो. ते त्याला अन्य पर्याय असं उत्तर देतात. इतर गावं आपल्यासमोर पर्याय म्हणून नसल्यानं आपण थांबतो.दुसऱ्या दिवशी पुन्हा वरिष्ठ कार्यालयाचा फोन येतो की, काही तांत्रिक कारणांमुळं सध्या बदल्या करण्याचा मूळ निर्णय पुढं ढकललेला आहे. अर्थातच आता पर्यायांचा किंवा निर्णयाचा प्रश्नच उरत नाही.या मार्गानं या अन्य पर्यायाचा आपल्याला दुसऱ्या दिवशी उलगडा होतो.

● **उत्तरांच्या अर्थांचा खुलासा :** मुळात हा मार्ग विशिष्ट परिस्थितीत आपलं कर्तव्य काय आहे, हे ठरवण्याचा आहे. हे आपल्याला ठाऊक असलं तरी, नकळत आलेल्या उत्तरांचा चुकीचा अर्थ घेतला जाण्याची शक्यता असते. त्यांच्या बाबतीतले खुलासे पाहूया.

१.

अमुक एक करावं असं उत्तर असेल तर त्या परिस्थितीत मी ते कर्तव्य म्हणून करणं 'बरोबर' आहे असा होतो. पण मी ते केलं तर ते यशस्वी होईल असा अर्थ उगाचच मनानं घेतला जातो, हे पूर्ण लक्षात ठेवावं.उदा. एखाद्या साइडला जा,एखाद्या गावची बदली स्वीकारा,अमुक एक व्यवसाय सुरू करा- अशा कर्तव्यांच्या निर्णयाचा अर्थ अनुक्रमे त्या साइडला मी पास होणार किंवा त्या गावी बदली झाल्यानंतर मला कुठलाही त्रास होणार नाही- उलट प्रमोशन मिळेल किंवा त्या व्यवसायात मला भरपूर नफा मिळेल-असा अर्थ नसतो.हे

घडणार नाही ,असं नाही. पण त्यांनी सांगणं म्हणजे ते यशस्वी होणार असं वाटणं आणि आपण ते कर्तव्य म्हणून करणं - यांतला फरक आपण ओळखावा. आपण ती ती गोष्ट करणं कर्तव्य म्हणून योग्य असतं, आवश्यक असतं,अनेकदा आपलं प्रारब्ध त्यामुळं फिटत असतं आणि ते फेडून आपल्याला मुक्त करण्याची गुरूंची इच्छाही असू शकते.यात लौकिकदृष्ट्या आपल्याला अपयश आलं, त्रास झाला, तोटा झाला तर,गुरूंनी निर्णय देऊनही असं कसं झालं,असं वाटणं, हे चुकीचं आहे, हे आपण लक्षात घ्यावं. कारण ते कर्तव्य केल्यानं आपल्याला बाह्यतः त्रास झाला तरी, पारमार्थिकदृष्ट्या आपलं कल्याणच होत असतं. उदा.चिठ्ठीनं ऑपरेशन करून आजार बरा न होता, अंथरुणाला खिळून लौकिक पराधीनता आली तरी, उपासना तीव्र होऊन जगात न अडकणं, आत्मानुभवापर्यंत पोचणं, एकाच जागी बसल्यानं होऊ शकणारी लेखन-सेवा शक्य होणं इ. अंतिमतः लाभदायक गोष्टी घडतात, हा अनुभव आहे.

२.

अगदी चिठ्ठीनं विचारून निर्णय घेतलेल्या बाबतीतही अंमल करताना अडचणी येणं, इतरांनी टीका करणं - असे प्रसंग घडू शकतात. अशावेळी गुरूंनी असं करा असं सांगूनही असं का घडतं, असं वाटणं योग्य नाही. कारण तो निर्णय 'अंतिम हिता'चा असतो, एवढं नक्की. तो तात्कालिक सुख किंवा यश यांच्याशी निगडित नसतो आणि खऱ्या कर्तव्यात तर तेच अभिप्रेत असतं.

३.

याबाबतीत येणाऱ्या निर्णयाचा अंमल करण्यापूर्वी त्याची तीव्रता ठरवणं, हे आपलं कर्तव्य असतं. शंका आल्यास आपण त्यात त्यांची किंवा इतर कुणाची मदतही घेऊ शकतो. कारण मुळात आपण समजा तीन पर्याय ठेवलेले असतील तर, त्यात निर्णय येताना तो त्याची गुरूंना अभिप्रेत असलेली दिशा, भाग, -एरिया- दर्शवीत असतो. त्याची तीव्रता - टोन हे त्यातून

कळतंच, असं नाही. त्यात तो मार्ग कोणत्या तीव्रतेनं चालावा, याचा नीट उलगडा करून घेऊन मग तो चालणं हे योग्य असतं.

उदाहरणार्थ : मुलगा अभ्यास करीत नाही. त्याबद्दल त्याला सांगण्यात - शिक्षा करण्यात आपलं कर्तव्य नक्की काय याचा बोध होत नाही. म्हणून आपण पाऊलवाटेनं प्रश्न विचारला. शिक्षा करावी, करू नये - यांपैकी एखादं उत्तर आलं. उदा. शिक्षा करावी. आता याची दिशा मुलाला कर्तव्य म्हणून आपण शिक्षा करण्याची गरज आहे, असं गुरूंना म्हणायचं आहे, ही दिशा किंवा एरिया कळतो. पण त्याचं स्वरूप आणि तीव्रता यांचा उलगडा एवढ्यावरून होतो,असं नाही. कारण, शिक्षेचं स्वरूप साधं समजावून देण्यापासून ते जाणवणाऱ्या एखाद्या प्रभावी शिक्षेपर्यंत काहीही असू शकतं. त्यावेळी आपण कदाचित कर्तव्य गुरूंनी सांगितलेलंच करत असू, पण त्याची त्यांना अभिप्रेत तीव्रता किंवा स्वरूप नसण्याची शक्यता आहे.म्हणून त्यासंबंधीसुद्धा विचार करावा.उलगडा करून घ्यावा आणि मग पुढं जावं.

४.

या प्रक्रियेनं आलेला निर्णय हा आपल्याला आता माहीत झालेल्या एका श्रद्धेच्या मार्गानुसार आलेला ईश्वरी निर्णय असला तरी, तो निर्णय ही प्रक्रिया झाल्यावर 'मी'काढून उरणाऱ्या आपल्या सारासार विवेकबुद्धीचाच समजावा. निदान लौकिकदृष्ट्यातरी. कारण ज्यांना हा मार्ग माहिती आहे, त्याची खात्री आहे, त्यांना ते कळलं तर पटू शकेल. पण इतर सामान्य माणसांना ते लौकिकात पटणार नाही. म्हणून हा निर्णय आपण विचार करून घेतलेला निर्णय आहे, एवढंच याबद्दल बाहेर सांगणं योग्य होईल. म्हणजे त्यावरची अकारण व निष्फळ चर्चा टाळता येईल. मला गुरूंनी असं करायला सांगितलं आहे, असं निदान अकारण कुणाला सांगत जाऊ नये, जाहिरात करू नये, निदान अश्रद्ध व्यक्तींना तरी सांगू नये. याचं कारण असं की, ही प्रक्रिया

बरोबर असली तरी, ती सिद्ध करण्याची किंवा पटवण्याची क्षमता प्रत्येकाकडं असेलच असं नाही. ती कमी पडल्यास आपणच द्विधा होण्याची शक्यता असते किंवा टीकेचा विषय होण्याची शक्यता असते. मात्र ज्यांची श्रद्धा असल्या कुठल्याही प्रतिक्रियांनी ढासळण्यासारखी नाही त्यांनी हा निर्णय या मार्गानं मी घेतला आहे आणि त्याची जबाबदारीही घेतली आहे, असं सांगितलं तरी चालेल.

५.

काही उत्तरांच्या बाबतीत एक वेगळाच अर्थ अनुभवायला येतो, असं आढळतं. म्हणजे असं की, वर म्हटल्याप्रमाणं जसं अमुक एक करावं, याचा अर्थ त्यात यश येईल असा नव्हे, तर ते करणं योग्य आहे, असा होतो. तसंच अनेकदा काही निर्णयांच्या बाबतीत तो आपण घ्यावा, किंवा घेतला म्हणून सांगावं एवढाच त्याचा अर्थ असतो. म्हणजे असं घडतं की, आपण नुसता तो निर्णय घेतला आहे एवढं सांगितल्यानंतर संबंधितांत शांतता होते, काही वेळा तर तो निर्णय प्रत्यक्ष अमलात आणण्याची वेळच येत नाही. कालांतरानं त्याचा प्रत्यक्ष अंमल करण्याची आवश्यकताही उरत नाही. मग अशा वेळी असा निर्णय गुरू का देतात, याचा विचार केला तर, असं लक्षात येईल की, त्यांनी आपल्याला दिलेल्या निर्णयानं आणि तो आपण घेतल्याचं सांगितल्यानं इतर अनेक गोष्टी साध्य होतात - उदाहरणार्थ : इतरांचे त्यावर अवलंबून असलेले निर्णय होतात, काही वेळा आपण निर्णय घ्यावा अशा त्यांच्या अपेक्षा पूर्ण होतात आणि ते शांत होतात. इत्यादी. म्हणजे अशा गोष्टी साध्य व्हाव्या म्हणूनही काही निर्णय या प्रक्रियेतून येतात. जे प्रत्यक्ष अमलात येतही नाहीत आणि त्यांची गरजही नसते. पण ते घेतले जाण्याची मात्र गरज असते आणि ती गरज त्यावेळेला कर्तव्य म्हणून गुरू आपल्याकडून पुरी करून घेतात आणि त्यामार्फत अन्य आनुषंगिक उचित गोष्टी साध्य होतात,

हे लक्षात घेण्यासारखं आहे.

● **अपवादभूत परिस्थितीतला वापर :** मुळात हा मार्ग आपलं कर्तव्य ठरवण्यासाठी भगवंताची मदत घेण्याचा आहे, हे तर स्पष्ट आहे. त्यामुळं त्याचं मुख्य स्वरूप हे मी विशिष्ट परिस्थितीत काय करावं, हे ठरवण्याचंच आहे. हे जरी खरं असलं तरी, काही अपवादभूत परिस्थिती पुढं विचारात घेऊया.

१.

काही वेळा आपल्याला एखाद्या गोष्टीचा आपला काही संबंध असेल, असं वाटत नाही. त्यामुळं त्याबाबतीत काही कर्तव्य करण्याचाही प्रश्न आपल्या मनात येत नाही. स्वाभाविकच पाऊलवाटेचाही प्रश्न उद्‌भवत नाही.

पण असं आढळून येतं की, कुणाला मदत व्हावी म्हणून, आपलं काही प्रारब्ध-पूर्वऋणानुबंध समोर यायची वेळ येते म्हणून किंवा विश्वशक्तीला आपल्याकडून तशी अपेक्षा आहे म्हणून - एखादा विषय आपल्यासमोर अनपेक्षितपणे किंवा जाणवेल इतका वारंवार यायला सुरुवात होते. काही वेळा तर आपला संबंध - इच्छा नसेल तर तो आपण टाळतोही.

तरीही, तो या ना त्या माणसाकडून- कारणानं आपल्यापर्यंत आल्याशिवाय राहात नाही. उलट सलगपणे येत राहातो. असं काहींच्या बाबतीतच आणि काही विषयांच्या बाबतीतच अपवादानं होऊ शकतं. मग आपल्याला वाटो-न वाटो आपलं त्याबाबतीत काही कर्तव्य लागतं. ते कर्तव्य या नात्यानं अर्थातच पुरं करावं लागतं. त्यावेळी वर सांगितलेल्या परिस्थितींतील ही घटना आहे की नाही, हे ठरवणंही अवघड होतं. अशा विषयांच्या बाबतीत हा विषय माझ्या कर्तव्याचा विषय आहे की नाही,

हेसुद्धा प्रश्न म्हणून पाऊलवाटेनं विचारता येतं.

त्यानंतर तो विषय आपला आहे, असं ठरलं तर, आपल्या इतर कर्तव्यांच्या बाबतीत आपण घेतो तसे निर्णय घेता येतात, अनिश्चितता झाली तर, अर्थातच हे निर्णय पुन्हा पाऊलवाटेनं सोडवता येतात. अशा प्रसंगांत हे लक्षात ठेवावं की, ईश्वराला हे प्रसंग आपल्या हातून सोडवण्याची इच्छा आहे. म्हणूनच ते विषय आपल्यासमोर आणूनआणून ते आपल्या लक्षात आणून दिलं जात होतं आणि त्याची खात्रीही पाऊलवाटेनं आपल्याला दिली गेली आहे.

उदाहरणार्थ :आपला ज्या कुटुंबाचा फारसा संबंध नाही, त्यांच्या कुटुंबातले कुठले निर्णय आपण घेण्याचाही संबंध नाही - तरीसुद्धा वर उल्लेखलेल्या परिस्थितीत ते आपल्यासमोर येऊ शकतं. त्याची खात्री पाऊलवाटेनं होऊ शकते. आपल्याला कल्पना नसली तरी, आपल्या लक्षात येतं की, ते आपल्यामार्फत ते प्रश्न योग्य पद्धतीनं सुटून त्या त्या व्यक्तींचं सहकार्य मिळतं, त्यांचे प्रश्न सुटून त्यांना समाधानही होतं. आता व्यावहारिक दृष्ट्याही कदाचित इतरांना - नातेवाईकांना आपण त्यांच्या प्रपंचात घातलेलं लक्ष - लुडबूडही वाटू शकते. पण पाऊलवाटेच्या मार्गामुळं आपण विचलित होत नाही तर, उलट आपलं कर्तव्य करून त्या प्रसंगातून बाजूला होऊ शकतो. शांत राहू शकतो.

२.

आधी आपण प्रश्न विचारण्याबद्दल जी सर्वसाधारण कसोटी दिली आहे त्यात कायदाकानू, सामान्य औचित्य, नीतिनियम, योग्य - अयोग्य ठरवण्याचा प्रचलित सामाजिक विचार - अशा गोष्टींचा विचार करून मग आपला प्रश्न शास्त्रविरुद्ध किंवा अनौचित्याचा नाही ना, हा विचार करावा आणि मग तो विचारावा, असं म्हटलं आहे.

इथं अपवाद म्हणून हे लक्षात ठेवावं की, अनेक गोष्टींप्रमाणंच या साऱ्या शास्त्रमार्गाच्या गोष्टीही काळसापेक्ष - समाजसापेक्ष असतात. त्यामुळं त्या कधीही पूर्ण निकाली नसतात. पण आपल्यावर असलेल्या संस्कारांमुळं आपल्या ते लक्षात येत नाही. अशावेळी थोडं सावधान राहून विचारण्याचा निर्णय घ्यावा लागतो किंवा पर्याय काढावे लागतात. वरवर पाहाता विचारणं चूक वाटणारी गोष्ट किंवा एखादा पर्याय हा कदाचित अंतिमतः किंवा प्रारब्ध म्हणून, अपवाद म्हणून आपलं कर्तव्य ठरू शकतो. अर्थात त्याची खात्री आपण पाऊलवाटेनं करून घेणं योग्य होईल.

उदाहरणार्थ : खरं बोलावं, हा एक सर्वसाधारण नीतिनियम आहे. पण पेशंटच्या रोगाचं निदान झालं असलं, ते गंभीर असलं, त्या रोगानं तो जाण्याची शक्यता असली तरी, अशावेळी खरं बोलणं हे त्या पेशंटची तशी क्षमता नसेल तर, त्याला खचवणारं किंवा त्याचं आयुष्य आणखी कमी करणारं ठरू शकतं. म्हणून त्याचं मनोधैर्य राखण्यासाठी, आता तुम्ही बरे व्हाल, असं सांगणं - हे खोटं सांगणं असलं तरी, ते आपलं त्याक्षणी कर्तव्य असू शकतं.

याही पुढं असंही होऊ शकतं की, वर म्हटलं तसं हे तरी कर्तव्य नक्की आहे की नाही, याचंही निकाली उत्तर देणं अवघड असतं. कारण शेवटी पेशंटचं मनोधैर्य, त्याचं आयुष्य आणि त्याचं कल्याण - या गोष्टी या साऱ्या मानवी नीतिनियम, रूढी या साऱ्यांच्या पलीकडं आहेत. म्हणजे असं की, काही वेळा त्या पेशंटचं आयुष्य कमी आहे, असं आपलं निदान त्याला सांगितलं तर, सावध होऊन तो कदाचित प्रापंचिक विवंचना, काळज्या - यांचं योग्य मूल्य ओळखून, त्या बाजूला टाकून, ईश्वराच्या स्मरणात राहिलेले काही तास-दिवस काढून, चांगल्या मनःस्थितीत राहून, आपलं कल्याणही साधू शकतो. अशा वेळेला आपल्या उत्तरांच्या पर्यायांच्या बाबतीत

किंवा प्रश्न विचारण्याच्या बाबतीत खऱ्याखोट्याच्या नीतिनियमांत अडकण्यात अर्थ नसतो.

हीच गोष्ट व्यवहारात अनेक माणसांच्या संबंधात येणाऱ्या पारदर्शकपणाबद्दल असते. पारदर्शकपणा असावा, ही गोष्ट सर्वसाधारण कायदा, नीती, रूढी - यांना धरून असली आणि त्यामुळं एखाद्याला आपला एखादा व्यवहार किंवा एखादी माहिती न देण्यासंबंधी विचारणं, हा प्रश्न सामान्य परिस्थितीत गैरलागू ठरेल. पण कायद्यासारख्या सर्व गोष्टी या, व्यक्तींच्यातले समजुतीच्या क्षमतेचे असलेले विलक्षण भेद विचारात घ्यायला समर्थ नसतात. ते अनेकदा त्या चौकटीत शक्यही नसतं.

जाताजाता एक संदर्भ देणं योग्य ठरेल की, जेव्हा समाजाच्या शांतता-सुरक्षिततेचा प्रश्न असतो, किंवा शत्रुराष्ट्र-विदेश - यांच्या व्यवहारांचा संबंध असतो - अशा ठिकाणी सर्वांच्या हिताच्या दृष्टीनं कायद्यानंसुद्धा काही माहिती ही गौप्य स्वरूपाची ठेवण्याबद्दलच्या तरतुदी आहेत. त्या विधिसंमतही आहेत आणि शास्त्रसंमतही आहेत. त्या तशा ठेवल्यानं समाजाला अकारण माहिती मिळून, त्याचा गैरवापर होऊन किंवा समाजमनाची तेवढी क्षमता नसेल तिथं त्यावरून अकारणच विघातक गोष्टी घडून - होणारी हानी टाळता येते. या गोष्टींसारखीच वैयक्तिक पातळीवरच्या, कौटुंबिक-सामाजिक संबंधातल्या काही माहितीची अवस्था असू शकते. माहिती बरोबर असली, ती द्यायची तयारी असली तरी ती ज्याला किंवा ज्यांना द्यायची त्यांना त्याची आवश्यकता नसेल, ती समजून घेण्याची कुवत नसेल तर, अशी अकारण माहिती ही विनाकारणच विघातक ठरू शकते. आपला व्यक्तिगत स्वार्थ त्यामागं नसला तर, अशा अपवादभूत प्रसंगांत अशी माहिती न देण्याचा प्रश्न गुरूंना विचारणं युक्त ठरू शकतं. त्यांनी पाऊलवाटेनं दिलेलं उत्तर हे आपल्याच नव्हे तर, संबंधित व्यक्तींच्यासुद्धा अंतिमतः कल्याणाचं ठरतं,

याचा अनुभव येऊ शकेल.

३.

आणखी एक अपवाद आढळून येतो. सर्वसाधारण माणसाला स्वप्न पडण्याची सवय असते. त्याची मानसशास्त्रीय चिकित्सा हा विषय अजून पूर्ण निकाली नाही. त्याचा आपला इथं संबंधही नाही. पण मानवी संवेदना आणि ईश्वरी संपर्क याबाबतीत स्वप्नांचा उपयोग वेगळ्या प्रकारे होऊ शकतो. जे मनी ते स्वप्नी, अशा स्वरूपाची स्वप्नं ही आपण फारशी विचारात घेत नाही, घेऊही नये. अकारण भीती, घडाव्याशा वाटणाऱ्या गोष्टी, स्वप्न पडण्याचा स्वभाव - अशांपोटी पडणारी ही स्वप्नं आपण विचारात घेऊ नये, हे बरोबर आहे. पण मानवी संवेदनेला जशा काही विलक्षण, सूक्ष्म शक्ती आहेत, उदा. पुढं घडणाऱ्या एखाद्या गोष्टीची जाणीव होणं, करण्याच्या कामाची सूचना मिळणं, काही दर्शन होणं, मृत्यूची पूर्वसूचना मिळणं इ. - अशा शक्तींना स्वप्नांच्या मार्गानं व्यक्त होणं शक्य आहे. काही सूचना देण्यासाठी ईश्वराला तर हा मार्ग वापरणं सहजच शक्य आहे.

ज्या स्वप्नांमुळं आपण एखादी कृती कर्तव्य म्हणून करावी की नाही, असा प्रश्न जर निर्माण झाला तर, त्याचं उत्तर देण्याच्या बाबतीत अनिश्चितता येते आणि तेव्हाही या पाऊलवाटेचा उपयोग होऊ शकतो. पडलेलं स्वप्न त्याला मूल्य देऊन, काही संबंधित कृती करण्यासारखं आहे की नाही, या आपल्या कर्तव्याचा निकाल लागणं, हे आवश्यक असू शकतं. त्याबाबतीत पाऊलवाटेचा वापर करता येतो. यामुळं स्वप्नं ही स्वप्नं म्हणून सोडून देण्यासारखी आहेत की, काही अपवादभूत परिस्थितींत वर म्हटल्याप्रमाणं काही कृतीची सूचना आहेत, याची खात्री या पाऊलवाटेनं मिळून एकतर माणसाचा अकारण विचार टळू शकतो किंवा कृती अपेक्षित असल्यास ती कर्तव्य म्हणून करता येते.

४.

हा मार्ग मुळात श्रद्धेचा आहे. आपल्या मनाला, बुद्धीला ज्यावेळी पूर्ण निश्चितता असते, काहीवेळा अनुभवांचा निःसंशय आधार असतो, त्यावेळी कुणावर श्रद्धा ठेवावी, हा मूळ प्रश्न सोडवणं सोपं असतं. पण आजची बाहेरची परिस्थिती पाहाता - भोंगळपणा, बुद्धी-तर्कनिष्ठतेचा अभाव, क्वचित कधी त्यांच्यावरचा अवाजवी भर, तंत्रविद्या - गूढविद्या, व्यक्तिगत प्रभाव, शब्दकौशल्य, पाठिराख्यांची प्रभाव टाकणारी संख्या-भूल घालणारे डामडौल- आपले किंवा जगातले सारे प्रश्न सोडवण्याची असंभाव्य पण त्याक्षणी मनाला खरी वाटणारी आणि दिलासा देणारी खात्री - अशा अनेक मार्गांनी कुणा व्यक्तींची भूल माणसांना पडणं, आजच्या असुरक्षित परिस्थितीत आणि माध्यमांच्या जाळ्यात अधिकच शक्य झालं आहे.

या स्थितीत खरंतर देहात हयात नसणाऱ्या गुरूंवर श्रद्धा ठेवणं,तसंच एखाद्या सर्वमान्य दैवतावर श्रद्धा ठेवणं, हे तसे निर्धोक मार्ग आहेत. पण माणसाला शेवटी देहधारी व्यक्तीची जी खात्री, आधार, गरज वाटते - तीही तेवढीच खरी आहे. पण ती व्यक्ती तशा योग्यतेची असली तर. आता ही योग्यता आपण कशी ठरवणार, हा प्रश्न उरतोच. पण मूळ श्रद्धेचा प्रश्नच जर अनिर्णित झाला तर, मग तो सुटल्याशिवाय आपण कर्तव्यासाठी कुणासमोर पर्याय ठेवणार, असा पुढचा प्रश्न आपोआपच उद्‌भवतो.

अशा अपवादभूत प्रसंगी, मुळातच एखाद्या व्यक्तीवर-स्थानावर श्रद्धा ठेवावी की नाही, हा प्रश्न अज्ञात पण असीम, निर्गुण ईश्वरी शक्तीला विचारणंच योग्य ठरतं. मग त्या बाबतीतही या पाऊलवाटेचा वापर करता येतो. सगुण श्रद्धास्थान नक्की होतं आणि पुढची वाटचाल शक्य होते.

उदाहरणार्थ : जसं बीजगणितात 'क्ष' मानल्याशिवाय उदाहरण सोडवायला सुरुवात करता येत नाही. 'क्ष'ची किंमत आपल्याला त्याक्षणी

तरी सांगता येत नाही. पण ती कळल्याशिवाय मी उदाहरण सोडवणारच नाही, असं म्हटलं तर पुढची पायरीसुद्धा मांडता येणार नाही. तसंच मुळात कुठंतरी श्रद्धा ठेवल्याशिवाय नक्की कुठं श्रद्धा ठेवावी, हा प्रश्न सोडवता येणार नाही. कारण कशावरच श्रद्धाच नसेल तर, या मार्गानं प्रश्न सोडवण्याची पुढची वाटचालच अशक्य होऊन बसते. एकदा 'क्ष' मानला तर, केवढंही मोठं गणित त्या मार्गानं सुटू शकतं. इतकंच नव्हे तर, मानलेल्या 'क्ष'चं मूल्यसुद्धा शेवटी कळतं. तसं या मार्गात सगुणावर श्रद्धा ठेवण्याच्या आधी वर उल्लेखल्याप्रमाणं निर्गुण 'क्ष' मानला की, मग पुढच्या पायऱ्यांनी सगुण 'क्ष'पर्यंत निश्चित पोचता येतं.

इथं हेही लक्षात घ्यावं की, इतपतसुद्धा निर्गुण 'क्ष'वर आपण श्रद्धा ठेवणार नसू तर, जी आपली तर्कबुद्धी-विवेकशक्ती हा विश्वास ठेवायला तयार नाही, त्या आपल्या तर्कबुद्धीवर-विवेकशक्तीवर आपली श्रद्धा आहे, असा त्याचा अर्थ होतो. तीसुद्धा निर्गुणच आहे. तेच थोडक्यात या निर्गुणावर विश्वास ठेवून आपल्याला सगुण व्यवहाराला गरजेचा श्रद्धेचा सगुण आणि विश्वसनीय मार्ग शोधण्यानं साधतं.त्यामुळं निर्णयांचं गुंतागुंतीचं गणितही सुटतं.

५.

आणखी एका अपवादाचा विचार करून हा विषय संपवूया. सुरुवातीला केलेल्या चर्चेमध्ये आल्याप्रमाणं ऊठसूठ पाऊलवाटेनं प्रश्न विचारू नयेत, हे खरं असलं आणि फक्त तेवढ्या महत्त्वाचे प्रश्नच या वाटेनं विचारावेत, हेही खरं असलं तरी, अशी काही अपवादाची वेळ येते की, हा प्रश्न पाऊलवाटेनं विचारावा की नाही, हाच प्रश्न पडतो. तो सोडवताही येत नाही. आता ही पाऊलवाटेची कृपाच म्हटली पाहिजे की, हा प्रश्न मी पाऊलवाटेनं सोडवू का नको, की मला परिस्थिती, बुद्धी - यांनी असलेल्या शक्तीनंच तो सोडवावा - हाही प्रश्न पाऊलवाटेनं विचारला जाऊ शकतो. त्याचं उत्तर विचारावा

किंवा नाही, असं येऊ शकतं आणि त्यानुसार आपण आपलं प्रश्न विचारण्यातलं कर्तव्य योग्य तऱ्हेनं पार पाडू शकतो.

यात अशी शंका उद्‌भवू शकते की, या मार्गावर एकदा श्रद्धा असताना, असा प्रश्न विचारणं योग्य होईल का, कारण आपली जर श्रद्धा आहेच तर सरळ विचारावं आणि त्यानुसार करावं.विचारणं म्हणजे मी, माझ्या बुद्धीनंसुद्धा याचा निर्णय करू शकतो, असं मला वाटतं, असाही अर्थ होतो. त्याचं उत्तर असं की,आपण फक्त प्रश्नाचं महत्त्व ठरवीत आहोत. ते महत्त्व ठरवताना आपण चुकू नये, एवढीच काळजी आपल्याला आहे.

दुसरा प्रत्यक्ष अनुभव तर असा आहे की, आपल्याला एखाद्या प्रश्नाचं आपल्या शक्तिबुद्धीनुसार जे उत्तर आधी योग्य वाटत होतं, त्याबद्दल थोडी शंका उत्पन्न होऊन तो प्रश्न समोर ठेवल्यावर हा प्रश्न पाऊलवाटेनं विचारावा, असं उत्तर येतं. प्रत्यक्षात तो प्रश्न समोर ठेवल्यावर येणारं उत्तर आपल्याला जे आधी योग्य वाटत असतं, तेच येतं. मग त्याचा अर्थ काय, असा प्रश्नही उद्‌भवतो. त्याचा खुलासा असा की, जे मी आधी माझ्या शक्तिबुद्धीनं करणार होतो, त्यात येणाऱ्या यशाच्या बाबतीत मला नकळत अहंकार होऊन उत्तर तेच असलं तरी, माझं पारमार्थिक नुकसान होऊ नये म्हणून हा प्रश्न विचारावा, असं उत्तर आलेलं आहे. कारण आता जरी मी तेच करीत असलो तरी, ते त्यांनी सांगितल्यामुळं केल्याचा भाव, कायम राहून अहंकार टाळता येतो आणि हे त्यांना लक्षातही आणून द्यायचं असतं.

तेव्हा या मार्गानं आपल्यासमोर कर्तव्य म्हणून कोणताही निर्णय आला तरी, शांत राहून तो अमलात आणून त्यातून काय-काय निष्पन्न होत राहातं, ते पाहावं आणि आपल्या हिताची काळजी आपल्या उपास्य दैवताला कशी असते, त्याचा अनुभव घेत राहावं.

४. पाऊलवाटेचा समारोप

● **समारोपापूर्वी :** कर्तव्याच्या निर्णयांच्या बाबतीतल्या या एका सश्रद्ध वेगळ्या पाऊलवाटेचं विवरण संपवण्यापूर्वी ही प्रक्रिया वापरण्यातल्या फायद्या-तोट्यांचा एक सोपा व आवश्यक आढावा आपण घेऊया.

● **महत्त्वाची सावधगिरी :** माणसाला परिस्थितीत योग्य कर्तव्याचा निर्णय घेण्यासाठी बुद्धी, भावना, स्वातंत्र्य, स्मरण, सर्व दुव्यांचं संकलन - अशा अनेक प्रकारच्या अत्यंत प्रगल्भ शक्ती दिलेल्या आहेत. त्यांचा वापर करून योग्य विचार आणि निर्णय घेणं हे व्यक्तिगत आणि सामुदायिक पातळीवर नेहमीचं आयुष्य जगण्यासाठी आवश्यक, गरजेचं आणि मोलाचं आहे, हे वेगळं सांगायला नकोच.

तरीही, या प्रक्रियेच्या संदर्भात त्याचा या समारोपात मुद्दाम उल्लेख करण्याचं कारण असं की, चिठ्ठी ठेवून निर्णय घेण्याची ही प्रक्रिया वरवर पाहाता सोपी, जलद आणि त्यामुळं सुलभ वाटते. त्यामुळं नकळत-तीच प्रक्रिया बरी- अशी वृत्ती होण्याची शक्यता आहे. यापद्धतीनं निर्णय घेण्यात स्वतःला साधकबाधक विचार करण्याचा त्रास, कटकट, संभ्रम, निर्णयाची

जबाबदारी - असे अनेक नको वाटणारे घटक टळतात. असं घडल्यानं हा कमी त्रासाचा मार्ग बरा, असंही वाटण्याची शक्यता आहे. काही माणसांना जसं, विचार करण्यापेक्षा घरातल्या किंवा बाहेरच्या कुठल्या मोठ्या माणसाला विचारून काय ते निर्णय घेणं बरं वाटतं, ती सवय लागते, तसं या मार्गानं होण्याची शक्यता आहे. यात माणसाची विचाराची आणि निर्णयाची शक्ती कमकुवत होण्याचा तसंच दुर्लक्षित होण्याचा एक संभाव्य धोका आहे. म्हणून याबाबतीत सावधगिरीचं महत्त्व आपण पाहात आहोत. त्यादृष्टीनं पुढील मुद्दा लक्षात घ्यावा.

या प्रक्रियेच्या सुरुवातीलाच स्पष्ट केल्याप्रमाणं हा मार्ग मुख्यतः व्यक्तिगत, फक्त महत्त्वाच्या बाबतीतला आणि इतर आधार संपल्यावरचा निर्वाणीचा मार्ग आहे. याची सदैव आठवण ठेवावी. हा मार्ग वापरण्यापूर्वी तो वापरण्याइतपत परिस्थिती आली आहे की नाही, याची खात्री करून घेण्याची गरज आहे. मानवी बुद्धीच्या अंतिम मर्यादा लक्षात आल्यानंतरच्या परिस्थितीत किंवा निर्णय होण्याच्या परिस्थितीत ५०:५० टक्के झाल्याची वेळ येणं किंवा अशा स्वरूपाच्या परिस्थितीतच या मार्गाची माणसाला गरज व औचित्य असू शकतं. तसं नसल्यास मात्र बुद्धी आणि निर्णयशक्तीच्या वापराचे सामान्य मार्ग एरवी सर्वत्र कटाक्षानं वापरणं आवश्यक आहे.

● **सोपेपणा पण कसोटीही :** दुसरी बाब या मार्गानं निर्णय मिळणं बिनकष्टाचं, सोपं, जलद, सुलभ वाटतं आणि त्यामुळं नेहमी असंच करावं, असं वाटतंही. असं वाटत असलं तरी, हे सोपेपण वाटतं एवढं सोपेपण नसून काही प्रमाणात तो सोपेपणाचा भ्रम आहे, हे थोडा विचार केला तर, लक्षात येईल.तो विचार असा की,या पद्धतीनं आलेले निर्णय आपल्याला

घ्यावे लागले नसले आणि त्यामुळं सोपे वाटत असले तरी, आलेल्या निर्णयांचा निःशंक अंमल मात्र आपोआप होत नसतो. तो अंमल करायला वाटतो एवढा सोपा नसतो. विकल्प, दुसरा विचार (सेकंड थॉट), अंमल करताना त्यात येणारी अपयशं, इतरांची द्विधा करून टाकणारी मतं, या मार्गानं निर्णय घेण्याच्या तर्कशुद्धतेची, श्रद्धेची कल्पना नसणाऱ्यांकडून त्यावर भली-बुरी टीका होणं - असे असंख्य अडथळे पुढे येऊ शकतात. जगातल्या इतर मार्गानं स्वतः निर्णय घेण्याच्या आणि त्याची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत येणाऱ्या अडथळ्यांच्या तुलनेनं हे अडथळे थोडे अवघडच असतात. श्रद्धा आणि निर्धार असलेल्या माणसाला हे फारसं जड जात नाही. पण तेवढी उपासनेची किंवा निदान या मार्गावरची निष्ठा पक्की असावी लागते. व्यवहारात किंवा परमार्थात करायच्या आज्ञापालनाला जसा आणि जेवढा पक्का निर्धार लागतो तसाच या पाऊलवाटेनं येणारा निर्णय आज्ञापालनासारखा पुरातन आहे तरी, तो निष्ठेची आणि निर्धाराची कसोटी पाहणारा असतो, हे लक्षात ठेवावं. याद्दष्टीनं यातल्या सोपेपणाचा अर्थ लक्षात घ्यावा.

वर केलेली चर्चा लक्षात घेऊनही एक गोष्ट स्पष्ट करणं आवश्यक आहे की, बुद्धीची देणगी किंवा तिला लागणारी वाचन, चिंतन, मनन, श्रवण - यांची जोड याबाबतींत व्यक्ती-व्यक्तींत खूप फरक असू शकतात. अनेकदा जे निर्णय इतरांना कर्तव्य म्हणून चटकन लक्षात येतात किंवा घेणं अवघड वाटत नाही, तेच निर्णय काहींचा घेताना गोंधळ होतो, त्यांच्या द्दष्टीनं ते पाऊलवाटेचे ठरतात. याबाबतीत असा सार्वत्रिक नियम ठरवणं अवघड आहे. कुणाला भावनेची बैठकसुद्धा जास्त असते. त्यावेळी त्याला श्रद्धेचा मार्ग अधिक सोपा किंबहुना त्या अर्थानं कर्तव्याचा मार्ग वाटतो. म्हणजे विचारून करणं, हेच अधिक योग्य आहे, असाच निर्णय तो ठामपणानं घेऊ शकतो. पाळू शकतो. अशा व्यक्तींच्या बाबतीत मात्र हा निर्णय अधिक

मोकळेपणानं वापरला जाणं, हे इतरांना योग्य-अयोग्य वाटलं तरी, थोडा सहानुभूतीनं किंवा तटस्थतेनं विचार केला - तर ते योग्य ठरतं.

● **बिनखर्चाचा पण अनमोल मार्गः** व्यक्तिगत पातळीवर निर्णय घेताना आहे त्या बुद्धीनं आणि विचारशक्तीनं निर्णय घेणं शक्य झालं तर, निर्णय घेण्यात फारशी आर्थिक बाजू नसते. पण कर्तव्याचे जास्तीत जास्त अचूक निर्णय घेण्यासाठी एकतर स्वतःला त्या त्या विषयातले निर्णय घेण्यासाठी लागणारी माहिती व निर्णयशक्ती मिळवण्यासाठी मात्र आजच्या काळात वेगवेगळे कोर्सेस करावे लागतात. त्यासाठी अर्थातच खर्च पडतो. काही बाबतीत तर अलीकडं व्यावसायिक तज्ज्ञ, जाणकार, काउन्सेलर्स - अशा व्यक्तींकडं निर्णयासाठी जाणं यात कितीतरी आर्थिक खर्चाला तोंड द्यावं लागतं. ते सर्वांना शक्य असतं असंही नाही.

शिवाय काही निर्णयांच्या बाबतीत आपल्याला शंका राहिली तर पुन्हा दुसऱ्या-तिसऱ्या जाणकाराकडे जाणं हे आणखीच खर्चिक ठरतं. या पार्श्वभूमीवर या मार्गानं मिळणाऱ्या कर्तव्याचा निर्णय मात्र कितीतरी सुलभ, बिनखर्चाचा आणि सामान्य माणसालासुद्धा परवडण्यासारखा आहे. आपण पाहिल्याप्रमाणं एखादं निवेदन लिहिणं, काही चर्चा करून पर्याय काढणं-लिहिणं, एखादी माळ करणं, प्रार्थना करणं, चिठ्ठी उचलणं - हे या इतर व्यावहारिक प्रक्रियांचा विचार करता, अक्षरशः बिनखर्चाचं आहे. सोपं आहे. स्वतःला कळणारं आहे.

अशा निर्णय घेण्याच्या प्रक्रियांना एकदा व्यावसायिकता आली की, तो मार्ग हळूहळू अधिकअधिक खर्चिक होत जातो. शिवाय आपली फसगत होते आहे की काय, अशी शंकाही वाढत जाते. याला अध्यात्म,

वैद्यक, शिक्षणक्रमाच्या निवडी, परदेशगमन, मनोरंजन यात्रा - अशा कुठल्या क्षेत्राचा अपवाद नाही. अत्यंत महत्त्वाचं आणि त्यामुळं खर्चाचं असं लाखो रुपये आणि प्रकृतीची संभाव्य सुधारणा-हानी - अशा गोष्टींशी निगडित असलेल्या ऑपरेशनच्या बाबतीत आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचे सल्ले घेण्यासाठी, प्रत्येक ठिकाणी तपासण्या-अहवाल-कागदपत्रं-चर्चा-खेपा इत्यादी अनेक प्रक्रियांत निर्णय घेतानाच खर्च येतो. सामान्य माणसाला तोसुद्धा झेपणं कठीण असतं. त्याहीपुढं प्रत्यक्ष एखाद्या ऑपरेशनचा होणारा खर्च हा मोठा आर्थिक भार टाकणारा वेळी माणसांना पुढच्या पुढच्या प्रक्रियेत अडकवीत जाणारा, खर्चाचा, अनेकदा कर्जबाजारी करणाराही ठरतो. ती शस्त्रक्रिया यशस्वी झाली तर ठीक अन्यथा होणाऱ्या नुकसानीची कल्पनाच केलेली बरी. अर्थात यात केवळ हे वैद्यकच नव्हे तर, इतर क्षेत्रातही मिळणाऱ्या निर्णयात कुणाला दोषही देता येत नाही. पण सामान्य माणसाला पडणाऱ्या आर्थिक भाराचा विचार केला तर, असा एखादा निर्णय पाऊलवाटेच्या प्रक्रियेनं कुठलाही खर्च न करता श्रद्धेमुळं चटकन घेता येतो आणि माणसाला मनःस्वास्थ्यही देतो.

● **वेळेची बचत :** माणसाला आयुष्यात सर्वांत मोलाची गोष्ट काय असेल तर ती त्याच्या वाट्याला उपलब्ध असलेला वेळ - आयुष्य ही होय. त्यानं त्याचं आयुष्य योग्य कर्तव्य करण्यात घालवलं तर, याच मोलाच्या वेळेचा उत्तम फायदा घेऊन तो स्वतःचं कल्याण, कुटुंबियांच्या बाबतीतलं आपलं कर्तव्य आणि त्याचबरोबर समाजाचं हित साधू शकतो.

यादृष्टीनं आपण विचार केला तर, कर्तव्याचे निर्णय नुसतेच बरोबर असून चालणार नाहीत तर, ते जलदही असण्याची गरज आहे. कारण आपण

अनेकदा पाहिलं असेल की, काही माणसं निर्णय बरोबर घेतात पण तो घ्यायला इतका वेळ, वर्षं घेतात की, ती वर्षं तर वाया जातातच पण त्या निर्णयांची अंमलबजावणी आणि त्यापासून होणारे लाभ मिळायला त्यांना राहणारा कालावधी कमी होत असतो.

या बाबतीत पाऊलवाटेनं होणारे कर्तव्याचे निर्णय अक्षरशः काही मिनिटांत किंवा काही तासांत होऊन जातात. त्यामुळं अनिश्चिततेत आणि नुसताच वेगवेगळ्या बाजूंनी विचार करण्यात जाणारा कालावधी वाचतो. निर्णयांची अंमलबजावणी लगेच सुरू करता येते. स्वाभाविकपणे निर्णय अमलात आणायला आवश्यक वेळ मिळतो. इतकंच नाही तर, आपली कर्तव्यं लवकर पुरी होतात आणि अधिक महत्त्वाच्या इतर कर्तव्यांकडं आपण लवकर वळू शकतो. यादृष्टीनं या मार्गात होणारी वेळेची बचत ही किती विलक्षण आहे, हे अनुभवानंच कळू शकेल.

एक-दोन उदाहरणांनी हा मुद्दा अधिकच स्पष्ट होईल. प्रथम एक प्रापंचिक उदाहरण पाहू. एखाद्या सज्ञान, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तीला त्याच्या विवाहाचा निर्णय घ्यायचा आहे. इतरांचा, जगाचा, आपल्या संस्कारांचा - असे असंख्य विचार करीत बसलं तर, हा निर्णय व्हायलाच मुळात काही वर्षं जातील. त्यातही कुणाशी करावं, याचा निर्णय व्हायलाही याच पद्धतीनं कितीतरी काळ जातो. सामाजिक रूढी, संस्कार - यांमुळं प्रत्यक्ष तो अमलात आणायची पद्धत ठरवायला, त्यात होणारे मतभेद मिटवायला आणखीनच काळ लागतो. एकूण ही सारी प्रक्रिया, आपण पाहिली असेल तर, चोवीस-पंचवीशीला सुरू होऊन वयाची तीस-तीस वर्षं झाली तरी सुरू असते. त्याच्यापुढं कधीतरी संसार सुरू होतात. आता या प्रक्रियेत मुळातच वेळ गेल्यामुळं स्वतःला अधिक आर्थिक सामर्थ्य वाढतं, मिळणाऱ्या साथीदाराचंही कदाचित आर्थिक सामर्थ्य वाढलेलं असू शकतं.

पण या सामर्थ्यांचा उपयोग होण्याऐवजी अनेकदा उपद्रवच निर्माण होतो. कारण पैसा माणसाच्या साध्या-सरळ-नम्र-तडजोडीच्या-समजुतीच्या - अशा अनेक गुणांना निकामी करीत जात असतो. पुढं मिळणारे जोडीदार हे आर्थिकदृष्ट्या कदाचित अधिक समृद्ध असतील पण त्याचबरोबर ते सहजीवनाला लागणाऱ्या वृत्तीचे उरत नाहीत. त्यामुळं होणारं नुकसान हा एक भाग. या निर्णयात होणाऱ्या काळाच्या अपव्ययामुळं मुलाबाळांच्या भविष्यातल्या येणाऱ्या जबाबदाऱ्यांच्या वेळेला आपापल्या शारीरिक, मानसिक क्षमता कमीकमी होत जात असतात. त्यामुळं होणारे त्रास आज दिसत नसले तरी, भविष्यात समोर येतात आणि त्यावेळी आपण पूर्वी घालवलेल्या वेळेची चूक भरून काढण्याची संधी उरलेली नसते. यादृष्टीनं हाच प्रापंचिक निर्णय हा विवाह कधी, कुणाशी, कशा पद्धतीनं करावा - हे जर पाऊलवाटेनं ठरवता आलं तर, स्वाभाविकपणे निर्णयात जाणारा हा अकारण वेळ, त्रास वाचतो.

पारमार्थिकदृष्ट्या एखादं साधन करणं, कुणाचा अनुग्रह घेणं, कुठल्या स्थानावर श्रद्धा ठेवणं - याही बाबतींत वेळेची बचत तितकीच किंबहुना जास्त मोलाची असते. या साऱ्या बाबतींत स्वतः मानवी बुद्धीनं, इतरांच्या मतांनुसार विचार करीत वर्षंच काय अनेकांची आयुष्यही जातात आणि निवृत्तीची वेळ येते तेव्हा कुठं तरी नाइलाजानं हे निर्णय घ्यावे लागतात. त्यावेळी ही सारी साधनं करणं किंवा श्रद्धा ठेवणं यांची कितपत क्षमता उरलेली असते, याचा विचार केलेला बरा. म्हणून अशा बाबतीतही उमेदीनं काही करण्याच्या वयातच पाऊलवाटेनं हे निर्णय झाले तर, ते अमलात आणायला लागणारी शारीरिक वेळी आर्थिक क्षमता - यांची मदत मिळून वाटचाल लवकर होते. अर्थात उत्तरायुष्यही त्यामुळं स्वास्थ्याचं जातं.

या मार्गानं होणाऱ्या वेळेच्या बचतीला एक आणखी वेगळं परिमाण

आहे. आपल्याला एखादा निर्णय स्वतःला घेता येत नसला तर, व्यवहाराच्या मार्गानं कुणा ज्येष्ठ व्यक्तीकडं जाऊन, त्याच्याशी चर्चा करून, सल्ला घेऊन आपण तो निर्णय घेतो. कदाचित आपण पारमार्थिक असू तर, अशा एखाद्या व्यक्तीऐवजी आपल्या देहधारी गुरूंकडं आपण जाऊ. सारी परिस्थिती त्यांना सांगून, आपली निर्णयातली द्विधा मनःस्थिती सांगू आणि त्यांच्याकडून निर्णय घेऊ.

पण एक लक्षात येईल की, या दोन्ही मार्गांमध्ये आपल्याबरोबरच त्यांचाही अमूल्य वेळ जात असतो. तो वाचवणं या चिठ्ठीच्या मार्गानं शक्य असतं. म्हणून पाऊलवाट वापरली तर, नुसतीच आपल्या वेळेची बचत होते असं नसून, अशा ज्येष्ठ किंवा गुरुस्वरूप व्यक्तींचा मोलाचा वेळ व शक्ती यांचीही बचत साधत असते.

एकूण या मार्गानं होणारी वेळेची बचत हा मोठा विचार करण्यासारखा लाभ आहे, हे नक्की.

● **प्रक्रियेचा तात्त्विक आधार :** अनेकदा असं आढळून येईल की, अशा स्वरूपाचे पारमार्थिक वाटणारे मार्ग हे अनुभवावर आधारलेले असतात. पण त्याची प्रक्रिया अशी मांडता येत नाही आणि मांडलीच तर, तिला फारसा तात्त्विक व तर्कशुद्ध आधार देणं अवघड जातं. पण या पाऊलवाटेच्या बाबतीत मात्र तिला तात्त्विक बाजू आहे, तर्कशुद्धता आहे आणि तिचा आधार स्पष्ट करता येतो.

तो असा की, तात्त्विक दृष्ट्या मनुष्याचा निर्णय घेणारा 'मी' हा प्रभावित, संस्कारांनी मर्यादित, अनुभवांनी बद्ध, धर्म-भाषा-देश - अशा वेगवेगळ्या प्रभाव टाकणाऱ्या भेदांनी परस्वाधीन, अज्ञानानं युक्त, अज्ञानाची

जाणीव नसल्यानं अकारण ठाम - असा असतो. अनेकांच्या आयुष्यात तर इतक्या गोष्टींनी आपण बद्ध आणि परतंत्र आहोत, याची कल्पनासुद्धा आयुष्यभरात येत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

पाऊलवाटेच्या मार्गानं मात्र,असा निर्णय घेणारा मर्यादित 'मी' या प्रक्रियेनं बाजूला ठेवता येतो. येणारा निर्णय हा अशा मर्यादित 'मी'नं घेणं टाळता येतं. त्यामुळं होणारं नुकसानही अर्थातच आपोआप टळतं. निर्णय मर्यादित 'मी'नं घेतलेला नसतो तर, त्यानं फक्त पर्याय काढून त्यातही अन्य पर्यायांची सोय करून, तो निर्णय घेतला जात नाही, येतो. त्यामुळं 'मी'नं येणाऱ्या अहंकाराच्या किंवा त्रुटीच्या मर्यादा त्याला नसतात. येणारा निर्णय तात्त्विकदृष्ट्या तटस्थतेनं किंवा साक्षित्वानं येणारा असल्यामुळं तो अधिक अचूक आणि हिताचाही ठरण्याची शक्यता नेहमीच जास्त आहे. म्हणून तात्त्विकदृष्ट्यासुद्धा ही पाऊलवाट योग्य व हिताची ठरते.

● **मानसशास्त्रीय बाजू व लाभ :** कर्तव्यात अनिश्चित होणं, ही अनेकांना आयुष्यभर वाट्याला येणारी गोष्ट आहे. मानसशास्त्रीयदृष्ट्या द्विधा किंवा आधी म्हटल्याप्रमाणं भ्रमित, आंदोलित, मर्यादाबद्ध व तणावाच्या अवस्थेत घेतलेले निर्णय हे बहुधा एकांगी ठरतात. ते भावनिक असतात आणि त्यामुळं ते चुकण्याची तसंच स्वतःला आणि इतरांनाही नुकसानीचे ठरण्याची शक्यता जास्त असते. त्यातही अनेक माणसं मानसशास्त्रीयदृष्ट्या मुळातच निर्धार आणि विवेकाला कमी पडतात. त्यामुळं ते मनानं द्विधा किंवा कुठल्या प्रभावाखाली वावरतात, निर्णय घेतात.

शिवाय अनिश्चित, अनिर्णित अवस्थेत होणारी मनाची आंदोलनं, ऱ्हास -यांतून होणाऱ्या हानींवर कोणते बाह्य उपचार करणं कठीण असतं,

त्याचबरोबर वेळखाऊही असतं. कुठल्याही कारणानं ते शक्य नसलं तर, अशा द्विधा मनानं घेतलेले निर्णय भावनिक ठरून नुकसानीचे होतात. ही पाऊलवाट माहीत असल्यास आणि त्या वाटेनं चालल्यास मात्र मनुष्य कर्तव्याच्या अनिश्चिततेच्या मानसिक आंदोलन व तणावातून पटकन बाहेर येतो. मनाला निश्चितता येते आणि तो कर्तव्याची वाटचाल करू लागतो. अर्थातच ही प्रक्रिया मानसशास्त्रीय असून त्यादृष्टीनंसुद्धा उपयोगी ठरते.

● **व्यक्तित्वविकास :** व्यक्तिमत्त्वाचा विकास ही एक व्यापक गोष्ट आहे. तिचं एक अंग हे आपापली कर्तव्यं ओळखता येणं आणि ती वेळेला करू शकण्याची शक्ती असणं, हे आहे. पाऊलवाटेचा आणि या व्यक्तित्व विकासाचाही एक वेगळा संबंध आहे. त्या विकासाला ही पाऊलवाट अधिक व्यवस्थित आणि काही निश्चित स्वरूपाचा काळ चालल्यावर मदत करू लागते, हे आपल्या लक्षात येईल.

उदाहरणार्थ : विद्यार्थ्यासमोर अभ्यास, व्यायाम, खेळ, मनोरंजन इत्यादी अनेक कर्तव्यांचे पर्याय असतात. स्वतःची कुवत, क्षमता, गरजा - यांचं नीट आकलन होत नसेल तर, या कर्तव्यांच्या बाबतीत, त्यांना द्यायच्या प्राधान्यक्रमाच्या बाबतीत व्यक्ती द्विधा असू शकते. त्यावेळी या पाऊलवाटेनं नियमानं काही काळ गेल्यावर, असं लक्षात येतं की, येणारे निर्णय हे आपल्याला - या बाबतीत निर्णय कसे घ्यावेत किंवा प्राधान्यक्रम कसा असावा - याचं एक सलग प्रशिक्षण देत असतात.समजा अभ्यास मागं पडत असेल आणि तो आपल्या लक्षात येत नसेल तर, सातत्यानं अभ्यासाला प्राधान्य देणारा निर्णय येत जातो.अभ्यास,व्यायाम, खेळ यांचं संतुलन साधणारे निर्णयही क्रमाक्रमानं येत जातात.हे टप्पे पार पडल्यावर असं कळून येतं की,

या विद्यार्थिदशेमध्ये अभ्यास हे प्रमुख कर्तव्य असलं तरी, योग्य, आवश्यक तेवढा अभ्यास झाल्यावर किंवा व्यायाम चुकल्यानं तब्येतीचं नुकसान होत असल्यास, अभ्यासाच्या बाबतीत आपण अकारण ताण - भीती बाळगत असल्यास - अभ्यास हे प्रमुख कर्तव्य असूनसुद्धा प्राधान्यक्रम त्या त्या वेळी व्यायाम, खेळ, अभ्यास यांबाबतीत वेगवेगळे येतात. आपण ते पाळल्यावर त्याची उपयुक्तता लक्षात येते.

जर आपण तेवढे चाणाक्ष असू, तत्परता दाखवत असू, या आलेल्या निर्णयांचा सलगपणे अभ्यास करीत असू तर आपल्या हे लक्षात येतं की, कोणत्याही परिस्थितीत बदलणाऱ्या गरजांप्रमाणं आपली कर्तव्यं कशी ठरवावीत, प्राधान्यं कशी बदलावीत - अर्थात स्वतःच्या मनावर नियंत्रण मिळवून व्यक्तिमत्त्व म्हणून कसं विकसित व्हावं, याचं एक ईश्वरी प्रशिक्षण चालू आहे. ते प्रशिक्षण आपल्याला निर्णयक्षम बनवीत असतंच पण त्याचबरोबर विकासाला आवश्यक असणारा व्यक्तित्वातला एक संतुलितपणाही आणून देतं, जो आपल्याला पुढं आयुष्यभर उपयोगी पडणार असतो. म्हणून थोडा निर्णयांचा असा ऐतिहासिक अभ्यास करणाऱ्यांना आपापल्या आयुष्यांपुरतं व्यक्तिमत्त्व विकसित, संतुलित करण्याकडं या मार्गाचा उपयोग होऊ शकतो. परिणाम असा होतो की, पुढं निर्णयांच्या बाबतीत आपल्याला पाऊलवाटेचा वापर करण्याची वेळ कमी येऊ लागते. निर्णय मात्र अर्थातच सहजतेनं बरोबर घडू लागतात.

● **व्यक्तित्वाचा अधिक उच्च विकास :** आपण आत्ताच पाहिल्याप्रमाणं - आपापले प्रपंच, कौटुंबिक-सामाजिक कर्तव्यं करण्यासाठी लागणारे निर्णय घेण्याची विकसित

व संतुलित अवस्था निर्माण होणं, या अर्थानं या पाऊलवाटेचा अभ्यास करून पुढं जाता येतंच. त्याचबरोबर ज्यांना या मार्गाचा अधिक लाभ घ्यायचा आहे, त्यांना तीही तरतूद या मार्गात आहे.

ती अशी की, वर सांगितल्याप्रमाणं निर्णय घेता येणं, ही त्याअर्थानं दुर्मीळ असली तरी, प्राथमिक अवस्था आहे. अधिक सखोल-व्यापक व्यक्तिमत्त्वाची दोन मोठी लक्षणं आहेत. पहिलं, कर्मांच्या फळाच्या बाबतीत निरपेक्ष, तटस्थ राहू शकणं. दुसरं, जीवनात जी नैसर्गिक आणि ईश्वरी सहजता आहे, तिच्याशी आपल्या जीवनाचा सुसंवाद साधता येणं, म्हणजेच आपलं जीवनही नैसर्गिक, प्रवाही आणि त्यामुळं साफल्याचं घडवणं.

आता उदाहरणानं बघू. पहिल्या बाबतीत पाऊलवाटेनं निर्णय घेत गेल्यास, काही वेळा असं होतं की, उदा. विशेषतः युवकांच्या टप्प्यात एका बाजूनं शिक्षण संपत आलेलं असतं, नोकरी शोधण्याची गरज असते. ती गोष्ट आपल्या हाती नसते. म्हणून त्याचबरोबर एका बाजूनं अधिक शिक्षण सुरू ठेवणं आणि दुसऱ्या बाजूनं हे नोकरी-व्यवसाय - यांचे प्रयत्न सुरू ठेवणं - या दोनही गोष्टी करायच्या असतात. यावेळी सामान्य माणूस अनेकदा कुठल्यातरी एका बाजूला झुकलेला असतो. काही युवक अधिकअधिक शिक्षण घेतलं तरच नोकरी मिळेल, या विचारानं नोकरीच्या प्रयत्नांकडं दुर्लक्ष करतात तर, काही शिक्षण सोडून देऊन केवळ नोकरीच्याच मागं लागतात. हेच निर्णय पाऊलवाटेला विचारले तर, त्यात अनेकदा दोनही गोष्टींचा समन्वय घालण्याची दिशा मिळते. शिक्षणातली परीक्षा किंवा नोकरीतली परीक्षा यांच्या तारखा जवळपास असतील तरी, त्याचा कुठला ताण डोक्यात न घेता, त्यांच्या त्यांच्या क्रमानं त्या देण्याचा निर्णय मिळालेला दिसतो. त्यातून एका बाजूनं परीक्षेचा सराव चालू ठेवणं ही पुढच्या आयुष्याच्या दृष्टीनं गरजेची सहज गोष्ट असते. पण आपलेच काही पूर्वग्रह आड येऊन,

अशी सहजता जाण्याची जी शक्यता असते ती, ते निर्णय नाकारून पाऊलवाट आपल्याला मार्ग देत राहाते.

नोकरीच्या परीक्षांचा अभ्यास केला तर, या पुढच्या परीक्षांकडं दुर्लक्ष होईल, ते उच्चशिक्षण झाल्यावर आपल्याला अधिक चांगली नोकरी लागेल, कमी पगारावर - खालच्या पोस्टवर काम करावं लागणार नाही - अशा आपल्या अनेक कल्पना असतात. त्या आपल्या जगण्यातली सहजता घालवून अकारणच आपलं जीवन तणावाचं करतात, अनेकांच्या बाबतीत तर ते जीवन कुंठित करतात. पुढं कदाचित उच्च परीक्षा होतेही. पण खूप प्रयत्नांनंतरही पुन्हा आधी मिळू शकणाऱ्या तथाकथित खालच्या पोस्टवरच काम करावं लागतं. दरम्यान तेव्हाच या सहजतेच्या मार्गानं गेलेले युवक पुढं निघून गेलेले असतात. त्याचबरोबर आपल्या आयुष्यातली महत्त्वाची वर्षंही अकारणच वाया गेलेली असतात. हे या थोड्या साध्या उदाहरणाकडं पाहिलं तर, कदाचित फार वाटणार नाही. पण पुढच्या आयुष्यातल्या अधिकअधिक महत्त्वाच्या ठरत जाणाऱ्या निर्णयांबद्दलही घडताना दिसेल. तेव्हा याचं महत्त्व खरं वाटू लागेल. अन्यथा मोठेपणी मोठ्यांसारखं, वृद्धपणी वृद्धांसारखं राहाता-वागता न येता, व्यक्तिमत्त्वं अविकसित व बालिश का राहतात, याची उत्तरं आपल्याला या सहजतेच्या अभ्यासानंतर कळतील. आपण जितकं लवकर हे कळेल तितका या मार्गाचा लवकर वयात अभ्यास करून ही निसर्गाला अपेक्षित असलेली सहजता आपण साधू शकू.

पुढचा मुद्दा फळाची निरपेक्षता आणि कुठल्याही फळाच्या बाबतीत आनंदी राहाण्याची क्षमता. हा व्यक्तित्वाचा अधिक सखोल-म्हणजे पारमार्थिक विकासच आहे. तो विकासही ही पाऊलवाट घडवताना दिसते. उदाहरणार्थः वर पाहिल्याप्रमाणं हे परीक्षेचे निर्णय मनानं घेतले तर, परीक्षेतल्या वारंवार आलेल्या अपयशानंतर मनःस्थिती टिकवणं अवघडच नव्हे अशक्यच असतं.

पुन्हा त्या परीक्षेला सामोरं जाणं तर अनेकदा नकोच वाटतं. हेच निर्णय पाऊलवाटेनं घेतले तर, परीक्षेला बसण्याचा निर्णय तर मिळतो, नापास झालं तरी, परत परत त्याच परीक्षेला बसावं, असंच उत्तर येतं. त्या ठिकाणी आपला या मार्गावरचा विश्वास अढळ ठेवला तर, हळूहळू पास होण्याचं फळ यावं, ही एक मूलभूत अपेक्षाच नष्ट होते. तितक्याच उत्साहानं पुन्हा आपण तशा परीक्षांना बसू शकतो. पुढं असं आढळून येतं की, आपली फळाची अपेक्षा एकदा मनातून काढून टाकली की, त्या प्रयत्नाच्या वेळी दिलेल्या परीक्षेला यश मिळून जातं. पण आता ते शांतपणे स्वीकारलं जातं. पहिल्याच वेळी यश येण्यानं निर्माण होणारा कर्तृत्वाचा अहंकार तर मोडून काढला जातोच पण व्यक्तित्वाचा खरा विकास घडवणारा, फळाची अपेक्षा न ठेवणारा एक व्यक्तित्वाचा विकसित घटक आपल्यामध्ये निर्माण होऊन पक्का होतो. आयुष्यभर ही विद्या आपल्याला अगणित गोष्टींत उपयोगी पडते. असं सखोल, व्यापक, विकसित व्यक्तिमत्त्वच शेवटी ईश्वराच्या इच्छेत आनंदानं विलीन होऊ शकतं.

या मुद्याचा सारांशानं विचार केला तर, असं लक्षात येईल की, वरच्या पद्धतीनं वाटचालीत अभ्यासाची दृष्टी बाळगणाऱ्याचा विकास तर होतोच. पण त्यानं स्वतःची या वाटचालीची नोंदवही पाहिली तर, त्याची त्याच्यापुरती एक कर्तव्यांची निर्णयगीता तयार झाली आहे, हे त्याच्या लक्षात येऊ शकेल.

● **निःसंकोचपणाचा लाभ :** इतर पद्धतीनं जाण्यात अनेकदा-ज्येष्ठांशी, लहानांशी वेगवेगळ्या निर्णयांची चर्चा करताना, काही विषयांच्या बाबतीत संकोचांच्या मर्यादा येऊ शकतात. सर्व

विषय, सर्वांशी एकाच पातळीवर नसतात. तसेच ते तितक्याच निःसंकोचपणे बोलता येण्यासारखेही नसतात. अगदी ज्येष्ठ व्यक्ती किंवा देहधारी गुरूंच्याबरोबर बोलतानासुद्धा या संकोचाच्या काही मर्यादा येऊ शकतात. पाऊलवाटेच्या बाबतीत मात्र आपला संवाद आणि निर्णय हे पूर्ण व्यक्तिगत पातळीवरचे क्वचित लेखी किंवा मनानंसुद्धा शक्य असल्यानं त्यात विषयांच्या किंवा चर्चेच्या बाबतीतला - निवेदनाच्या बाबतीतला संकोच बाळगण्याचं कारण उरत नाही आणि कुठल्याही विषयातल्या कर्तव्याबद्दल आपल्याला निःसंकोचपणे विचारता येतं, निर्णयही मिळतो.

● **स्वास्थ्याचा मार्गः** इथंच हेही लक्षात घेतलेलं बरं की, विविध प्रकारचे निर्णयप्रक्रियेतले वर उल्लेखलेले सल्ले, त्यासाठीचे खर्च करूनही जेव्हा ते निर्णय चुकीचे ठरतात किंवा त्यापोटी आपल्याला झालेला खर्च निष्फळ होतो तरीही ते आपण व्यवहार म्हणून, मानवी मर्यादा म्हणून स्वीकारतोच. एखाद्या ऑपरेशनच्या बाबतीत कौशल्यातली कुठली उणीव न ठेवणं हे एकवेळ जाणकार माणसाच्या हातात असेल. त्यानुसार त्याला सामोरं जाऊन आपण तेवढा खर्च करूही. पण त्या शस्त्रक्रियेनंतर आजार दूर होणं किंवा ती शस्त्रक्रिया यशस्वी ठरणं-न ठरणं - याची खात्री मिळणं, हे मानवी व्यवहारात अवघड आहे आणि ते मान्य करण्यासारखं आहे. पण पाऊलवाटेनं येणाऱ्या निर्णयाच्या बाबतीत जर शस्त्रक्रिया करू नये, असं आलं तर, आपल्याला होणारा खर्च तर टळतोच पण, जरी करावी म्हणून आलं आणि खर्च झाला तरीही, हा न होणारा खर्च किंवा करावा लागणारा खर्च - यातून निर्माण होणारी परिस्थिती - यात ते सारं आपल्या अंतिमतः कल्याणाचं आहे आणि मुळात आपण हे ईश्वरी निर्णयाप्रमाणं करतो आहोत, यामुळं आपल्याला

शांत राहाणं शक्य होतं. अन्यथा एरवीच्या बाबतीत एवढं सगळं करून शेवटी आम्हाला त्रास सहन करावा लागतोच आहे, असे सारखे विचार येऊन अस्वास्थ्य येतं.

याउलट या मार्गात यश येवो, अपयश येवो- कल्याणाची खात्री कायम राहाते.जी कुठल्याही मानवी निर्णयातून आपल्याला मिळू शकत नाही.त्याचा दोष अर्थातच कुठले तज्ज्ञ,व्यावसायिक क्षेत्रं यांना नसून,मानवी बुद्धीची मर्यादा हाच आहे. पण मात्र पाऊलवाटेच्या प्रक्रियेतल्या मूळ,आधारभूत श्रद्धेमुळं,आपल्याला निर्णयाच्या अंमलबजावणीनंतर मनःस्वास्थ्य टिकतं आणि त्या मनःस्वास्थ्याचं मोल अक्षरशः न करता येण्यासारखं आहे.त्यादृष्टीनं ही पाऊलवाट कर्तव्याबरोबरच स्वास्थ्याची पाऊलवाटही ठरते.

● **पारमार्थिक आधार :** या कर्तव्याच्या पाऊलवाटेला व्यावहारिक आधार कोणते आहेत, ते आपण पाहिलंच, पण त्या मार्गाला अत्यंत महत्त्वाचा असलेला पारमार्थिक आधारही आहे.

परमार्थातले गीतेसारखे जे जीवनग्रंथ आहेत त्यांतसुद्धा आपलं कर्तव्य म्हणजे - एखादी गोष्ट करणं किंवा न करणं - हे काय आहे, हे ठरवणं अत्यंत जाणकार, प्रतिभावंत अशा महनीय व्यक्तींनासुद्धा जाणवणारं कोडं आहे, असं म्हटलेलं आहे. त्यामुळं एखादी गोष्ट करण्याचा किंवा न करण्याचा निखालस निकाल एखाद्या कुठल्या सुटसुटीत मार्गानं दोन शब्दांत होण्याची अपेक्षा करणं, हे तसं अवास्तवच आहे.

पण आपापल्या बुद्धीची मर्यादा जाणवल्यानंतर बुद्धिमंतांनी काय किंवा सामान्य माणसांनी काय, विश्वात्मक शक्तीची मदत घेऊन या वाटेनं

कर्तव्याची वाटचाल करणं हे कुणालाही पटणारं, आटोक्यातलं व सुलभ आहे. सारा परमार्थ ज्या श्रद्धेवर आणि बौद्धिक, मानसिक शरणागतीवर उभा आहे - त्या श्रद्धेच्या आणि शरणागतीच्या पायावरच हा पाऊलवाटेचा सश्रद्ध मार्ग उभा आहे. त्यामुळं, त्या अर्थानं, तो पारमार्थिकदृष्ट्याही सुसंगत आहे. श्रद्धा आणि शरणागती, हे भोळेपणा किंवा दुर्बलता नसून, आपापल्या कुवतींचं वस्तुनिष्ठ आकलन आणि त्यावरचे मार्ग आहेत, हे इथं स्पष्ट करणं मला आवश्यक वाटतं.

खरा परमार्थ हा, प्रपंच टाकीत नाही, उलट तो त्यातली आसक्ती, मोह, भ्रम टाकून, तो अधिक नेमकेपणानं कसा करता येईल, ते पाहातो आणि व्यक्तीला प्रपंचकर्तव्य निश्चितपणे समोर आणून ती पुरी करून घेतो. फक्त सामान्य प्रापंचिक माणसांसारखं, त्याला तिथंच थांबू न देता, त्याच्या मनुष्यजन्माचं सार्थक करण्याच्या कर्तव्याचाही बोध करून देतो. त्या कर्तव्यासाठी लागणारी समजूत, साधनं, मार्गदर्शक - अशी मदत करतो. ज्यामुळं खरा पारमार्थिक मनुष्य हा, समाजाचं स्वास्थ्य आणि कल्याण यांना पूरक असणारा पण अनेकदा अज्ञात राहणारा, एक उत्तम व शांत घटक ठरतो.

व्यक्तिगत काय, कौटुंबिक काय किंवा सामाजिक काय - अस्वास्थ्याला कारणीभूत होतात ते - अहंकार, स्वार्थ, आसक्ती, मोह, भ्रम - यांसारखे व्यक्तींमधले घटक. ते घटक त्याला त्याच्या खऱ्या कर्तव्यांच्या निर्णयांपासून विचलित करतात. तात्पुरती सुखं, चैनी, मान - धन अशा गोष्टी देतातही, पण अंती अस्वास्थ्य देतात. त्यामुळं होणारं नुकसान शेवटी प्रापंचिकही असतं आणि पारमार्थिकही असतं, व्यक्तिगत असतं आणि सामाजिकही असतं. त्यासाठी मानवी मन आणि बुद्धी कर्तव्यांचे निर्णय करायला पूर्ण शुद्ध आणि मुक्त असणं हा खरा राजमार्ग आहे. त्यात येऊ

शकणारा अहंकार सोडला तर, तो मार्गही पारमार्थिकच आहे. पण ते किती कठीण आहे, हे जाणत्यांनीच सांगावं.

यासाठीच आपली कर्तव्यं वर उल्लेखलेल्या साऱ्या मानवी दोषांपासून मुक्त ठेवण्यासाठी व्यक्तिनिरपेक्ष श्रद्धा आणि शरणागती - यांच्या आधारानं उभा असणारा हा तर्कशुद्ध मार्ग, बुद्धिमंतांनाही सुलभ आहे आणि सामान्य माणसांच्याही आटोक्यातला आहे. गीतेतसुद्धा बुद्धीनं, भावनेनं, संस्कारांनी उद्‌भवणारे कित्येक प्रश्न आणि त्यांची उत्तरं यांची मोठी विलक्षण यादी आहे. तशी ती इतर ग्रंथ-धर्म-पंथ यांतही आहे - असेल. पण आपण याकडं जरूर लक्ष द्यावं की, त्या प्रश्नोत्तरांचा शेवट भगवंतावरची श्रद्धा आणि तो सांगेल ते करण्याची तयारी, यांतच झाला आहे.

या मार्गात अर्जुन किंवा कृष्णपरमात्मा किंवा तत्सम व्यक्ती व्हायला लागणारी योग्यता नसतानासुद्धा, केवळ श्रद्धेनं आपल्या कर्तव्यांचे निर्णय कुणालाही मिळू शकणं इतकं सोपं होणं म्हणजे, कुणाही सामान्य-असामान्य माणसाच्या हाती 'निर्णयांचा निरपेक्ष चिंतामणी' मिळण्यासारखं आहे.

याचा समारोप करण्यापूर्वी हे मी आत्यंतिक तळमळीनं आणि नम्रतेनं स्पष्ट करतो की, अनेक वर्षांचा वैयक्तिक अभ्यास, वाचन, चिंतन, प्रयोग, अनुभव आणि इतरांचे त्याबाबतीतले प्रयोग, अडचणी, शंका, चर्चा व अनुभव यांच्या आधारावर हा मार्ग इथं स्पष्ट केलेला आहे. त्यामागचा हेतू या एका विषयाची प्राथमिक माहिती देणं, संभाव्य अडथळे, अस्पष्टता दूर करणं, सावधानता स्पष्ट करणं आणि ज्यांना या मार्गानं चालावं वाटेल त्यांना अधिक जागरूकतेनं आणि अचूकतेनं वाटचाल करायला हितबुद्धीनं मदत करणं, एवढाच आहे. म्हणूनच या पुस्तकाच्या सुधारित व परिवर्धित आवृत्तीत, आधारासाठी परिशिष्टात स्वतः या मार्गानं केलेल्या वाटचालीचे अत्यंत निवडक अनुभव दिले आहेत.

खरंतर कर्तव्याच्या निर्णयाच्या बाबतीत विवेक-विचारांचे राजमार्ग जरूर असले तरी, आधी चर्चा केल्याप्रमाणं अनेक कारणानं ते जेव्हा चालता येत नाहीत तेव्हा या 'सश्रद्ध पाऊलवाटे'नं का होईना, व्यक्तिगत आणि सामाजिक कर्तव्यांच्या आणि हिताच्या आचरणाच्या ध्येयापर्यंत पोचणंच जरूर आणि महत्त्वाचं आहे, हे कुणालाही पटू शकेल.

ते करण्यासाठी थोड्या प्रमाणात जरी, या पुस्तकाच्या प्रयत्नाची मदत झाली तरी, अशा विचारी, प्रयोगशील व कर्तव्यशील व्यक्तींची आणि पर्यायानं त्यारूपानं विश्वात्मक ईश्वराची ती मी भाग्याची सेवा मानतो.

श्री संतचरणार्पणमस्तु ।
श्री लोकचरणार्पणमस्तु ।
ॐ तत् सत् ।।

* परिशिष्ट *

● मोजके स्वानुभव ●

● निवृत्तीपूर्वी :

काहींना कल्पना असेलच की,लवकरात लवकर नोकरीला लागण्यासाठी मी प्रयत्न आणि प्रार्थना करीत होतो. ते रामाच्या कृपेनं शक्यही झालं. असं करण्यामागं माझे फक्त दोन सरळ उद्देश होते. एक -पुढच्या पारमार्थिक प्रवासाला लागणारा तत्त्वज्ञानाचा अभ्यास आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्यासच करता येणार होता म्हणून स्वावलंबन मिळवणं आणि दोन - आपली किमान प्रापंचिक कर्तव्यं पुरी करून लवकरात लवकर नामाला - उपासनेला मोकळं होणं.

१. पण एकदा नोकरीत शिरल्यावर, तिथला अभ्यास, अनुभव, पुढील प्रगती - यांसाठी अधिकारी पदाची परीक्षा देणं, मला स्वाभाविक वाटलं. अनेकांना ते गृहीतही होतं. त्यातला जो मेरिट चॅनेलनं लवकर जाण्याचा मार्ग होता, त्या मार्गानं जाण्यासाठी लागणारी त्या क्षेत्रातली शैक्षणिक पात्रताही तोवर माझ्याकडे जमा झाली होती. त्यामुळं नकळत आपण त्याला पात्र आहोत आणि परीक्षेला बसावं, असं माझ्या मनात येऊ लागलं. त्यावेळी महाराजांना चिठ्ठीनं विचारता -परीक्षेला बसावं- असं उत्तर आलं. मला शक्य वाटला, आवश्यक वाटला, तो अभ्यासही केला. परीक्षा दिली. विशेषतः इतरांनाही अपेक्षित असलेलं यश मला आलं नाही. मी त्यात नापास झालो. या परीक्षेच्या त्यावेळी पाच संधी होत्या. उरलेल्या चारही संधींच्या वेळेला विचारता - बसावं - असं उत्तर येई. दुसऱ्या, तिसऱ्या वेळेलाही मी नापास झालो. आता मला चिठ्ठीची दिशा लक्षात आली. कारण, दरम्यानच्या काळात इतर ज्या प्रापंचिक गोष्टी, ही परीक्षा पास होऊन दूरवर सक्तीची असलेली

बदली झाल्यास मला करता आल्या नसत्या, त्या सर्व एकेक करून पूर्ण होत होत्या. त्यामुळं चौथ्या, पाचव्या वेळेलासुद्धा उत्तर -होय- आलं. मी अभ्यास केला. पण या आधीच्या अनुभवामुळं माझ्या अभ्यासाला पूर्ण तटस्थता आली, फळाच्या अपेक्षेचा संबंध पूर्ण सुटून गेला. दरम्यान काही पारमार्थिक उपक्रम-अनुभव हेही घडून गेलं आणि या चौथ्या, पाचव्या प्रयत्नांनाही मी अभ्यासाला आवश्यक तो न्याय देऊन, बसून आलो आणि नापास होऊन आनंदात राहिलो. ती वेळ अशी होती की, आता त्यामधल्या पदाचं-त्यापासून होणाऱ्या फायद्याचं-तोट्यांचं-मानाचं इत्यादी कसलीही आकर्षणं मला उरली नव्हती. उलट माझं मूळ ध्येय माझ्या मनात अधिक तीव्र झालं होतं. आपलं मूळ काम करायला आपण लवकर मोकळं होणं आणि त्यासाठी किमान प्रापंचिक कर्तव्य आणि आर्थिक स्थैर्य मिळवणं, एवढाच एकमेव उद्देश परत कायम व ताजा झाला होता. ही पाचवी संधी संपली आणि आधीची तीन वर्षं न आलेली नेहमीच्या चॅनेलची परीक्षा आली. मी पुन्हा चिठ्ठीनं विचारता - बसावं- असं उत्तर आलं. आधीच्या परीक्षांना अनेकदा रजा घेऊनही, जास्तीत जास्त तयारी करण्याची सवय असूनसुद्धा, आता तो मूळ विषयच मनातून गेल्यामुळं, त्याचबरोबर बँकेतला कामाचा व्याप वाढल्यामुळं, कौटुंबिक व पारमार्थिक उपक्रम यांची कितीतरी भर पडल्यामुळं - यावेळी मी कुठली रजा - तयारी करायला वेळ दिला नाही. इतकंच काय तर, ज्या दिवशी त्यातली पहिली लेखी परीक्षा होती, त्याच दिवशी त्या परीक्षेच्या गावी नामदिवस-उपासना होती. त्यामुळं तिथंच मध्ये मी दोन तास परीक्षेला जाऊन आलो. पासही झालो. नंतर तोंडी परीक्षेच्या वेळी आदल्या दिवशी तयारीची अवस्था तशीच होती. त्यातच सोलापूरच्या दिशेला, एका देवळामध्ये, सत्पुरुषांच्या समाधीजवळ निरूपणाचं आमंत्रणही होतं. मी चिठ्ठीनं महाराजांना विचारलं. त्याचं उत्तर - त्याचा तोंडी परीक्षेशी संबंध नाही.

आपण निरूपणाला जावं - असं आलं. मग मी तोंडी परीक्षेला हजर होण्यात वेळेचा, तयारीचा प्रश्न होताच. तेव्हा त्या तोंडी परीक्षेला जावं की नाही, हेही मी विचारलं. तेही -मी जावं- असं आलं. मी तयारीचा विचार सोडून दिला आणि निरूपणाला गेलो. तिकडून अपरात्री परत येऊन, सकाळी तोंडी परीक्षेला वरिष्ठ कार्यालयात परगावी पोचू शकलो. पहिल्या सत्रातले उमेदवार साधारणतः पाच-सात मिनिटांत मुलाखत देऊन बाहेर येत होते. दुसऱ्या सत्रात मी पहिल्या क्रमांकाला आत गेलो, तो अर्धा तास बाहेर आलो नाही. तेव्हा बाहेरही पुढच्या उमेदवारांत चलबिचल झाली. माझी मुलाखत कुठल्या विशिष्ट तयारीविना, शांतपणे आणि त्यांना माझ्याकडल्या वेगवेगळ्या विषयांत अधिक रस वाटायला लागल्यामुळं खरंतर वाढली होती. मीच उलट बाहेर आल्यावर इतर सर्वांना 'तुम्ही निश्चिंतपणे जावा, पॅनेलचा असा काही मोठी मुलाखत घेण्याचा उद्देश नाही', असं सांगून बाहेर पडलो. कारण, महाराज योग्य ते करणार, याची खात्री मला होती.

आपल्याला जर लवकर बाहेर पडायचं आहे तर, आता या फंदात का पडा, असा माझ्या मनात त्यावेळी प्रश्न येत होता. मी ही बढती घेणं आपल्याला अपेक्षित आहे का, असा प्रश्न विचारता, त्याचं उत्तर -होय- असं आलं. त्याचा खुलासा करून घेण्यासाठी, मी जे विविध पर्याय विचारले, त्यांत मला श्रींच्या उद्देशाची कल्पना आली. ती अशी, एक - व्यवस्थापनाचा अनुभव देणं.दोन - बढतीमुळं मिळणाऱ्या वरच्या वेतनश्रेणीचा पेन्शनला उपयोग होऊन लवकर निवृत्त होण्यासाठी अधिक मदत होणं, हे होते. हे स्पष्ट झाल्यावर,माझ्या चित्ताला निवृत्त होईपर्यंत,या विषयाचा पुन्हा विचार करण्याची गरज वाटली नाही आणि त्यामुळं शांत चित्तानं, येईल त्या कामाला, बदल्यांना मला सामोरं जाता आलं. त्यांना आपल्या आयुष्याचे पुढचे टप्पे कसे दिसत असतात आणि त्यासाठी आपल्याला वेळी ठोकून घेऊन, ते कसे

तयार करीत असतात, याची कल्पना या चिठ्ठीच्या मार्गानं मला आली.

२. बढतीनंतर जवळजवळ सहा वर्षं नोकरी झाल्यानंतरही, महाराजांनी आधीच माझ्या लागतानाच्या संकल्पाची मला पूर्ण जाणीव जागृत ठेवल्यामुळं, त्याचबरोबर या लवकर होणाऱ्या निवृत्तीला पत्नीची पूर्ण साथ असल्यामुळं, नोकरीत पेन्शनसाठी करावी लागणारी किमान वीस वर्षं पूर्ण झाल्यादिवशी मी निवृत्तीच्या परवानगीसाठी चिठ्ठी ठेवली. त्याला महाराजांनी नकार दिला. असाच नकार मला तेवीस वर्षं होईपर्यंत दरवर्षी येत होता. आता चिठ्ठीनं ऐकण्याची आणि त्यामुळं होणाऱ्या कल्याणाची पूर्ण खात्री असल्यामुळं मी दरवेळी नकार घेई आणि पुन्हा कामाला लागे.

चोविसाव्या वर्षी त्यावेळी चर्चेत असलेली स्वेच्छा निवृत्तीची पहिली योजना नोकरीत आली. राहिलेल्या वर्षांचा काही पगार त्यात मिळण्याची सोय असल्यामुळं, आपण नोकरी लवकर सोडीत आहोत, यासाठी आपल्याला महाराजांना आर्थिक मदत करण्याची इच्छा आहे काय, असा एक प्राथमिक विचार मनात आला. या योजनेखाली अर्ज करावा काय, याला महाराजांनी -होय- म्हणून उत्तर दिलं. साहजिकच मी अर्ज दिला.

माझ्या नोकरीला लागण्यापासूनच्या किंवा त्याआधीच्या बाराव्या वर्षापासूनच्या पारमार्थिक उद्देशांची किंवा त्यासाठी स्वतंत्रपणे व फारसा विषय न करता चाललेल्या प्रयत्नांची, प्रगतीची नोकरीच्या वर्तुळात कुठं फारशी कल्पना नव्हती. त्यावेळचं काम, अभ्यास, प्रगती, रिपोर्ट्स् पाहाता मी यात पुढं अजून खूप वाटचाल करू इच्छीत असेन, अशी अनेकांची कल्पना होती. मी विषय न करता, ती तशीच राहू दिली होती.त्यावेळी माझी अजून अठरा वर्षं नोकरी शिल्लक होती. वय बेचाळीस होतं. श्रींनी सांगितल्यामुळं, मी हा अर्ज केला. मी त्यात बसत नसल्यामुळं, तो पुढं नाकारलाही गेला. मला त्याचं अर्थातच सुखदुःख झालं नाही. मग हे होणार

नव्हतंच तर, त्यांनी अर्ज करायला का सांगितला, याची अनेक उत्तरं मात्र मला हा अर्ज दिल्यापासून तो नाकारला जाईपर्यंत आणि नंतरही मिळाली. त्यांतली काही पुढं देत आहे. - १. मी निवृत्तीच्या विचारात असू शकेन, अशी कल्पनाही नसलेल्या किंवा करू न शकणाऱ्या असंख्य सहकारी-वरिष्ठ इत्यादी मंडळींना त्याची कल्पना आली. त्यावर आमच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांत चर्चा झाली. कारणांची चौकशी झाली. त्यातून मी फार न सांगताच माझ्या पारमार्थिक उद्दिष्टांची कल्पना आपोआपच पसरली. माझा अर्ज पाहिल्यावर प्रथम आश्चर्य व्यक्त करणाऱ्या वरिष्ठांनादेखील माझ्या जीवनाच्या दिशेची कल्पना आली. एकूण माझ्या निवृत्तीची श्रींनी इतरांची मानसिक तयारी यानिमित्तानं करून घेतली. पुढं सात महिन्यांतच साधी स्वेच्छानिवृत्ती घेताना मला कुठलाही अधिक लाभ मिळणार नव्हता. पण त्यावेळी जर निवृत्तीच घ्यायची होती तर, निदान जेव्हा हा अधिक लाभ मिळणार होता, तेव्हातरी घ्यायची किंवा पुन्हा तो मिळेपर्यंत थांबायचं, अशा तऱ्हेचं व्यावहारिक-आर्थिक तारतम्य न बाळगल्याचा दोष पुढं आला नाही किंवा त्यावर फारशी चर्चाही झाली नाही. याचबरोबर आधीच्या-नंतरच्या कुठल्या योजनेत मिळू शकणारा जादा पैसा श्रींनी प्रपंचात येऊ दिला नाही. मग पुन्हा वार्षिक विचारणा करता, चोवीस वर्षं पूर्ण झाल्यावर मात्र सातच महिन्यांत मला निवृत्ती घेण्याची चिठ्ठीद्वारे आज्ञा दिली. त्याप्रमाणं प्रत्यक्षात त्यात कुठल्या अडचणी न येता ते पारही पडलं आणि मला जास्तीत जास्त लवकरच म्हणजे बेचाळीसाव्या वर्षी महाराजांनी अधिक तीव्र उपासनेसाठी - कार्यासाठी संकल्पानुसार मुक्त करून, कृपा केली. काही वेळा -होय- म्हणण्यात आणि त्याप्रमाणं प्रत्यक्ष होऊ न देण्यात, ते इतर अनेक गोष्टी कशा साधत असतात, हे यानिमित्तानं लक्षात आलं.

३. याच घटनेसंबंधित बारकाव्याचं एक उदाहरण देऊन थांबतो. चोवीस

वर्षं म्हणजे माझ्या दृष्टीनं पोटासाठी दोन तपं राबणं, ही एक मर्यादा होती. नेमकी त्याचवेळेला निवृत्तीची परवानगी श्रींनी दिली. तिचा अर्थ माझ्या कल्पनेप्रमाणं, चोवीस वर्षं ज्या सात तारखेला पूर्ण होत होती त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे सहा तारखेला, आपण निवृत्त व्हावं. त्यानुसार आधी नोटीस देण्याची मी तयारी केली. आमचं उभयतांचं याबद्दल एकमत होतं. पण व्यवहाराच्या दृष्टीनं त्या महिन्याच्या अखेरच्या तारखेला आपण निवृत्त व्हावं, असं माझ्या पत्नीचं मत होतं. त्यात एक सर्वदृष्टींनी सुलभता असते, हे मलाही पटलं होतं.फक्त चोवीस वर्षांनंतर आपण काम न करणं, हे त्यांच्या आज्ञेचं पालन होईल,असंही मला वाटत होतं. म्हणून आम्ही चिठ्ठीनं विचारलं.त्यावर महिन्याच्या अखेरच्या तारखेलाच निवृत्त व्हावं, असं आलं.

अर्थातच यावर मतभेदाचा प्रश्न नव्हता. मी त्यानुसार अर्ज दिला. त्यामधील तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यावर मी कामानिमित्त वरिष्ठ कार्यालयात गेलो असता, आमची सर्व रजेची रेकॉर्ड्स् तिथं असल्यामुळं, त्याची त्यांच्याबरोबर चर्चा झाली. राहिलेल्या रजांपैकी कोणत्या रजा आणि किती घेता येतील, याची मला कल्पना नव्हती. त्यांनी सर्व हिशेब करून मला त्याप्रमाणं अर्ज द्यायला सांगितले व त्यानुसार रजेवर जायला सांगितलं. त्याप्रमाणं मला चार्ज देऊन रजेवर जाण्याची पर्यायी व्यवस्थाही झाली. महिन्याच्या शेवटच्या दिवशी मात्र हजर राहावं, असं त्यांनी सुचवलं.

मी घरी आलो. नंतर कॅलेंडर पाहून सर्व चर्चा घरी झाली. माझी शिल्लक असलेली रजा तेवीस दिवस होती.त्यामुळं ती रजा आठ तारखेला सुरू होऊन, तीसला संपत होती.एकतीसला मला हजर राहायचं होतं.सहा तारखेला शनिवार होता. सातला रविवार होता. त्यामुळं माझ्याकडून सहाला शनिवारी शेवटचा कामकाजाचा दिवस पूर्ण करून, चार्ज दिला गेला. सातला रविवार असल्यामुळं अर्थातच कामाला येण्याचा प्रश्न नव्हता. तेव्हा माझ्या

लक्षात आलं, सर्व पेन्शन, रजा, इतर निवृत्तीचे लाभ - या सर्व बाबतींत लागणारा व्यवहार एकतीस तारखेचा अर्ज द्यायला सांगून त्यांनी सांभाळला. उभयतांचं एकमतही सांभाळलं आणि बरोब्बर दोन तपांच्या शेवटच्या दिवशी मला कामाच्या अर्थानं नोकरीतून मुक्तही केलं. हे सारं चर्चेनं ठरवून करणंसुद्धा अवघड होतं. पण केवळ दोन चिठ्ठ्यांत महाराजांनी सर्व साधून दिलं होतं.

● **निवृत्तीनंतर :**

निवृत्तीनंतर तर मी श्रींच्या, संतांच्या, देवाच्या नोकरीत - हजर होत असल्याची माझी भूमिका होती. ती आज बारा वर्षं तशीच आहे. आज तर, मी जवळपास या चिठ्ठीच्या-पाऊलवाटेच्या मार्गानंच सारी वाटचाल करतो आहे. तसा हा मार्ग माझ्यासमोर आजवर सुमारे तीस वर्षं आहे. तो सहजपणे मला कळला, त्याचं स्वरूप प्रथम देवांसमोर छाप-काटा करण्याचं, चिठ्ठी ठेवण्याचं होतं. पण त्यांतले एक-एक अनुभव आणि त्यांना असलेली व्याप्ती इ. पाहाता, मग अन्य पर्याय वगैरे अधिक निश्चित स्वरूपाची भर पडली. निवृत्तीनंतरचा जवळपास प्रत्येक आठवडा या मार्गानं निर्णय घेऊन, होणारी वाटचाल करण्यात आणि त्याचा त्यामधून होणाऱ्या आपल्या आणि इतरांच्याही हिताचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यात, व्यतीत होतो. त्यामुळं त्या प्रसंगांची, अनुभवांची यादी देणं कठीणच आहे, इतके ते अगणित आहेत, एवढंच सांगतो. अगदी निवडक प्रसंग या पुस्तकमर्यादेत पुढं देतो.

१.नामाचं प्रमाण : निवृत्तीनंतरचं माझं मुख्य काम राहिलेली उपासना तीव्रतेनं पुरी करणं,एवढंच होतं. फक्त तिचं स्वरूप माझ्यादृष्टीनं जपाचं प्रमाण निकरानं वाढवणं,एवढंच होतं. पण चिठ्ठीच्या मार्गानं मला या बाबतीत अनेक दिशा वेळोवेळी लक्षात आल्या.

- नामाचं प्रमाण हे, ते उपासनेच्या इतर अंगांना अनुकूल एवढं ठेवतात आणि त्या बाजू वेळेनुसार जशा बदलत जातात, तसं नामाचं प्रमाण ते कमी-जास्त करीत असतात. त्यात तब्येतीवर येणाऱ्या ताणापासून साधकांच्या सेवेपर्यंत - कुठल्याही कारणानं गरजेनुसार हे प्रमाण कमी किंवा जास्त होत असतं. पंचवीस हजार जप करायला सांगितला तरी,तो शांतपणे करायचा असतो -होतो आणि तोच पाच हजार करायला सांगितला तरी, करायचाच असतो, हे मला शिकता आलं.
- नामाचं प्रमाण आपल्या कल्पनेनुसार कमी - जास्त करणं चुकीचं असतं. लेखन, निरूपण, पदरचना, लोकांच्या भेटी-गाठी - यांचा ताण लक्षात घेऊन आपण स्वतः ते कमी-जास्त करण्यापेक्षा त्यांना विचारलं तर, येणारं उत्तर तर वेगळं असतं. ते आपल्या हिताचं असतं आणि प्रत्यक्षात ते आपल्याकडून पुरं होऊन कुठला शारीरिक, मानसिक ताणही येत नाही. एकदा मी अशीच खूप कामं वाढल्यावर आणि प्रकृती ढासळल्यावर असलेला जप तसाच ठेवण्याचा व तो कमी करण्याच्या संख्यांचा पर्याय विचारला. त्यावर - अन्य पर्याय - आला.

आता माझ्या लक्षात आलं की, मी जो जप करतो आहे तो ताणाचा असून, तो तसाच ठेवण्याचा किंवा कमी करण्याचेच पर्याय मी विचारले होते.ती दिशा चुकीची आहे,हे त्यांनी अन्य पर्यायानं दाखवून दिलं.मग प्रथम मी जप वाढवणं अपेक्षित आहे का, असं विचारलं. त्याचं उत्तर -होय- आलं. त्यानंतर मी वाढवण्याचे पर्याय विचारले. त्यात मला अपेक्षित नसलेला आणि जरा भारभूत वाटणारा संख्येचा पर्याय आला. तो मी केलाही. नंतर माझ्या असं लक्षात आलं की, तो तेवढा जप केल्यावर एकवेळ जागरण होत असे किंवा पहाटे उठावं लागत असे. पण त्याचा माझ्या तब्येतीवर कुठला विपरित परिणाम झाला नाही. उलट ती अधिक चांगली राहू लागली. इतर

सर्व वाढलेली कामंही होतच होती. यासंबंधी एकदा खुलासा नंतर विचारता, इतर कामांतला दर्जा किंवा ताण पचवण्यासाठी अधिक जपाची गरज असते, असं उत्तर आलं.

- नामाबद्दलचं प्रेम व गरज आधीपासूनच असल्यामुळं जप सुरू असला तरी, त्याचा कशाशी संबंध असेल, असं माझ्या मनात आलं नव्हतं. पण त्यांनी वेगवेगळ्या प्रकारांनी काही पुस्तकं समोर आणून तो प्रश्न विचारायला मला प्रवृत्त केलं. त्यावेळी माझं पुस्तकलेखन सुरू झालं होतं. म्हणून मी विचारता, प्रत्येक पुस्तकाबरोबर त्यांनी एक हजार जप वाढवायला सांगितला. ते पंधरा पुस्तकं होईपर्यंत प्रत्येक पुस्तकाबरोबर तसंच उत्तर येत होतं. मग मात्र त्यांनी ते थांबवलं.

२. उपासनेची इतर अंगं : नाम हे मुख्य साधन असलं तरी, वृत्तीचे अभ्यास, प्रयोग, प्रगती - या गोष्टी त्यांनी चिठ्ठीनं समोर आणून दिल्या. त्या पुढं अमूल्य ठरल्या. त्याचा इतरांनाही उपयोग झाला व होत आहे.

- नामाबरोबर वरच्या गोष्टींप्रमाणं प्रापंचिक कर्तव्यं, संतोषवृत्तीचा अभ्यास, शरीरानं सेवा,वाचेनं सेवा, इतरांसाठी मनःपूर्वक कल्याणप्रार्थनेनं तसंच कुठल्या दुर्भावाला मनात प्रवेश न देणं, कुणावरही आपलं निरपेक्ष व आत्यंतिक प्रेम असणं-अशी अनेक अंगं उपासनेला असतात, हे मला वेळोवेळी पाऊलवाटेनं कळलं आहे, खात्री झाली आहे. मात्र त्याच्या त्याच्या गरजा वरच्या नामाच्या संख्येप्रमाणं, कधी वेळेनुसार - कधी व्यक्तीनुसारही बदलतात - ते पाऊलवाटेनं लक्षात येतं.

- नाम, गुरुपरंपरा, संप्रदाय, आपलं उपास्य दैवत, इतर दैवतं, इतर उपासना मार्ग - यांमध्ये अनेकदा सामान्यांच्यासुद्धा लक्षात येतील इतके नकारात्मक उद्‌गार, प्रचार, इतरांना कमी लेखण्याची प्रवृत्ती, प्रचारांच्या पद्धती, लोकांना आकृष्ट करण्यावर आग्रही भर, त्यावरून माणसांच्यात

विसंवाद-अशा अनेक गोष्टी आढळून येतात. या साऱ्या गोष्टी अशुद्ध मनाचेच परिणाम असतात.ते मन अंतःकरणापर्यंत शुद्ध होईल इतकं नाम घेतलं तर,हे कळतं आणि स्वतःपुरते तरी भेद उरत नाहीत. पण याची खात्रीसुद्धा पाऊलवाटेच्या मार्गानं मला वेगवेगळ्या वेळी मिळाली आहे आणि ती इतरांना द्यावी, याची आज्ञाही मिळाली आहे. त्यानं अनेकांना इतर पंथांबद्दलचा आदर वाढणं व आपलं मन निर्मळ होणं,अशा स्वरूपाचे लाभ होत आहेत.

- निवृत्तीनंतर मी एका दृष्टीनं मोकळा झाल्यामुळं प्रवचनाची आमंत्रणं वाढत चालली.ती व्यवहारानं टाळता येईनात आणि जाऊ लागलो तर माझ्या वाढीव उपासनेवर त्याचा परिणाम होऊ लागला.व्यवहार सांभाळणं हे गरजेचं असलं तरी, महाराजांचं ऐकणं हे माझ्या आत्ताच्या या टप्प्यात मला प्राधान्याचं होतं. म्हणून मी त्यांच्यासमोर या प्रवचन स्वीकारण्याच्या भूमिकेबद्दल पर्याय ठेवले. त्या पर्यायांतून असा पर्याय त्यांनी दिला की, त्या त्या वेळी मला विचारल्याशिवाय कुठं जाऊ नये. त्यानंतर त्याप्रमाणं मी करीत आलो. व्यावहारिक अडचणी अपेक्षेपेक्षा खूप कमी आल्या. पुढं तर २००४ पासून मला सतत नऊ वर्षं अंथरुणावर खिळवून ठेवून, हा प्रश्न त्यांनी वेगळ्याच पद्धतीनं सोडवून टाकला. त्याआधीच्या तीन वर्षांच्या काळात मात्र अनेकदा त्यांनी एखादं गावातलं आमंत्रणसुद्धा नाकारायला सांगितलं आणि जो प्रवास मला तब्येतीनंसुद्धा अवघड होता, अशा ठिकाणी जायलाही सांगितलं. ते त्याप्रमाणं केल्यानंतर मात्र माझ्या असं लक्षात आलं की, ज्या ज्या निवडक ठिकाणी त्यांनी जायला सांगितलं, त्यांत वर उल्लेखलेली पंथापलीकडं जाण्याची तयारी, त्याची गरज, त्यानिमित्तानं भेटणाऱ्या व्यक्तींकडून पुढं होणारे आध्यात्मिक लाभ इ. अनेक हेतू साध्य झालेले दिसून आले.
- प्रत्यक्ष घटनेचा उल्लेख करायचा तर, नोव्हेंबर २००२ मध्ये माझ्याकडं एका, मला माहीत नसलेल्या श्रेष्ठ सत्पुरुषांचं चरित्र सहजपणे

भेटीदाखल चालून आलं. मी ते बारकाईनं वाचता एका वेगळ्या संप्रदायाचा मला परिचय झाला. त्यातून अनेक प्रकारचे उपासनेला उपयोगी पडणारे मुद्देही मिळाले. याचा अभ्यास मी करावा का, याला पाऊलवाटेनं -होय, मी ते पाठवलं आहे - असं उत्तर आलं होतं. त्यानंतर महिन्याभरातच म्हणजे ३०.१२.०२ ला मला त्या सत्पुरुषांच्या सत्शिष्यांच्या समाधीसमोर निरूपण करण्याचं आमंत्रण आलं. महाराजांना मी विचारलं.त्याचं उत्तर -जावं- असं आलं. प्रत्यक्ष जाणंही झालं आणि त्या सत्पुरुषांची तसंच त्यांच्या सद्गुरूंची कृपाही पुढं कित्येकदा अनुभवायला आली. आजही येत आहे. यात एक बारकावा या शिष्य असलेल्या सत्पुरुषांच्या वागण्यात असे, तो मला कळला. त्यांच्याकडं येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला ते प्रथम आपल्या गुरूंचं दर्शन घेऊन यायला सांगत असत.ते झाल्यावर त्यांची भेट होत असे. मला स्वतःला त्यांच्याकडं निरूपणासाठी जाण्यापूर्वीसुद्धा महाराजांच्याकरवी त्यांनी गुरूंचं चरित्र पाठवून त्यांचं दर्शन घडवून घेतलं होतं, हे माझ्या लक्षात आलं.

आपल्याकडं येणाऱ्या व्यक्तीला प्रथम गुरूंचं-निदान सत्पुरुषांचं-देवांचं दर्शन घडवण्याच्या, निष्ठेच्या, आदरयुक्त व प्रेमळ परंपरेचा परिचय आणि उपयोगही झाला. संतछायेतलं गुरुपदप्रतीक, अनेक सत्पुरुषांची व्यक्त-अव्यक्त उपस्थिती, त्यांनी इथं राहावं,अनुभव द्यावा-असा त्यांना व आपल्याला वाटणारा भाव, उपासनेतला पंथनिरपेक्ष मोकळेपणा-या साऱ्यांमागं पाऊलवाटेनं मिळालेल्या आज्ञा आणि अनुभव यांचा बळकट आधार आहे.

३.आरोग्याविषयी थोडक्यात : माझ्या दृष्टीनं हा विषय खूप अनुभवांचा आहे. त्याबद्दल इतरत्र लेखन आहे. ते सोडून काही घटना देत आहे.

- २००१मध्ये माझा समोरचा दात पडला. त्यानंतर दंतवैद्यांकडं जाऊन तो बसवून घेतला. तीन-चार महिन्यांतच तो निखळून पडला. त्यावरचा खर्च अर्थातच वाया गेला. त्यानंतर मी पुन्हा सल्ला घेण्यासाठी गेलो असता,

आपण हा दात परत बसवू फक्त त्यासाठी आजूबाजूचे दोन दात घासावे लागतील, त्याच्या आधारानं तो बसवता येईल व त्याचा खर्च अमुकअमुक येईल, असा सल्ला मिळाला. मी घरी येऊन श्रींना चिठ्ठी ठेवली. माझी अडचण दात नसण्यानं खाण्यावर काही बंधनं येणं किंवा दिसण्यात फरक पडणं इ. अजिबात नसून, मला अनेकदा प्रवचन, भजन, रेडिओवरील व पदावलीचं रेकॉर्डिंग यांच्यावेळी उच्चारणातली स्पष्टता जाईल का आणि अशा तऱ्हेच्या शस्त्रक्रियेमुळं मला आणखीही दात गमवावे लागतील का, अशी होती. त्यावर चिठ्ठीनं हे करण्याची गरज नाही, असं उत्तर आलं. त्याक्षणी प्रश्न तर संपलाच, पुढं मी निवृत्त झाल्यानंतर आकाशवाणीवर दोनशे प्रसारणं, एकवीस कॅसेट्स्चं रेकॉर्डिंग, असंख्य प्रवचनं, शिबिरं, चर्चासत्रं - अशा अनेक गोष्टी उच्चारणातली अडचण न उद्भवता पार पडल्या. या एकाबरोबर कमकुवत होणारे, वर्षभरात जाऊ शकणारे आजूबाजूचे दोन दातही वाचले, ते आजतागायत.

• संधिवातावर अनेकांच्या सल्ल्याप्रमाणं मी एका तज्ज्ञ डॉक्टरांचं ॲलोपॅथिक औषध घेत असे. त्यातला सल्ला, औषधं, जाणं-येणं सर्व खर्चिक असे. श्रींनी तसं असूनही ते घ्यायला सांगितलं होतं. त्यानं वर्षभर या आजारावर नियंत्रण राहिलं. पण पुढं पुढं आजार पुन्हा पहिल्यापेक्षा वाढला आणि प्रत्येक भेटीत औषधांचे पुढचे पुढचे टप्पे येत गेले. त्यांत एका शेवटच्या भेटीत अतितीव्र आजारात उदा. कॅन्सरसारख्या बाबतीत वापरावं तशा स्वरूपाचं औषध त्यांनी दिलं होतं. तिथल्या दुकानातून नेहमी ती सर्व औषधं लगेचच घेऊन मी गावी परत येत असे. नेमक्या त्याच औषधाच्या गोळ्या दुकानात त्यावेळी कमी पडल्या. घरी आल्यावर पहिल्या दिवशी मी औषध घेण्याच्या बाबतीत अत्यंत नियमित असूनही, ती गोळी घ्यायची विसरली. दुसऱ्या दिवशी ती आठवणीनं घेण्यापूर्वी पित्त झाल्यामुळं, ती घ्यायची

थांबवावी लागली. इतकं झाल्यानंतर मात्र, हा विषय श्रींसमोर ठेवणं मला आवश्यक आहे, हे लक्षात आलं. त्यांना प्रथम या ट्रीटमेंटसंबंधी मी विचारावं, असं आपल्याला सुचवायचं आहे का - असा पर्याय विचारला. त्याचं उत्तर -होय- म्हणून आलं. मग मी हे ज्या गोळीबद्दल हे घडलं, ती गोळी घ्यावी की न घ्यावी, याचं उत्तर विचारता -ती घेऊ नये- असं आलं. मग मी एकूणच ट्रीटमेंटविषयी विचारता, ही ट्रीटमेंट थांबवावी, असं उत्तर आलं. पर्याय विचारता, शेवटी श्रींनी स्वतः दिलेला साध्या एरंडेल तेल व सुंठीच्या औषधाच्या पर्यायाला होकार आला. त्यावर माझी प्रकृती ठीक राहिली. सुधारणाही झाली. विषय समोर आणून देण्याची पद्धत, धोकादायक औषधापासून वाचवण्याची कृपा आणि खर्चिक मार्ग टाळून साध्या औषधावर राहाण्याची संधी केवळ मला या मार्गामुळं मिळाली.

- अलीकडं संधिवातामुळं मनगट, बोटं व तळव्यांवर परिणाम होऊन त्याला ताण व वक्रता आल्यामुळं बाकीच्या व्यवहारात तर अडचण आलीच पण त्याबरोबर लेखन आणि पेटी या माझ्या उपासनेच्या संबंधित विषयांबद्दलही मोठा धोका दिसू लागला. सुदैवानं परगावचे तीन-चार डॉक्टर्स, याची चर्चा झाली तेव्हा उपस्थित होते. याबाबतीत एक शस्त्रक्रिया करावी लागते. त्याची त्यांनी कल्पना दिली. ती करण्यासाठी लागणारी सर्व मदत देण्याची तयारी दर्शवली. इतकंच नव्हे तर, ती जिथं केली जाते, तिथल्या त्यांच्या स्नेही डॉक्टर्सना त्यांनी लगेचच फोनवर कन्सल्ट करून खर्च, तारखा, वेळा इ. सर्व सल्ला घेतला. मात्र त्या शस्त्रक्रियेनंतर हात पूर्ववत होण्याची अर्थातच खात्री नव्हती. खर्च, इतर त्रास, प्रवास इ. अनेक गोष्टी होत्याच. आम्ही सर्व एकत्र असताना, सर्वांचीच या मार्गावर श्रद्धा असल्यामुळं श्रींना विचारावं, असं ठरलं. त्यांनी हे करू नये, असं सांगितलं. विषय तिथंच थांबला.याला आता वर्ष-दोन वर्षांचा काळ उलटला. अजूनही साध्या तेलानं,

शेकण्यानं हात टिकून आहे. तो उपासनेच्या कामी उपयोगालाही येत आहे.

४. मुलांच्या करिअर : हा अनेकांच्या जिव्हाळ्याचा विषय असून, त्याबद्दल खूप गैरसमज आहेत. म्हणून मी मुद्दाम स्वानुभवाचा उल्लेख करतो. जास्त पैसा मिळण्याच्या संधी असलेल्या साइडला व विशिष्ट गावी जावं, एवढा एक प्रधान विचार दिसून येतो. पण मी मुलाच्या वेळेला त्याच्या संमतीनं महाराजांसमोर चिठ्ठी ठेवून दोन गोष्टींची खात्री केली. त्यांनी सांगितल्याप्रमाणं क्षमता असूनही त्याला आर्ट्स्ला जायला सांगितलं. नंतर पुणं किंवा तत्सम ठिकाणी राहून, त्याचा थोडा कल असलेले व्यावसायिक कोर्सेससुद्धा करू नयेत, असं चिठ्ठीनं आलं. हे दोन्ही निर्णय व्यवहाराला विरोधी वाटतात. पण अत्यंत कमी खर्चाचं पदव्युत्तर शिक्षण चालू असतानाच, तेही पूर्ण होईल, अशा वेळी तो आज नामांकित संस्थेत थेट अधिकारी म्हणून परीक्षेच्या मार्गानं लागला व व्यावहारिकदृष्ट्या व पारमार्थिक वातावरणाचा लाभ मिळून इतरांपेक्षाही लवकर यशस्वीपणे स्थिर झाला. यातून चिठ्ठीच्या मार्गानं या प्रश्नावरही किती दूरगामी, पण योग्य उत्तर मिळतं, याचा उलगडा होईल.

५. पैशाचं स्थान : हाही अनेकांच्या दृष्टीनं फारच जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.नोकरी-व्यवसायात जरूर ते कर्तव्य त्यासाठी करावं.पण कोणता आणि किती पैसा आपलं हित करतो,यावर विचार करावा लागतो.निवृत्तीनंतर पगार एकदम कमी होणार असला तरी, पैशासाठी पुढं कोणतीही गोष्ट करावी लागू नये,अशा वेळी मला निवृत्ती द्या,अशी मी महाराजांना प्रार्थना केली होती. ती त्यांनी ऐकली. त्यानुसार पुढं राहाताही आलं. फक्त पारमार्थिक कामांतही प्रवचनाच्या मानधनाच्या निमित्तानं हा पैसा येतो, हे माझ्या लक्षात आलं. मी मागण्याचा प्रश्न नव्हताच. पण दिला गेल्यास काय करावं, या विचारात मी होतो. त्यावेळी योगायोगानं श्री मामासाहेब दांडेकर यांचं चरित्र माझ्या हाती

पडलं. मी सहज उघडून पाहिलं. त्यावर ज्ञानेश्वरीच्या प्रवचनाचं मानधन मामांना विचारल्याची घटना होती. त्यावर मामा म्हणाले, 'आई विकायची नसते !' क्षणात सावध होऊन मी श्रींसमोर चिठ्ठी ठेवली. हे विचारण्यासाठीच ही घटना घडवली आहे, हे त्यांनी सांगितलं आणि पुढं निरूपण, प्रवचन याचा पैसा कधीही घेऊ नये, असं उत्तर आलं. नकळत आल्यास तो अर्पण करून टाकावा,असंही आलं. व्यवहारानं कमी वाटणाऱ्या किंवा कधी अजून मिळवावा वाटणाऱ्या पैशात आपलं हित आणि स्वास्थ्य नसतं. उलट अशा तऱ्हेनं मोजक्या पैशात व आज्ञेनं राहण्यात व्यवहार सांभाळता येतात आणि समाधानही टिकतं, याचा मी आज बारा वर्षं अनुभव घेत आहे.

६. वास्तव्याचं स्थान : १९८९ला साताऱ्यात आल्यापासून आम्ही चार वेळा बिऱ्हाड बदललं. त्यातल्या प्रत्येक वेळी ते बदलावं, अशी परिस्थिती महाराजांनी समोर आणली. आमची उपासना मुळातच घरात असल्यामुळं येणाऱ्यांची संख्या वाढली तर, हा बदलण्याचा विचार आमच्यापुढं त्यांनी आणला. मुळातली भूमिका आपणहून कुणाला बोलावू नये, तसंच आलेल्या कुणाला नाही म्हणू नये, ही आजअखेर तशीच आहे. तीही पाऊलवाटेचीच कृपा आहे. हे बदल करताना, श्रींचे त्यामागं किती उद्देश असतात व ते चिठ्ठीच्या मार्गानं ते आपल्याला कसे सांगतात, याचं फक्त एक उदाहरण देतो. ज्या एका बिऱ्हाडात आम्ही होतो, त्यात एका उपासनेच्या खोलीत येणारी मंडळी मावत नाहीशी होऊन, शेवटी शेजारील खोलीही उरलेल्या मंडळींनी भरू लागली. दोन खोल्यांच्या मध्यावर बसून एकत्रित उपासना घेण्याचीही एक मर्यादा आली. तरीही हा विचार श्रींसमोर ठेवावा, असं व्यवहारानं आमच्या मनात आलं नव्हतं. पण येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या वर्दळीचा आजूबाजूच्यांना थोडा त्रास होतो, हे कानावर येईल, अशी व्यवस्था महाराजांनी केली. आपल्या उपासनेमुळं कुणाला त्रास होऊ नये,ही भूमिका प्रथमपासून

पक्की असल्यामुळं, हा संदेश मात्र, हा विषय महाराजांना विचारावा की काय, याची जाणीव देणारा ठरला. लगेच श्रींच्यासमोर विषय ठेवला. जागा बदलण्याविषयी आपण विचारावं, हे अपेक्षित आहे, असं उत्तर आलं. लगेचतसा प्रश्न ठेवता - जागा बदलावी - असं उत्तर आलं. अर्थात त्याक्षणी आमच्यासमोर कुठला पर्याय नसल्यामुळं, तो विषय तिथंच राहिला. पण ज्यावेळी असं एखादं उत्तर ते देत असतात, त्यावेळेला आपलं कर्तव्य करण्याची वेळही येते आणि त्यानुसार पुढचा मार्गही ते दाखवीत असतात. दुसऱ्या दिवशी रात्री सहज गप्पा मारायला आलेल्या मित्रांनी, आता आपल्याला उपासनेला जागा कमी पडते, असा विषय अचानकपणे काढला. आम्ही कालच्या उत्तराबद्दल सावधान झालो. पण त्याबद्दल काहीच विषय न करता आम्ही त्यांच्याशी पर्यायी जागेविषयी चर्चा केली. बोलता-बोलता त्यांच्या एका मित्राचा मोठा बंगला सध्या बहुतेक रिकामा असावा, असं त्यांच्या बोलण्यात आलं. इतकंच नव्हे तर, बसल्याजागी रात्रीच त्यांनी त्यांना फोनही लावला. कुणासाठी विचारणा करीत आहेत, याचा खुलासा केल्यावर त्यांनी सांगितलं की, 'गेले चार-पाच महिने बंगला बंद असून तो त्यांना दिला समजा. फक्त त्यांना जसा अभिप्रेत आहे तसा तो आहे ना, याची खात्री करायला आपण उद्या सकाळी जाऊया का ?' दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही बघायला गेलो. आमच्या आधीच्या दोन खोल्यांच्या एरियापेक्षा तिथला हॉल आकारानं मोठा होता. शिवाय वैयक्तिक उपासनेला वेगळी खोलीही होती. मला आता निवृत्तीनंतर त्याचीही गरज होती. अपेक्षित पर्याय लगेच दुसऱ्या दिवशी समोर आलेला होता. तरी पुन्हा श्रींसमोर चिठ्ठी ठेवून या स्थानी आम्ही जावं का, असं विचारता, त्याचं उत्तर -होय- असं आलं. या विशिष्ट प्रसंगात आधी आम्ही राहात असलेली जागा ही मध्यवर्ती होती, मुलाच्या शिक्षणाच्या दृष्टीनं ती सोयीची होती, पत्नीला नोकरीला

जाण्यासाठीही ती सोयीस्कर होती, मालकांचे ऋणानुबंध इतके चांगले होते की, त्यांना आम्ही सोडतो आहोत हे सांगणंही अवघड वाटत होतं, इतरांना एवढ्या सोयीच्या जागेतून नवी जागा अशी गावाबाहेर असल्यामुळं, हा निर्णय पटणं कठीण होतं. इतर साधक या प्रमाणात येत असले तरी, ते या मध्यवर्ती भागातले असल्यामुळं नव्या लांबच्या ठिकाणी त्यांना येणं खर्चाचं-त्रासाचं-गैरसोयीचं होणार होतं - या पार्श्वभूमीवर निर्णय अमलात आणणं जरा तणावाचं वाटलं. रात्री महाराजांना प्रार्थना करून, शांत झोपी गेलो. स्वप्नात महाराजांनी येऊन मी तिथं आधीच गेलो आहे, असं सांगितलं. मी अशा गोष्टीवर खात्री केल्याशिवाय विश्वास ठेवत नसल्यामुळं, चिठ्ठीनं मी या स्वप्नाच्या सत्यतेची खात्री करून घेतली. आता मात्र निर्णय लगेच अमलात आणण्याचं ठरलं. त्यावेळचे मालकही उपासनेतले होते. त्यांनी हा निर्णय आनंदानं स्वीकारला. सर्व सामान एका आठवड्याच्या आत नवीन ठिकाणी शिफ्ट झालं. घरातल्या दोघांच्याही जाण्यायेण्याच्या अडचणी सुटल्या. पुढच्याच शनिवारची पहिली उपासना तिथं झाली. उपासनेला येणाऱ्यांना हे लांब पडून, गैरसोय होऊन, त्यांची संख्या कमी होणार,उपासना चुकणार-अशा शंका मनात असताना, पहिल्याच शनिवारी दोन खोल्यांपेक्षा मोठा असलेला हॉल पूर्ण भरून, लागून असलेला पॅसेज व हॉलच्या दरवाजाबाहेर असलेली जागा साधकांनी भरून गेलेली होती. त्यावेळी मी निवृत्त झालेला असल्यानं या मोठ्या परिसराचं भाडं आपल्याला परवडेल की नाही, हा प्रश्न होता. पण आधीच्या जागेला देत असलेलंच भाडं इथं द्यावं, असं सांगून नव्या मालकांनी तो विषय सोडवून टाकला.

साधारणतः एक महिना गेल्यानंतर ही जागा ज्या दत्तमंदिराच्या जवळ होती तिथं नित्यनेमानं रोज दर्शनाला जाणाऱ्या एक वृद्ध आजी एके दिवशी दुपारी दर्शनाहून येताना आत आल्या. त्या परिसरातल्या कुणाचीच

आमची उपासनेची ओळख नव्हती. या आजींनी आत येऊ का, विचारलं. बसल्या. त्या जवळच राहात असल्यानं त्यांनी, इथं शनिवारी खूप गर्दी असते आणि एरवीही वर्दळ असते, ती कशामुळं, असं विचारलं. मी त्यांनाउपासनेबद्दल सांगितलं. त्या म्हणाल्या की, इथली उपासना या हॉलमध्ये होते ना ? मी 'हो' म्हटलं. पण त्या म्हणाल्या, या घरात आणखी कुठं उपासना आहे का ? मी वैयक्तिक उपासनेचा उल्लेख टाळीत असल्यामुळं आधी बोललो नव्हतो. पण त्यांना उपासनेची काही पार्श्वभूमी आहे, हे लक्षात आल्यामुळं मी त्यांना म्हटलं, 'हो, मी आतल्या खोलीत उपासना करतो.' त्या म्हणाल्या, 'मी आत गेले तर चालेल का ?' मी त्यांना घेऊन शेवटच्या छोट्या खोलीत गेलो. समोर कोपऱ्यात श्रींचा फोटो ठेवलेला होता. त्यांनी डोकं टेकून नमस्कार केला आणि मला म्हणाल्या, 'याच जागी एक महिन्यापूर्वी मी महाराजांना असंच स्वप्नात पाहिलं. म्हणून मला खात्री करून घ्यायची होती.' मी तिथं आधीच गेलो आहे, याचा लौकिक उलगडा मला तेव्हा झाला. त्याही पुढं नंतर, त्या बाहेर बसल्यावर, बोलताना त्यांनी विचारलं की, 'अशा अशा वर्णनाच्या तांबडं आलवण-साडी, डोक्यावर पदर घेतलेल्या अशा कुणी आजीबाई तुमच्या पाहाण्यात, घरात होत्या का?' मला क्षणभर सुचलं नाही. पण त्यांनी केलेल्या वर्णनाशी जिच्यामुळं आणि जिच्यापासून माझ्या रामभक्तीची सुरुवात झाली त्या आजीची मला आठवण झाली. तिचा एकमेव फोटो आमच्याकडं होता. तो कपाटाखालचा फोटो काढून मी त्यांना दाखवला. त्या म्हणाल्या, 'याच त्या आजी. या महाराजांच्या फोटोच्या शेजारी मी यांना पाहिलं.'

हे सांगणाऱ्या आजींचा मी नंतर सविस्तर परिचय करून घेतला. त्या एक अखंड नामात राहाणाऱ्या व्यक्ती होत्या. त्यांनी ज्यांच्याकडून अनुग्रह घेतला, त्या आजींनी खुद्द महाराजांकडून अनुग्रह घेतला होता, हे

लक्षात घेण्यासारखं आहे.

ही योजना करण्यात श्रींचा किती दूरगामी विचार असेल, याचा प्रत्यय पुढच्या तीन-चार वर्षांत आला. त्या परिसरात साधी परिचित नसलेलीअनेक मंडळी आपणहोऊनच उपासनेला येऊ लागली. खूप नाम घेऊ लागली. याची तर त्यावेळी पूर्वकल्पनाही नव्हती.

माझं बालपण दत्तमंदिराच्या परिसरात गेलं. त्यानंतर दत्तमंदिराच्या इतक्या जवळ राहाण्याचा योगही कधी आला नाही. इथं येताना, त्याची फारशी कल्पनाही नव्हती. पण आता उपासना वाढवताना, ही एक संधी आपल्याला आली, असं वाटून मी श्री दत्तदर्शनाला गेलो. नमस्कार केल्यावर दुसऱ्या क्षणी - आम्ही तुम्हाला इथं आणलं आहे - हे वाक्य ऐकून मी क्षणभर दचकलो. नंतर घरी येऊन यात भ्रम नसावा म्हणून मी चिठ्ठीनं खात्री करून घेतली. पुढं घडलेल्या अनेक घटना या सर्व संतांच्याही मागं शक्तिरूपानं उभ्या असलेल्या श्री दत्तगुरूंचा आणि त्यांच्या योजनेचा प्रत्यय आणून देणाऱ्या होत्या, एवढंच म्हणून इथं थांबतो.

या काही घटनांच्या वेळची निवेदनं, काढलेले पर्याय - जागेअभावी इथं देता येत नाहीत.घटना अगणित असल्यामुळं त्याही सर्व देणं तसं अशक्य आहे. या घटना देण्याचा उद्देश स्वानुभवानं हा मार्ग वर्षानुवर्षं चालल्याचा प्रांजळ आधार समोर ठेवणं, एवढा आहे. व्यक्तिगत अनुभव - सार्वत्रिक अनुभव - शास्त्रीय मांडणी या शास्त्रक्रमानं आधी पाऊलवाट मांडली आहे. तिचा स्वतःपुरता मोजका प्राथमिक आधार इथं दिला आहे. बाकी या पाऊलवाटेचा अभ्यास करून, तिच्या वापराविषयी निर्णय घेणं मी सश्रद्ध, जाणकार, विचारशील वाचकांवर सोपवून, सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना करून, विराम घेतो.

***

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

आपले कर्तव्य एखाद्या विशिष्ट परिस्थितीत नक्की काय आहे, हे ठरवणे हे अत्यंत जाणकार, प्रतिभावंतांनाही जाणवणारे कोडेच आहे. त्यामुळे त्याचा निखालस निकाल एखाद्या कुठल्या सुटसुटीत मार्गाने दोन शब्दांत होण्याची अपेक्षा करणे अवास्तवच आहे. तरीही बुद्धीची मर्यादा आल्यानंतर विश्वात्मक शक्तीची मदत घेऊन या वाटेने कर्तव्य ठरवणे सामान्य माणसाला तरी पटणारे, आटोक्यातले व सुलभ वाटेल.

अखेर कर्तव्याच्या निर्णयाच्या किंवा कर्तव्याच्या पूर्तीच्या ध्येयासाठी विवेक-विचारांचे राजमार्ग जरूर असले तरी काही कारणाने ते चालता येत नसतील तर या 'सश्रद्ध पाऊलवाटे'ने का होईना ध्येयापर्यंत पोचणेच जरूर व महत्त्वाचे होय.

कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट